CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर सोमवार, ५ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १७६ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पाकिस्तान चार दिवसही युद्धात टिकणार नाही!

## लष्करी ताकद उरली फक्त ९६ तासांची

### अहवालातून वास्तव आले समोर

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

भारताला अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी देणाऱ्या पाकिस्तानी लष्कराकडे सध्या तोफगोळ्यांची कमतरता आहे. कदाचित दोन्ही देशात युद्ध भडकल्यास पाकिस्तानची युद्ध क्षमता अवघ्या चार दिवसांचीच असल्याचे अहवालातून समोर आले आहे.

युक्रेन आणि इस्रायलसोबत असलेल्या अलिकडच्या शस्त्रास्त्र करारांमुळे पाकिस्तानला प्रामुख्याने तोफखाना, दारूगोळ्याची कमतरता भारत आहे. पाकिस्तानने अलिकडेच युक्रेनला केलेल्या शस्त्रास्त्रांच्या हस्तांतरणामुळे, विशेषतः १५५ मिमी तोफखान्यांच्या निर्यातीमुळे ही कमतरता निर्माण झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानमधील युद्ध साठे संपले आहेत, असे सूत्रांनी सांगितले. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारत पाकिस्तानवर लष्करी कारवाई करेल. पाकिस्तान भारतीय आक्रमकतेला योग्य उत्तर देईल. मात्र , चित्र इतके आशादायक नाही, असे काही पाकिस्तानी नेत्यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



### पाकिस्तानकडे केवळ इतकाच दारूगोळा

पाकिस्तानी सैन्याकडे सध्या फक्त ९६ तास लढाई चालू ठेवण्यासाठी पुरेसा दारूगोळा आहे. या घटनेने लष्करी वर्तुळात गंभीर चिंता निर्माण केली आहे. वाढती जागतिक मागणी आणि आर्थिक फायद्यासाठी केलेल्या निर्यातीमुळे देशाच्या धोरणात्मक साठ्यात घट झाली आहे, ज्यामुळे त्याच्या शक्तिशाली एम-१०९ हॉवित्झर आणि बीएम-२१ रॉकेटसाठी लागणारा दारूगोळा कमी झाला आहे.

### पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीज उत्पादनात अडचणी

देशाचा प्रमुख शस्त्रास्त्र उत्पादक असलेला पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीज (पीओएफ) जुन्यापायाभूत सुविधा आणि मर्यादित उत्पादन क्षमतेमुळे पुन्हा भरपाईच्या मागण्या पूर्ण करू शकत नाही. देशांतर्गत गरजा पूर्ण करणे हे पीओएफचे प्राधान्य असूनही, सध्याच्या परिस्थितीत ते करण्यात त्यांना अडचण येत आहेत. अहवालात असेही म्हटले आहे की २ मे रोजी झालेल्या विशेष कॉर्प्स कमांडर्स परिषदेत परिस्थितीचे गांभीर्य हा एक प्रमुख अजेंडा होता.

## नीटचा पेपर ४० लाखांत देणारे तीन अटकेत

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणारी नीट-यूजी अर्थात् नॅशनल एलिजिबिलिटी प्रवेश परीक्षेचा पेपर ४० लाखात मिळवून देण्याची बतावणी करीत विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या तीन आरोपींनी राजस्थान पोलिसांच्या विशेष पथकाना गुरुग्राम येथून अटक केली.

**विद्यार्थ्यांची फसवणूक, गुरुग्राममध्ये कारवाई**

तपासात अनेक विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन आरोपींनी फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. नीट-यूजी परीक्षेपूर्वी शनिवारी कारवाई करण्यात आली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी बलवान, मुकेश मीना आणि हरदास यांनी नीट-यूजी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधत त्यांनी परीक्षेच्या आधीच्या दिवशी ४० लाखात पेपर मिळवून देणार असल्याचे सांगितले. शुक्रवारी आरोपी विद्यार्थ्याला आणि त्याच्या पालकाला गुरुग्राम येथे घेऊन गेले आणि ४० लाख रुपयांची मागणी केली. कुटुंबाने पेपर दाखविण्यास सांगितला, परंतु त्यांनी नकार दिल्याने कुटुंबाने राजस्थान पोलिसांच्या विशेष पथकाला यासंदर्भात माहिती दिली. यानंतर, शनिवारी तिघांनाही अटक केली. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने तक्रार करण्यासाठी एक पोर्टल सुरू केले आहे. (वृत्तसंस्था)

# आता निवडणूक आयोग आणणार 'सुपर ॲप'

## एकाच ठिकाणी मिळणार ४० ॲप्सची सेवा

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

निवडणूक आयोगाकडून एक नवा प्लॅटफॉर्म लाँच केला जाणार असून त्याचे नाव ईसीआयनेट असे राहणार आहे, ज्याच्या माध्यमातून तब्बल ४० ॲप्सची सुविधा एकाच ठिकाणी मिळू शकणार आहे.

या प्लॅटफॉर्मला ॲप आणि वेबच्या माध्यमातून कार्यरत केले जाऊ शकते. याचा फायदा मतदार, मतदान अधिकारी आणि राजकीय पक्षांनाही होणार आहे. ईसीआयनेट एक सिंगल प्लॅटफॉर्मवर असेल जिथे निवडणूक आणि मतदारांशी संबंधित सर्व कामे केली जाऊ शकतात. ही माहिती पोल पॅनलने शेअर केली आहे. या एका प्लॅटफॉर्मवर वेगवेगळे ॲप्स आणि वेब यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या ४० सेवा मिळू शकतात.





यात मतदार हेल्पलाईन, मतदारांची संख्या, सीविजिल, सुविधा २.०, ईएसएमएस. सक्षम आणि केवायसी ॲप यासारखे अनेक ॲप्स आहेत. या अप्सचे एकूण साडेपाच कोटींहून अधिक डाऊनलोड झाले आहेत. ईसीआयनेट आल्यानंतर मोबाईल वापरकर्त्यांना निवडणूक आयोगाशी संबंधित वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळे ॲप्स घेण्याची गरज उरणार नाही आणि त्यांचे लॉगइन संदर्भातील तपशीलही लक्षात ठेवण्याची गरज राहणार नाही. या प्लॅटफॉर्मचा प्रस्ताव मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नुकतेच आयोजित एका पत्रपरिषदेत दिला होता. (वृत्तसंस्था)

### सर्वांनाच होईल फायदा

१०० कोटी मतदारांना आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रियेला याचा फायदा मिळेल, अशी आशा आहे. बूथ स्तरावरील साडेदहा लाख अधिकारी, राजकीय पक्षांनी नमेलेले १५ लाख बूथ स्तरीय अभिकर्ता, ४५ लाख मतदान कर्मचारी, १५५९७ सहायक निवडणूक नामांकन अधिकारी तसेच जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

# पाकिस्तानचे दोन गुप्तहेर जेरबंद

### पंजाब पोलिसांचे मोठे यश

◆ **अमृतसर, ४ मे**

पंजाब पोलिसांनी अमृतसरमध्ये दोन गुप्तहेरांना अटक केली आहे. हे गुप्तहेर भारतीय सैन्याची माहिती पाकिस्तानला पुरवत असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. या दोघांचेही पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंध असल्याची माहिती देखील समोर आली आहे.

भारत-पाकिस्तान सीमेवर गुप्त हेरगिरी करणाऱ्या आरोपींची ओळख पटली असून, त्यांची नावे पलक शेर मसीह आणि सूरज मसीह अशी आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गुप्तहेर भारतीय लष्करी छावण्या आणि हवाई तळांचे फोटो शत्रू राष्ट्र पाकिस्तानला पाठवत होते. तुरुंगात असलेल्या हरप्रीत सिंग उर्फ पिट्टू उर्फ हॅपी याच्याशीही त्यांचे संबंध असल्याचे समोर आले आहे.



या संदर्भात माहिती देताना पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी ट्विट केले की, अमृतसर ग्रामीण पोलिसांनी अमृतसरमधील लष्करी छावणी क्षेत्रे आणि हवाई दलाच्या तळांची संवेदनशील माहिती आणि छायाचित्रे लीक करण्याच्या आरोपाखाली पलक शेर मसीह आणि सूरज मसीह या दोघांना अटक केली. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, त्यांचे पाकिस्तानी गुप्तचर एजंटांशी संबंध आहेत. ज्यांचे संबंध सध्या अमृतसर मध्यवर्ती कारागृहात बंद असलेल्या हरप्रीत सिंग द्वारे स्थापित केले गेले आहेत.

अधिकृत गुप्तता कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे. तपास जसजसा तीव्र होत जाईल तसतसे आणखी महत्त्वाचे खुलासे अपेक्षित आहेत. (वृत्तसंस्था)

## नीटची तयारी करणाऱ्या विद्यार्थिनीची आत्महत्या

**कोटा** : नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या एका विद्यार्थिनीने परीक्षेपूर्वीच राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. घटनेच्या दिवशी विद्यार्थिनीचे कुटुंब घरीत होते. रात्री जेवण्यासाठी मुलगी तिच्या खोलीतून बाहेर न आल्याने तिची आई आवाज देण्यासाठी गेली असता शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास ती गळफास लावलेल्या अवस्थेत आढळली. यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. विद्यार्थिनी मध्य प्रदेशच्या शेओपूरची रहिवासी असून मुलीच्या परीक्षेच्या तयारीसाठी कुटुंब कोटा येथे तीन वर्षांपासून भाड्याच्या घरात राहत होते.

## चित्रपट वार्ता

### सिद्धांतसोबत दिसतेय् सारा तेंडुलकर

**मुंबई** : गली बॉय, नादानियां, बंटी और बबली २ यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसलेला अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीचे नाव अमिताभ बच्चन यांची नात नव्या नवेली नंदासोबत बऱ्याच दिवसांपासून जोडले जात होते. तथापि, आता नव्या माहितीनुसार, सिद्धांत सध्या सारा तेंडुलकरला डेट करत आहे. दोघांनाही अनेक वेळा एकत्र पाहिले गेले आहे. सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकर आणि सिद्धांत चतुर्वेदी यांच्यात जवळीक वाढत आहे. दोघेही एकत्र वेळ घालवताना बरेचदा दिसतात. हे नाते अजूनही सुरुवातीच्या टप्प्यात आहे, दोघेही ही बातमी गुपित ठेवत आहेत. सिद्धांत चतुर्वेदी शेवटचा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'खो गये हम कहाँ'मध्ये दिसला होता. येत्या काळात तो 'धडक २' मध्ये दिसणार आहे. यामध्ये त्याच्या विरुद्ध ॲनिमल फेम तृप्ती डिमरी असेल.



### इरफान खानच्या मुलाची सिनेसृष्टीला शिवीगाळ



**मुंबई** : इरफान खानचा मुलगा बाबिल खान एका व्हिडीओमुळे चर्चेत आला आहे ज्यामध्ये तो रडताना दिसत आहे. भावनिक विघटनाच्या या व्हिडीओमध्ये, बाबिल रडत आहे आणि बॉलिवूड इंडस्ट्रीसाठी अपशब्द वापरत आहे. बाबिलने व्हिडीओमध्ये अनन्या पांडे, अर्जुन कपूर सारख्या काही कलाकारांची नावेही सांगितली आहेत. मात्र, आता त्याच्या अकाउंटवरून व्हिडिओ काढून टाकण्यात आला आहे आणि त्याचे अकाउंट देखील बंद करण्यात आले आहे. पण याआधी त्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. समोर आलेल्या व्हिडीओमध्ये तो खूप रडताना आणि बॉलिवूडसाठी अपशब्द वापरताना दिसत होता. तो पुढे म्हणाला, बॉलिवूड खूप असभ्य आहे. बॉलीवूड सर्वात बनावट आहे. इथे काही लोक आहेत जे बॉलिवूडला चांगले बनवू इच्छितात. मला तुम्हाला खूप काही दाखवायचे आहे. माझ्याकडे तुम्हाला देण्यासाठी खूप काही आहे. असे बोलून बाबिल जोरजोरात रडू लागला.

### ५०० भागांनंतर संपणार 'कैसे मुझे...'

**मुंबई** : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'कैसे मुझे तुम मिल गये' ने ५००+ भाग पूर्ण केले असून आता लवकरच ही मालिका निरोप घेणार आहे. गेल्या दीड वर्षांमध्ये अमृता आणि विराट यांच्या प्रवासाने प्रेक्षकांच्या मनामध्ये विशेष स्थान मिळवले. गहिरे भावनिक नाते आणि असंख्य आव्हानांमधून घडलेली त्यांची प्रेमकहाणी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेली आणि तिने दाखवून दिले की प्रेम सर्व अडचणींवर मात करते. या मालिकेच्या प्रवासात किशोरी शहाणे, हेमांगी कवि, प्रतीक्षा होन्मुखे, पुलकित बांगिया, आकांक्षा चमोला आणि इतर अनेक प्रतिभावान कलाकारांनी साकारलेल्या विविध रंगीबेरंगी व्यक्तिरेखा प्रेक्षकांसमोर आल्या, आणि मालिकेचा आकर्षकपणा वाढला. 'कैसे मुझे तुम मिल गये' लवकरच एका हृदयस्पर्शी शेवटास पोहोचणार असून अमृता आणि विराट यांच्या प्रेमकथेचा आनंदी समारोप दाखवण्यात येणार आहे.

# सिंगापूरमध्ये पंतप्रधान वोंग यांच्या पक्षाला बहुमत

## पीपल्स ॲक्शन पार्टीने जिंकल्या ९७ पैकी ८७ संसदीय जागा

◆ **सिंगापूर, ४ मे**

सिंगापूरमध्ये शनिवारी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पंतप्रधान लॉरेन्स वोंग आणि त्यांच्या पीपल्स ॲक्शन पार्टी अर्थात् पीएपीने ९७ पैकी ८७ संसदीय जागा जिंकून प्रचंड बहुमत मिळवले. लॉरेन्स वोंग यांचा पक्ष लवकरच नवीन सरकार स्थापन करणार आहे.

पीएपी पक्ष मागील ५० वर्षांपासून सत्तेत असून त्यांचा सलग १४ वा विजय आहे. २०२० च्या निवडणुकीत त्यांनी ८३ जागा जिंकल्या. आता पुढील पाच वर्षांसाठी पुन्हा एकदा त्या पक्षाचे सरकार राहणार आहे आणि वोंग हेच सिंगापूरचे नवे पंतप्रधान असतील. विजयानंतर पंतप्रधान वोंग म्हणाले की, आम्हाला मिळालेल्या मजबूत जनादेशाबद्दल आम्ही आभारी आहोत. आम्ही आणखी कठोर परिश्रम करून तुमचा विश्वास सार्थ ठरवू. निवडणुकीत मुख्य स्पर्धा १९६५ पासून सत्तेत असलेल्या पीपल्स ॲक्शन पार्टी आणि मुख्य विरोधी वर्कर्स पार्टी यांच्यात होती. याशिवाय इतर अनेक छोटे पक्षही निवडणूक रिंगणात होते. निवडणूक विभागाने सांगितले की, देशभरातील २६ लाख लोकांनी १२४० मतदान केंद्रांवर ९२ जागांसाठी मतदान केले. यात पीएपीने ९७ पैकी ८७ संसदीय जागा जिंकून प्रचंड बहुमत मिळवले. मुख्य प्रतिस्पर्धी वर्कर्स पार्टीने आठ मतदारसंघांपैकी २६ जागा लढवल्या. (वृत्तसंस्था)



### स्वातंत्र्यानंतरची १४ वी निवडणूक

१९४८ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सिंगापूरची ही १९ वी आणि १९६५ मध्ये स्वातंत्र्यानंतरची १४ वी निवडणूक होती. जवळजवळ २० वर्षे पदावर राहिल्यानंतर ली हिसयन लूंग यांनी पायउतार झाल्यानंतर गेल्या मे महिन्यात पंतप्रधान वोंग यांनी नवीन पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. जागतिक अर्थव्यवस्थांवर अमेरिकेच्या व्यापार शुल्कामुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेत पंतप्रधान वोंग आणि पीएपी यांनी सार्वत्रिक निवडणुकीत जनतेला निवडून देण्याची साद घातली होती.

## नुकसान भरपाईच्या पैशातून हत्येसाठी पैसे

◆ **हावेरी, ४ मे**

हिंदुत्ववादी कार्यकर्ते सुहास शेट्टीची हत्या घडवून आणण्यासाठी मोहम्मद फाजीलच्या कुटुंबीयांना दिलेल्या नुकसान भरपाईपोटी दिलेल्या पैशाचा उपयोग करण्यात आल्याचा आरोप होत आहे. मात्र, मुख्यमंत्री सिद्दारामय्या यांनी याबाबत माहिती नसल्याचे सांगितले आहे.

मोहम्मद फाजील खून प्रकरणात सुहास शेट्टी प्रमुख आरोपी होता. २०२२ मध्ये फाजीलचा खून झाला होता. त्याच्या कुटुबीयाला २५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात आली. त्यापैकी ५ लाख नुकतेच देण्यात आले होते. या पैशाचा उपयोग शेट्टीची हत्या करण्यात आली. याप्रकरणी फाजीलच्या भावासह आठ जणांना अटक करण्यात आली आहे. गेल्या शुक्रवारी भररस्त्यात शेट्टीला ठार मारण्यात आले. नुकसान भरपाईतील रकमेचा उपयोग गुन्ह्यासाठी करण्यात आला किंवा नाही याबाबत मला नक्की माहित नाही. त्यामुळे शेट्टीची हत्या आणि रकमेचे वाटप याचा लगेच संबंध जोडणे योग्य होणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# स्ट्रॅटोस्फेरिक एअरशिपची यशस्वी चाचणी

### संरक्षण तंत्रज्ञानात भारताची झेप

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओने मध्य प्रदेशातील श्योपूर येथे स्ट्रॅटोस्फेरिक एअरशिप प्लॅटफॉर्मची पहिली यशस्वी चाचणी घेतली. हे प्लॅटफॉर्म आग्रा येथील एरियल डिलिव्हरी रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट अर्थात् एडीआरडीईने विकसित केले. भविष्यातील उंचीच्या हवाई मोहिमांसाठी उच्च गुणवत्तेचे सिम्युलेशन मॉडेल विकसित करण्यासाठी या प्लेटफॉर्मचा उपयोग होणार आहे. या चाचणीमुळे भारताने संरक्षण तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे.

डीआरडीओचे अभिनंदन करताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, ही प्रणाली भारताच्या संरक्षण तंत्रज्ञान क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करेल आणि देशाला संरक्षण क्षेत्रात तांत्रिक स्वावलंबनाकडे घेऊन जाईल. संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, डीआरडीओने श्योपूर चाचणी स्थळावरून स्ट्रॅटोस्फेरिक एअरशिप प्लॅटफॉर्मची पहिली चाचणी यशस्वी केली. एका विशेष पेलोडसह स्ट्रॅटोस्फेरिक एअरशिप सुमारे १७ किलोमीटर उंचीवर पोहोचले आणि त्याचा उड्डाण कालावधी सुमारे ६२ मिनिटे होता. या कालावधीत मिळालेला डेटा भविष्यातील हवाई मोहिमांसाठी वापरला जाईल.

**शत्रूवर पाळत ठेवणे शक्य**

डीआरडीओचे सचिव आणि अध्यक्ष डॉ. समीर व्ही कामत यांनी या चाचणीबद्दल माहिती देताना एक्सवर लिहिले की, स्ट्रॅटोस्फियर दीर्घकाळ पृथ्वीच्या वातावरणात टिकून राहण्यास सक्षम आहे. भविष्यात शत्रूच्या हालचालीवर पाळत ठेवण्यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठा उपयोग होईल. याशिवाय दळणवळण आणि आपत्ती व्यवस्थापन यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी बदल होणार आहे. (वृत्तसंस्था)

## जवानाने लपवले पाकिस्तानी मुलीशी केलेले लग्न

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

केंद्रीय राखीव पोलिस दलाने सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन केल्यामुळे ४१ व्या बटालियनचे जवान सीटी/जीडी मुनीर अहमद यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ केले आहे. अहमदवर पाकिस्तानी मुलीशी लग्न केल्याचा आणि तिचा व्हिसाची मुदत संपल्यानंतरही तिला भारतात आश्रय दिल्याचा आरोप आहे, ज्याची माहिती त्याने विभागापासून लपवून ठेवली होती. मुनीर अहमद यांनी व्हिडीओ कॉलद्वारे निकाह केला होता.

मुनीर अहमदने केवळ त्याच्या लग्नाची माहिती गुप्त ठेवली. तसेच त्याने पत्नीच्या भारतात दीर्घकाळ वास्तव्याबद्दलही माहिती दिली नाही, असे सीआरपीएफने केलेल्या अंतर्गत तपासात आढळून आले. हे वर्तन सेवा नियमांचे उल्लंघन आहे आणि त्यामुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. सीआरपीएफने हे प्रकरण खूप गांभीर्याने घेतले आणि विलंब न करता कारवाई केली. त्याला तात्काळ बडतर्फ केले. दलात सेवा देणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याने सेवा अटींचे प्रामाणिकपणे पालन करणे अपेक्षित आहे. (वृत्तसंस्था)

# बद्रीनाथचे दरवाजे उघडले, चारधाम यात्रा सुरू

### १५ टन फुलांनी सजले मंदिर

### पहिल्याच दिवशी भाविकांची गर्दी

◆ **गढवाल, ४ मे**

उत्तराखंडच्या गढवाल हिमालयीन क्षेत्रात स्थित जगप्रसिद्ध बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे रविवारी सकाळपासून भाविकांसाठी खुले झाले. निर्धारित वेळेत सकाळी सहा वाजता वैदिक मंत्रोच्चारात मंदिराचे दरवाजे उघडल्यानंतर विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

या प्रसंगी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, भाजपाचे महेंद्र भट्ट, टिहरीचे आमदार किशोर उपाध्याय हे उपस्थित होते. मंदिराचे दरवाजे उघडण्यात आल्यानंतर ढोल-नगाऱ्यांचा निनाद करण्यात आला. यावेळी सेनेच्या बँडची मधुर धून आणि हजारोंच्या संख्येने आलेल्या भाविकांचा 'जय बदरी विशाल'चा जयघोष यामुळे या ठिकाणी भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी मंदिराला १५ टन रंगीबेरंगी फुलांनी सजवण्यात आले. यामुळे मंदिराच्या सौदर्यात आणखीनच भर पडली. परंपरेनुसार सकाळी बदरीनाथ धामचे मुख्य पुजारी रावल, धर्माधिकारी व वेदपाठींव्दारे मंदिरात पूजा-अर्चना करण्यात आली. यानंतर मंदिर विधी विधानाने माता लक्ष्मी यांना गर्भगृहातून बाहेर काढून मंदिराची परिक्रमा करून लक्ष्मी मंदिरात पुन्हा विराजमान करण्यात आले.



बद्रीनाथ धामचे रविवारी दरवाजे उघडण्यात आले. यानिमित्त स्थानिक महिलांनी पारंपरिक नृत्य सादर केले.

**भगवान कुबेर आणि उद्धव यांच्या मूर्ती स्थापित**

भगवान कुबेर आणि उद्धव यांच्या मुर्तींना पुन्हा बदरी विशाल मंदिरात विराजमान करण्यात आले. यानंतर भगवान बदरी विशाल यांच्या चतुर्भुज मुर्तीला विधिवत अभिषेक स्नान घालण्यात आले. यानंतर बद्रीनाथ यांचा आकर्षक श्रृंगार करण्यात आला. या यात्रेसाठी मुख्य मंदिराबरोबरच बद्रीनाथ धाम मंदिर परिक्रमेत असलेले गणेश, घंटकर्ण, आदि केदारेश्वर, आदि गुरु शंकराचार्य मंदिर आणि माता मूर्ती मंदिराचे दरवाजेही भाविकांसाठी उघडण्यात आले आहेत.

मान्यतेनुसार, वर्षातील सहा महिने (उन्हाळा) मानव भगवान विष्णूची पूजा करतात, तर उर्वरित सहा महिने (हिवाळा) देव स्वतः भगवान विष्णूची पूजा करतात, ज्यामध्ये देवर्षी नारद हे मुख्य पुजारी असतात. अधिकाऱ्यांनी सांगितले की, स्थानिक प्रशासनाने बद्रीनाथ धामची यात्रा सुरक्षित आणि अडथळ्यांविना होण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली आहे. प्रशासनाने भाविकांना कोणताही गोंधळ अथवा गडबड न करता रांगेतून दर्शन घेण्याचे आवाहन केले आहे. (वृत्तसंस्था)

### चारधाम यात्रेला सुरुवात

बद्रीनाथ धामचे दरवाजे खुले झाल्याने आता चारधाम यात्रेलाही अधिकृतपणे सुरुवात झालेली आहे. उत्तराखंड येथील गंगोत्री-यमुनोत्री तसेच केदारनाथचे दरवाजे या आधीच उघडण्यात आल आहेत. आता बद्रीनाथ धामचे दरवाजे उघडल्याने चारधाम यात्रेला सुरुवात झाली आहे. चारधाम यात्रेसाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, प्रशासनानेही जय्यत तयारी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोमवार, ५ मे २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## आजचा सामना

सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : राजीव गांधी स्टेडियम, हैदराबाद

## विचारपुष्प



आपला खरा धर्म हा आहे की, हा समाज आपला आहे, म्हणून आपण त्याबद्दल चिंतन केले पाहिजे आणि प्रत्येक व्यक्ती स्वत:चे भरण-पोषण करू शकेल, असा स्वाभिमान त्याच्यात निर्माण केला पाहिजे. आपल्याला भेटणारे दीन-दु:खी हे भगवंताप्रमाणे आहेत आणि भगवंताने आपल्याला त्याची सेवा करण्याची संधी दिली आहे, असे समजून त्याची प्रत्यक्ष सेवा करण्यास प्रेरित झाले पाहिजे.

**- श्रीगुरुजी,**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक



वैकुंठ बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे रविवारी पहाटे सहा वाजता वैदिक मंत्रोच्चारात उघडण्यात आले. जवळपास १५ हजार भाविकांनी अखंड ज्योतीसह भगवान बद्रीनाथाचे दर्शन घेतले. मंदिर सजविण्यासाठी जवळपास ४० क्विंटल झेंडूच्या फुलांचा वापर करण्यात आला.

# आज बारावीचा निकाल

◆ **पुणे, ४ मे**

माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांत परीक्षेचा बारावीचा निकाल सोमवारी जाहीर होणार आहे. बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. ५ मे रोजी दुपारी १ वाजता बारावीचा निकाल जाहीर होईल, अशी घोषणा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी एकूण १५,०५,०३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती. त्यामध्ये ८,१०,३४८ मुले, ६,९४,६५२ मुली व ३७ ट्रान्सजेंडर आहेत. एकूण १०५५० कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली होती. तर या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात विद्याथ्यांसाठी ३३७३ मुख्य केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

बारावीची परीक्षा पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांतर्फे आयोजित करण्यात आली होती. बारावीच्या परीक्षांच्या निकालाचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर निकालाची तारीख कधीही जाहीर केली जाऊ शकते असे देखील सांगितले जात होते. त्यानुसार रविवारी बारावीच्या निकालाची तारीख राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी जाहीर केली. निकाल दिलेल्या संकेतस्थळावर दुपारी १ नंतर उपलब्ध असतील. https://result.digilocker.gov.in, https://mahahssboard.in, https://hscresult.mkcl.org, https://results.navneet.com, https://results.targetpublications.org (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### पाच बँकांना आरबीआयकडून दंड

**मुंबई :** देशातील पाच मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दंडात्मक कारवाई केली आहे. त्यात आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय, बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचा समावेश आहे. आयसीआयसीआय बँकेला ९७.२० लाखांचा, ॲक्सिसला २९.६० लाखांचा, आयडीबीआयला ३१.८ लाखांचा, बँक ऑफ बडोदाला ६१.४० लाखांचा तर बँक ऑफ महाराष्ट्रला ३१.८० लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. बँकिंग क्षेत्रातील विविध नियमांची पायमल्ली केल्याच्या आरोपाखाली ही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

### आयआयटी खडगपूरमध्ये बी.टेक.च्या विद्यार्थ्याचा मृत्यू

**खडगपूर :** आयआयटी खरगपूरच्या मदन मोहन मालवीय वसतिगृहात बी.टेकच्या तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्याचा मोहम्मद आसिफ कमर याचा मृतदेह रविवारी फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळला. आसिफ हा सिव्हिल इंजिनीअरिंगचा विद्यार्थी होता आणि बिहारच्या सीतामढी जिल्ह्यातील रहिवासी होता. कॉलेज व्यवस्थापनाच्या म्हणण्यानुसार, सुरक्षा रक्षकांनी पहाटे ३ वाजता विद्यार्थ्याच्या मृत्यूची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस वसतिगृहात आले. आसिफच्या खोलीचा दरवाजा तोडून त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. हे प्रकरण आत्महत्येचे असल्याचे दिसते. पोलिस तपास करत आहेत.

### सलग दहाव्या दिवशी सीमेवर गोळीबार

**नवी दिल्ली :** भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांनंतर पाकिस्तान दररोज रात्री नियंत्रण रेषेवर युद्धबंदीचे उल्लंघन करीत आहे. शनिवारी रात्री सलग १० व्या दिवशी, जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, राजौरी, सुंदरबनी आणि अखनूर सेक्टरमध्ये पाकिस्तानी सैन्याकडून गोळीबार करण्यात आला, ज्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले.

### उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांचे संरक्षण करा

**नवी दिल्ली :** उष्णतेच्या लाटेचा धोका लक्षात घेता, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्रासह ११ राज्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बळ, बेघर, वृद्ध, लहान मुले आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. वर्षे २०१८ ते २०२२ या कालावधीत कडक ऊन आणि उष्माघातामुळे देशभरात ३,७९८ मृत्यू झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीतून समोर आले आहे. या पृष्ठभूमीवर, मानवाधिकार आयोगाने निवारा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि कामाच्या वेळांध्ये बदल यासारख्या उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र, पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि राजस्थान या राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सांगितले आहे.

# अखेर पाणी रोखले

## बागलीहार धरणातून होणाऱ्या विसर्गावर नियंत्रण

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारने सिंधू पाणी करार रद्द केला होता. याच दिशेने पहिले पाऊल उचलत भारताने बागलीहार धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग कमी केला आहे. त्यामुळे चिनाब नदीतून पाकिस्तानकडे जाणारा प्रवाह कमी झाला आहे.



सरकार लवकरच झेलम नदीवर बनलेल्या किशनगंगा धरणाचे पाणीही थांबवण्याची योजना आखत आहे. सिंधू पाणी करार रद्द झाल्यानंतर भारत सरकार पाकिस्तानात पाण्याचा प्रवाह नियंत्रित करू शकणार आहे. जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये बांधलेल्या बागलीहार आणि उत्तर काश्मिरातील किशनगंगा धरणाच्या मदतीने भारत सरकार वाटेल तेव्हा पाण्याचा प्रवाह रोखू शकणार आहे आणि कोणत्याही क्षणी धरण उघडू शकणार आहे. बागलीहार आणि किशनगंगा धरण बंद करून भारत झेलम आणि चिनाब दोन्हींचे प्रवाह अवरूद्ध करू शकतो. यामुळे पाकिस्तानात भीषण दुष्काळ पडू शकतो. एवढेच नाही तर भारताने कोणत्याही क्षणी धरणाचे दरवाजे उघडले तर पाकिस्तान पुराच्या पाण्यात वाहून जाईल, अशी स्थिती आहे.

याचाच अर्थ भारताने घेतलेला निर्णय पाकिस्तानसाठी अतिशय घातक ठरणार आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करण्यासाठी सिंधू करार रद्द केलाच आहे. त्याच्याही पुढे जात चिनाब आणि झेलमवरही भारताने नियंत्रण मिळवले तर आता पाकिस्तानची खऱ्या अर्थाने पाण्याच्या बाबतीत कोंडी होणार आहे. दुष्काळ किंवा पूर अशा कोणत्याही परिस्थितीला त्यांना सामोरे जावे लागू शकते. सिंधू जलवाटप करारानुसार भारत सिंधू, झेलम, चिनाब आदी नद्यांवर धरण बांधू शकत नाही पण काही अटींवर जलविद्युत प्रकल्प उभारू शकतो. कुठल्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अवरूद्ध होणार नाही, याची काळजी भारताला घ्यावी लागत होती. तसेच बागलीहार धरणाला पाकिस्तानकडून मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला होता. (वृत्तसंस्था)

### भारताच्या वाट्याला केवळ २० टक्के पाणी

वास्तविक सिंधू नदी खोऱ्याचा ४० टक्के भूभाग भारतात येतो. पण दोन्ही देशांमध्ये १९६० मध्ये झालेल्या सिंधू जलवाटप करारानंतर सिंधू, झेलम, चिनाब नद्यांच्या ८० टक्के पाण्यावर पाकिस्तानचा हक्क मान्य करण्यात आला तर भारताच्या वाट्याला केवळ २० टक्के पाणी आले.

# भारताला रशियाकडून मिळाली क्षेपणास्त्रे

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

भारतीय लष्कराला रशियाकडून अत्याधुनिक इग्ला-एस क्षेपणास्त्रे मिळाली आहेत, ज्यामुळे देशाच्या हवाई संरक्षण क्षमतांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शत्रूची लढाऊ विमाने, ड्रोन आणि हल्ला करणारे हेलिकॉप्टर अगदी जवळून पाडता यावेत म्हणून ही क्षेपणास्त्रे तैनात केली जाणार आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराच्या क्षमतेत मोठी भर पडली आहे. रशियन बनावटीची अत्याधुनिक 'इग्ला-एस' प्रकारची एअर डिफेन्स क्षेपणास्त्रे लष्कराला नुकतीच प्राप्त झाली आहेत. भारतीय लष्कराने रशियासोबत केलेल्या २६० कोटी रुपयांच्या विशेष खरेदी करारांतर्गत ही क्षेपणास्त्रे पुरवण्यात आली आहे. ही क्षेपणास्त्रे आता सीमांवर तैनात केली जात असल्याने पाकिस्तानसोबत तणावाच्या



पृष्ठभूमीवर लष्कराची क्षेपणास्त्र क्षमता आणखी मजबूत झाली आहे. भारताला पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांकडून हवाई आणि ड्रोन धोक्यांचा सामना करावा लागू शकतो. या क्षेपणास्त्रांमुळे भारतीय सैन्याची क्षमता, वेग आणि अचूकतेत वाढ झाली आहे. संरक्षण सूत्रांच्या मते, भारतीय सैन्याला हवाई संरक्षण वाढवण्यासाठी अधिक उपकरणे मिळणार आहेत. (वृत्तसंस्था)

## नौदल, हवाईदल प्रमुखांसोबत पंतप्रधान मोदींची बैठक

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

पाकिस्तानसोबतच्या तणावादरम्यान रविवारी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोक कल्याण मार्ग येथील निवासस्थानी भेट घेतली.

यावेळी त्यांनी युद्धसरावासह देशाच्या समुद्र आणि हवाई सीमांवरील तयारीची माहिती दिली. मोदींनी दोन्ही दलाच्या सुरक्षेचा आढावा घेतल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

भारतीय नौदलाने अरबी समुद्रात ३ मेपासून लाईव्ह फाइल ड्रिल्सचे आयोजन केले आहे. काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान मोदी यांनी तिन्ही लष्कर प्रमुखांसोबत बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हेही या बैठकीत सहभागी झाले होते. यानंतर सरकारने सैन्याला कारवाई करण्याची मोकळीक दिली होती. (वृत्तसंस्था)

# वक्फ सुधारित कायद्यावर आज होणार सुनावणी

◆ **नवी दिल्ली, ४ मे**

वक्फ सुधारित कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर उद्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणईकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

तीन सदस्यीय खंडपीठासमोर पाच याचिकांवर सुनावणी होणार आहे. १७ एप्रिलला झालेल्या सुनावणीत खंडपीठाने वक्फ बाय युजर आणि केंद्रीय वक्फ मंडळ आणि परिषदेवरील नियुक्त्या ही दोन कलमे तात्पूरती स्थगित केली आणि पुढील सुनावणी ५ मे रोजी ठेवली. तसेच केंद्र सरकारला बाजू मांडण्यासाठी एका आठवड्याचा वेळ दिला होता. केंद्राने २५ एप्रिलला न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करीत वक्फ सुधारित कायद्याचे समर्थन केले. संसदेने पारित केलेल्या कायद्याबाबत व्यापक आदेश जारी करण्यास केंद्राने विरोध केला असून असे झाल्यास कायदेमंडळ आणि विधिमंडळ, असा पेच निर्माण होऊ शकतो, असे केंद्राने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानची उडाली झोप

## संसदेचे आपत्कालीन अधिवेशन बोलावण्याची मध्यरात्री घोषणा

◆ **इस्लामाबाद, ४ मे**

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी शनिवारी मध्यरात्री संसदेचे आपत्कालीन अधिवेशन बोलावण्याची घोषणा केली. पाकिस्तानच्या राष्ट्रीय असेंब्लीचे हे आपत्कालीन अधिवेशन सोमवारी संध्याकाळी ५ वाजता बोलावण्यात आले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या कठोर निर्णयांमुळे पाकिस्तानची झोप उडाल्याचे दिसून येत आहे.



आता या आपत्कालीन अधिवेशनाच्या माध्यमातून पाकिस्तान आपल्या नागरिकांना दिशाभूल करण्याचा आणि भारताविरुद्ध विष ओकण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. यापूर्वी, भारताच्या लष्करी तयारीला घाबरून पाकिस्तानने दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री त्यांच्या गुप्तचर संस्थेचे प्रमुख लेफ्टनंट जनरल मोहम्मद असीम मलिक यांना राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला होता. या नियुक्तीचा औपचारिक आदेशही रात्रीच जारी करण्यात आला.

**आम्ही युद्धासाठी तयार, नौदल प्रमुखाची दर्पोक्ती**

पाकिस्तानी नौदल प्रमुख नावेद अशरफ यांनी भारताविरोधात चिथावणीखोर टिप्पणी करीत म्हटले की, आपल्याला स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. देशासाठी काहीतरी करण्याची हीच वेळ आहे आणि आम्ही युद्धासाठी सज्ज आहोत. (वृत्तसंस्था)

# प्रभू राम हे केवळ पौराणिक पात्र

## राहुल गांधींचे अमेरिकेतील विद्यापीठात वक्तव्य

◆ **वॉशिंग्टन, ४ मे**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतील ब्राउन विद्यापीठामध्ये भाषण करताना प्रभू श्रीराम हे 'पौराणिक पात्र' आहेत, असे संबोधित केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर भारतातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून,

ब्राउन विद्यापीठातील वॉटसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल अँड पब्लिक अफेअर्स येथे राहुल गांधी यांच व्याख्यान झाले. यावेळी धर्मनिरपेक्ष राजकारणाची संकल्पना हिंदू राष्ट्रवादाच्या पृष्ठभूमीवर कशी मांडावी, या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना प्रभू राम पौराणिक पात्र असल्याचे राहुल म्हणाले. आपल्या सर्व पुराणकथांतील पात्रे-जसे की प्रभू राम क्षमाशील, करुणाशील होते. भाजपा जे मांडते ते खरे हिंदुत्व नाही. हिंदू विचार अधिक सर्वसमावेशक, सहिष्णु, प्रेमळ व मुक्त आहे. महात्मा गांधी हे याचे सर्वोत्तम उदाहरण आहेत, असे ते म्हणाले.



राहुल गांधींच्या या विधानावर भाजपाने जोरदार टीका केली असून, समाज माध्यमांवर अनेक भाजपा नेत्यांनी राहुल गांधी यांचा व्हिडीओ शेअर करत काँग्रेसच्या रामविरोधी भूमिकेवर सवाल उपस्थित केले आहेत. काँग्रेसकडून अद्याप या टीकांवर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, परंतु पक्षाचे समर्थक राहुल गांधींचे वक्तव्य 'हिंदू धर्माच्या सहिष्णुतेचे महत्त्व' अधोरेखित करणारे असल्याचे म्हणत आहेत.

**शिखांवरील हल्ल्यांची जबाबदारी घेतो**

या कार्यक्रमात एका युवकाने राहुल गांधींना शीख दंगलीबाबत विचारले असता शीख समुदायाला कोणती भीती आहे हे मी मानत नाही. मी शीखविरोधी दंगलींच्या वेळी नव्हतो पण मी त्याची जबाबदारी घेतो. जे घडले ते चुकीचेच होते. या घटनेचे समर्थन केले जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### शंकराचार्य भडकले; हिंदू धर्माबाहेर काढले

राहुल गांधींच्या या वक्तव्यामुळे ज्योतिर्मठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी संतप्त होत त्यांना हिंदू धर्मातून सार्वजनिक रूपात बहिष्कृत करण्याची घोषणा केली आहे. शंकराचार्य म्हणाले की, राहुल गांधींनी संसदेत मनुस्मृतीवर जे वक्तव्य दिले त्यामुळे आधीच सनातन धर्मीय लोक दुखावले गेले आहेत. त्यासंदर्भात त्यांना नोटीसही तीन महिन्यांपूर्वीच पाठवण्यात आली होती. मात्र, ते इतके जास्त व्यस्त आहेत की त्यांनी त्यावर कोणतेही उत्तर दिले नाही किंवा माफीही मागितली नाही. एखादी व्यक्ती वारंवार हिंदू धर्मग्रंथांचा अपमान करत असेल आणि त्याविषयी कोणतेही स्पष्टीकरणदेखील देत नसेल तर त्याला हिंदू धर्मात स्थान दिले जाऊ शकत नाही. यापुढे राहुल गांधी मंदिरात प्रवेशापासून थांबवले जावे आणि पुजाऱ्यांनी त्यांच्याकडून कोणतीही पूजा करून घेऊ नये. कारण त्यांना आता स्वत:ला हिंदू म्हणवून घेण्याचा कोणताही अधिकार राहिलेला नाही.

# विंचुर येथे गॅसचा स्फोट; चार कुटुंब उघड्यावर





## ३५ लाखाचे नुकसान, मनुष्यहानी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचुर येथे रविवार ४ मे रोजी दुपारी एकच्या दरम्यान शिवप्पा लगमण्णा फुलारी, औदूसिद्ध शिवाप्पा फुलारी, बिळेणसिद्ध शिवाप्पा फुलारी, मळसिद्ध शिवप्पा फुलारी यांच्या शेतातील राहत्या घरात गॅस स्फोट झाल्याने भीषण आगीमुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे.

या भीषण आगीत एक खिलार खोंड जागेवर जळून खाक झाले आहे. मात्र या स्फोटात मनुष्यहानी झाले नाही. त्याचबरोबर या घटनेत चारही कुटुंबाच्या घरातील तिजोरी कपाटात असलेले रोख रक्कम पाच लाख तीस हजार रुपये,१३ तोळे सोने,३0 पोती धान्य,एक मोटार सायकल व तसेच घरातील संसार उपयोगी सर्व साहित्य जळून खाक झाले आहे.या घटनेत ३५ लाखाचे नुकसान झाले आहे.या भीषण घटनेमुळे चारही कुटुंबातील १५ सदस्य उघड्यावर आल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे. या घटनेमुळे परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

## अग्रलेख...

# आता सुरू झालाय खरा खेळ...

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथील बैसरण घाटीत पाकिस्तान पुरस्कृत 'द रजिस्टन्स फ्रन्ट' (टीआरएफ) या दहशतवादी संघटनेने पर्यटकांवर अमानवीय हल्ला करून २६ जणांना ठार केले. केंद्रातील भाजपा नेतृत्वाखालील सरकार पाहता या घटनेचे दूरगामी परिणाम होणार याची जाणीव असतानाही एवढे मोठे हत्याकांड घडविण्याची जोखीम टीआरएफने पत्करली. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने बालाकोट येथे हल्ला करून, आम्ही प्रसंगी नियंत्रण रेषा ओलांडून धडा शिकवू शकतो, हे दाखवून दिले. या घटनेला आज पाच वर्षे उलटली. या काळात काश्मिरातील परिस्थितीत बराच बदल झाला. पैसे घेऊन सुरक्षा दलांवर दगडफेड करण्याचे कंत्राट घेणारे आज एक तर तुरुंगात आहेत किंवा चकमकीत ठार झाले. दर शुक्रवारी नमाजानंतर रस्त्यावर उतरून भारतविरोधी नारेबाजी करणे बंद झाले. एकीकडे दहशतवादी संघटना आणि हुरियतसारख्या बंडखोर संघटनांच्या आर्थिक नाड्या आवळून केंद्र सरकारने त्यांना पुरते नेस्तनाबूत केले. लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दिन, अल-बद्र सारख्या संघटनांचे शेकडो दहशतवादी २०१६ नंतरच्या चकमकींमध्ये ठार झाले. काश्मिरी आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांनी विणलेले जाळे खिळखिळे झाल्यानंतर २०१९ मध्ये 'द रजिस्टन्स फ्रन्ट' ही नव्याने डोकेदुखी निर्माण झाली. या संघटनेने केवळ सुरक्षा दलांना नव्हे तर गैर काश्मिरींना ठार मारण्याचे लक्ष्य ठेवले. त्यामुळे सुरक्षा दल आणि प्रशासनासमोरील संकट अधिक गडद झाले. जंगलात लपलेल्या अथवा समोरून हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांशी लढा देणे एकवेळ सोपे, पण नागरिकांमध्ये राहून टार्गेट किलिंग करणाऱ्या धर्मवेड्यांचा सामना करणे कठीण. आज टीआरएफ जे काही करीत आहे ते याच श्रेणीतील आहे.

उरी, पुलवामा आणि आता पहलगाम या तीन दहशतवादी घटना भारतीय सुरक्षा दले आणि गुप्तचर संघटनांची काही प्रमाणात पोलखोल करणाऱ्या आहेत. २०१६ मधील उरी आणि २०१९ मधील पुलवामा या दोन्ही घटनांमध्ये दहशतवाद्यांनी लष्कराला टार्गेट केले होते. त्याचा बदलाही भारताने लष्करी कारवाया करून घेतला होता. पण पहलगाम हल्ल्यात नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. या घटनेची मुळे खोलवर रुजलेली आहेत. एनआयचा तपास जसाजसा पुढे जातो आहे तसा स्थानिकांचा सहभाग पुढे येतो आहे. काश्मिरात वरवर दिसणाऱ्या शांततेच्या आवरणाच्या आत देशद्रोही आणि अस्तनीतील साप वळवळ करीत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे सध्यातरी काश्मिरात कितीही विकास केला, आर्थिक सुबत्ता आली तरी संकट मात्र कायम राहणार असल्याचे दिसते.

पहलगामनंतर भारत आता पुन्हा एकदा उरी अथवा बालाकोटसारख्या लष्करी कारवाया करेल, असे नागरिकांना वाटण्यात काही गैर नाही. कारण, सरकार आणि सत्ताधारी पक्ष या घटनांची सातत्याने उजळणी करीत असतात. त्यामुळे दररोज रात्री झोपताना उद्या सकाळी काहीतरी घडलेले असेल, अशी भावना नागरिकांमध्ये प्रबळ झाली आहे. विरोधी पक्षांनाही असेच वाटत आहे. अर्थात विरोधकांचा हा प्रकार डिवचण्याचा आहे. पण, पहलमाग हल्ल्यानंतर भारत जी पावले उचलत आहे ते पाहून केवळ लष्करी कारवाई करून वरवरची मलमपट्टी आणि काही उथळ प्रवृत्तीच्या देशभक्तांमध्ये क्षणिक वीरश्री संचारण्यासारखी कृती न करता पाकिस्तानला कायमस्वरूपी धडा शिकविण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. सध्याच्या अद्ययावत सामरिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्यक्ष रणांगणावरील युद्ध हा अंतिम पर्याय असावा. कारण शत्रूची क्षमता ही आता संख्येवर नव्हे तर तो किती परिणामकारक आहे, यावर ठरते. तसेही पाकिस्तानला गमावण्यासारखे काहीच नाही. तेथून जो काही विरोध होईल तो लष्करी पातळीवरूनच. आर्थिक पातळीवर पाकिस्तान पुरता संकटात सापडलेला आहे. भारताने एकवेळ तात्पुरती लष्करी कारवाई करून वेळ मारून नेणे पाकिस्तानला परवडेल, अशी तेथील राजकारण्यांची भावना आहे पण पहलगामनंतर भारत एकामागून एक जी पावले उचलत आहे ती पाकिस्तानच्या विनाशास कारणीभूत ठरणारी आहेत. सिंधू पाणी वाटप करार स्थगित करणे हा पाकिस्तानच्या वर्मावर घातलेला घाव आहे. कारण याचे दूरगामी परिणाम स्वातपासून तर सिंधपर्यंत दिसणार आहेत. तसाही पाकिस्तानचा सिंध प्रांत आतून खदखदतो आहे. पाकिस्तानी लष्कर आणि राजकारणात पंजाब्यांचे वर्चस्व आहे. पंजाब आमच्या वाट्याचे पाणी पळवीत असल्याचा आरोप सिंधचा आहे. पंजाबमधील ८० टक्के शेती ही पश्चिमीवाहिनी नद्यांवर अवलंबून आहे. भारताने जर सिंधू नदीचे पाणी अडविले तर पाकिस्तानचा सिंध प्रांत पाण्यावाचून तडफडणार आहे. मग, येथे खरा संघर्ष सुरू होईल तो जनता आणि सरकार यांच्यात. कारण युद्धाची खुमारी फार काळ टिकत नाही. पण, पोटात अन्नच नसेल तर जनता कुठल्याही थराला जाऊ शकते. अर्थात पाण्यासाठी पाकिस्तानात गृहयुद्ध भडकण्याची शक्यता आहे. अर्थात लगेचच पाणी अडविले जाणार असेही नाही. २०१६ मध्ये जेव्हा उरी येथे दहशतवादी हल्ला झाला होता तेव्हाच पाणी आणि रक्त एकत्रपणे वाहू शकत नाही, असा इशारा भारताने दिला होता. दोन्ही देशांमध्ये अटारी-वाघा सीमेवरून जो काही थोडाफार व्यापार होत होता तोही आता बंद झाला. सीमेचे दरवाजे बंद केल्यानंतर आता पाकिस्तानवर व्यापारबंदी घातली. याचा परिणाम सीमेपलीकडील अर्थव्यवस्थेवर होणार आहे. भारत मोठ्या प्रमाणात सुकामेवा आणि साखर, कापूस, फळे, मीठ, रत्न-खडे आदी साहित्य प्रत्यक्ष अथवा तिसऱ्या देशाच्या माध्यमातून आयात करीत असे. भारतातील बाजारपेठ पाहता पाकिस्तानला व्यापारात फायदा होत असे. पण व्यापारबंदीने पाकिस्तानला मोठा फटका बसणार आहे. आता दोन्ही देशांतील व्यापार शून्य होणार आहे. औषधे निर्मिती आणि उत्पादन क्षेत्रात आज भारताचा दबदबा आहे. कोविडच्या काळात साऱ्या जगाला याची प्रचीती आली. गरीब देशांना मोफत लसही भारताने पुरविली होती. अमेरिकेच्या ४० टक्के जेनरिक औषधांची गरज भारत पूर्ण करतो. वाघा-अटारी सीमेवरून आणि खाडी देशांच्या माध्यमातून पाकिस्तान भारतातून अगदी पॅरासिटेमॉल गोळीपासून तर जीवनरक्षक औषधांची आयात करतो. अनेकवेळा दहशतवादी हल्ले होऊनही दिल्लीने मानवीय आधारावर औषधांची निर्यात थांबविली नव्हती. कोविड काळातही युनोच्या माध्यमातून कोविड लसींचा पुरवठा पाकिस्तानला केला होता. पण, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाम हल्ला घडवून आणल्यानंतर भारताच्या संयमाचा अंत झाला आणि पाकिस्तानसोबत सर्वच प्रकारचे व्यापारी संबंध संपुष्टात आणले. परिणामी इस्लामाबादला आता स्वस्त आणि परवडणारी भारतीय औषधे मिळणार नाहीत. आधीच आर्थिक तंगीने त्रस्त असलेल्या जनतेला महागडी औषधे खरेदी करावी लागणार आहेत. भारत वेगाने मेडिकल हब म्हणून उदयास येत असल्याने येथील स्वस्त उपचाराचा फायदा पाकिस्तानी नागरिकांना होत असे. वैद्यकीय व्हिसा घेऊन दरवर्षी असंख्य पाकिस्तानी नागरिक भारतात उपचार करण्यासाठी येत असत. काहीवेळा गरीब नागरिकांवर मोफत शस्त्रक्रिया केल्याची उदाहरणेही आहेत. पण, व्हिसा बंद केल्याने पाकिस्तानी नागरिकांना स्वस्त वैद्यकीय उपचारांचा लाभ घेता येणार नाही. त्यामुळे शस्त्रांचा वापर करून नव्हे तर शत्रूला त्याच्याच भूमीवर नामोहरम करणे म्हणजे खरा विजय होय. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धापेक्षा पाणीबंदी, व्यापारबंदी, सीमाबंदी, टपालबंदी, व्हिसाबंदीमुळे पाकिस्तानचे प्रचंड आणि अगणित नुकसान होणार आहे. परिणामी पाकिस्तानला ताळ्यावर आणण्यासाठी युद्धाचा लगेच अवलंब न करता मोदी सरकारने एकाचवेळी विविध आयुधांचा वापर करीत पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी केली आहे. एवढेच नव्हे, तर बागलीहार धरणाचे दरवाजे बंद करीत चिनाब नदीचे पाकिस्तानला जाणारे पाणीही रोखले आहे. भारताच्या या कृतीने पाकिस्तानला दिवसा तारे दिसू लागतील. भारताने पाणी अडविल्यास क्षेपणास्त्रांचा मारा करू, आमच्याकडे असलेले १७० अणुबॉम्ब भारतासाठीच राखून ठेवले आहेत, पाकिस्तानकडे गमावण्यासारखे काहीच नाही, सिंधू नदीतून एकतर पाणी वाहील किंवा भारतीयांचे रक्त, अशी पाकिस्तानकडून केली जाणारी वक्तव्ये म्हणजे त्यांनी घेतलेली धास्ती आणि होणारी तडफड दिसून येते. आता तर खरा खेळ सुरू झाला आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# एका राष्ट्रपतींची वैद्यकीय तपासणी!

'द डेंजरस केस ऑफ डोनाल्ड ट्रम्प!' २०१७ साली प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाची जोरदार विक्री सध्या अमेरिकेत सुरू आहे. २७ मानसोपचार तज्ज्ञांचा अभिप्राय असलेले हे पुस्तक बॅण्डी ली यांनी लिहिले आहे. एक राष्ट्रपती म्हणून ट्रम्प किती घातक ठरतील याचे विवेचन या पुस्तकात करण्यात आले होते. ट्रम्प यांच्या राष्ट्रपतिपदाच्या पहिल्या कार्यकाळात ते प्रसिद्ध झाले होते. विशेष म्हणजे पुस्तक लिहिले जात असताना ट्रम्प हे राष्ट्रपती होते आणि आज त्या पुस्तकाचा प्रत्यय साऱ्या जगाला येत आहे. मात्र या पुस्तकात एक त्रुटी असल्याचे काहींना वाटते.

**'गोल्डन फिश रुल'** : 'गोल्डन फिश रुल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका नियमाचे यात पालन करण्यात आलेले नाही असे या मंडळींना वाटते. रुग्णाची प्रत्यक्ष तपासणी करूनच कोणताही निष्कर्ष काढण्यात यावा याला 'गोल्डन फिश रुल' म्हटले जाते. या मानसोपचार तज्ज्ञांनी ट्रम्प यांची प्रत्यक्ष तपासणी न करता आपले निष्कर्ष काढले असल्याने त्यांनी या नियमाचे पालन केलेले नाही व म्हणून त्यांच्या निष्कर्षांवर विश्वास ठेवता येणार नाही असे या पुस्तकाला विरोध करणाऱ्यांचे प्रतिपादन आहे.

**वैद्यकीय तपासणी** : मेरिलॅण्डमधील वॉल्टर रिड नॅशनल मिलिटरी मेडिकल सेंटर या रुग्णालयात राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांची सखोल वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि या तपासणीचे निष्कर्ष व्हाईट हाऊसने जारी केले. अमेरिकेत ही एक परंपरा आहे. चांगली परंपरा आहे. राष्ट्रपती ट्रम्प एकदम तंदुरुस्त असल्याचा निष्कर्ष या वैद्यकीय चाचणीवरून काढण्यात येत आहे. ट्रम्प यांनी आपल्या आयुष्यात कधीही सिगारेट वा दारू यांचे सेवन केले नसल्याचेही या अधिकृत वैद्यकीय अहवालात सांगण्यात आले आहे. ट्रम्प यांची शारीरीक स्थिती ठीक असल्यानेच ते गोल्फ या खेळाच्या अनेक स्पर्धा आजही जिंकत असल्याचे व्हाईट हाऊसने म्हटले आहे.

**प्रश्न मानसिक स्थितीचा** : राष्ट्रपती ट्रम्प यांची शारीरिक स्थिती एकदम ठीक असली तरी त्यांची मानसिक अवस्था ठीक नसावी असे अनेकांना वाटत आहे. व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात ते ज्या पद्धतीने बोलतात, वागतात त्यावरून हा निष्कर्ष काढला जात आहे. जगातील वेगवेगळ्या देशांचे राष्ट्रपती, प्रमुख व्हाईट हाऊसच्या ओव्हल कार्यालयात गेले असताना, ट्रम्प त्यांना ज्या पद्धतीने अपमानित करतात, वेगवेगळ्या वाहिन्यांच्या पत्रकारांना अपमानित करतात ते सर्वांना दिसत आहे. हे आजवर कधी घडले नव्हते. ट्रम्प यांचे हे वर्तन पाहिल्यानंतर ते राष्ट्रपतिपदासाठी खरोखरीच पात्र आहेत काय, असा प्रश्न अमेरिकेत विचारला जाऊ लागला आहे.



**पराभवाचे कारण** : २०२४ च्या नोव्हेंबर महिन्यात झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत ट्रम्प विजयी झाले असे म्हणण्यापेक्षा पदासीन राष्ट्रपती जो बायडेन पराभूत झाले. बायडेन यांच्या पराभवाचे मुख्य कारण होते त्यांची शारीरीक व मानसिक अवस्था. बायडेन यांना अनेक बाबी स्मरणात राहात नव्हत्या. चालताना ते अडखळत होते. या साऱ्याचा फटका डेमोक्रॅट उमेदवार कमला हॅरिस यांना बसला. वास्तविक बायडेन यांची धोरणे अमेरिकेसाठी चांगली होती. त्यांनी नाटोला मजबूत केले. युद्धजन्य युक्रेनला भेट दिली. अमेरिकेच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा केली. बेरोजगारीचा दर कमी केला. औद्योगिक उत्पादन वाढले. प्रकृतीने साथ दिली असती तर बायडेन पुन्हा निवडून आले असते. पण, ढासळत्या शारीरीक व मानसिक स्थितीने ते पराभूत झाले असे मानले गेले.

**नवा अवतार** : राष्ट्रपतिपदावर विराजमान झाल्यापासून ट्रम्प, त्यांचे उपराष्ट्रपती वान्स जसे वागत आहेत तसे वर्तन आजवर कोणत्याही राष्ट्रपतीने केलेले नाही. शालीनता व मुत्सद्देगिरीचे सारे नियम धाब्यावर बसवून दोघेही सरकार चालवीत आहेत.

**हार्वर्ड - एक विनोद** : हार्वर्ड हे एक जागतिक दर्जाचे विद्यापीठ मानले जाते. ट्रम्प यांनी या विद्यापीठाला जणू लक्ष्य केल्यासारखे दिसत आहे. या विद्यापीठाला अमेरिकेच्या केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान बंद करण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. ''हार्वर्ड विद्यापीठ तसाही एक मोठा विनोद आहे. ते बंद पडल्याने काहीही बिघडणार नाही. त्यांना संघीय सरकारकडून अनुदान हवे असेल तर काही अटींची पूर्तता करावी लागेल. आपल्या कामात पारदर्शिता आणावी लागेल. तरच त्यांना हे अनुदान मिळू शकेल'', असे ट्रम्प यांनी म्हटल्यानंतर या विद्यापीठाने ट्रम्प प्रशासनाच्या अटी स्वीकारण्यास नकार दिला. अर्थात हे त्यांचे ताजे विधान आहे. कॅनडासारख्या मित्र देशाचा उल्लेख ते अमेरिकेचे ५१ वे राज्य असा करतात तेव्हा ट्रम्प यांचे मानसिक संतुलन किती ढळले असावे याची कल्पना करता येईल.

**केवळ शब्दांचा खेळ** : राष्ट्रपती ट्रम्प सत्तेवर आल्यापासून त्यांनी केवळ शब्दांचा खेळ चालविला असल्याचे आता मानले जात आहे. टेरिफ म्हणजे आयात शुल्क प्रकरण त्यांनी ज्याप्रकारे हाताळले त्याने साऱ्या जगाला मंदीच्या सावटाखाली आणले आहे. जागतिक व्यापार संघटनेने याबाबत नवे आकडे जारी केले असून, जगाची अर्थव्यवस्था निश्चितच मंदावणार असल्याचे म्हटले आहे.

**असभ्य भाषा** : जगातील अन्य देशांच्या प्रमुखांसाठी ट्रम्प उच्चारीत असलेली भाषा केवळ अहंकाराची नाही तर असभ्य ठरावी अशी आहे. ट्रम्प यांच्या काही शब्दांचा उल्लेख या स्तंभातही करू नये एवढा असभ्य आहे. अमेरिकेतच काय, कोणत्याही देशाचे प्रमुख दुसऱ्या देशांच्या प्रमुखासाठी अशा शब्दांचा वापर करीत नसतात. आंतरराष्ट्रीय संबंधात तर भाषा सर्वांत महत्त्वाची मानली जाते. पण, ट्रम्प साऱ्या मर्यादा वाऱ्यावर सोडून वागत आहेत.

**पत्रकारांचा अपमान** : व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या नियमित पत्रपरिषदांमध्ये अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना अपमानित करणे हा तर ट्रम्प यांचा जणू खेळ झाला आहे. सीएनएनसारख्या वाहिनीबाबत ते त्या वाहिनीच्या वार्ताहरास म्हणाले, ''सीएनएन चॅनेल आता कुणीही पाहात नाही. त्यामुळे तुमच्या प्रश्नाला काहीही अर्थ राहिलेला नाही.'' फॉक्स नावाचे एकमेव चॅनेल ट्रम्प यांच्या बाजूने बोलत असते. हे चॅनेल वगळता अन्य सर्व चॅनेलवर त्यांनी जणू बहिष्कार घातला आहे.

**आसन व्यवस्था** : व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या पत्रपरिषदांमध्ये पत्रकारांची आसन व्यवस्था तेथील पत्रकार संघटना ठरवीत आली आहे. ट्रम्प प्रशासनाने ही व्यवस्था बदलण्याचा निर्णय घेतला असून, सरकारी अधिकारी ती ठरविणार आहेत. अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना मागील रांगेत तर सोयीचे सोपे प्रश्न विचारणारे पत्रकार समोरच्या रांगेत बसणार अशी नवी व्यवस्था व्हाईट हाऊस करणार आहे.

**मानसिक तपासणी** : बहुतेक देशाच्या राज्यघटनेत राष्ट्रपती वा पंतप्रधान यांच्या पात्रतेबाबत जे काही नमूद करण्यात आले आहे, त्यात त्याचे मानसिक संतुलन ही महत्त्वाची अट घालण्यात आली आहे. राष्ट्रपती ट्रम्प आपल्या कारकीर्दीचे १०० दिवस पूर्ण करीत असताना, त्यांच्या विधानांमुळे अमेरिकन जनमानस व जगातही त्यांच्या मानसिक संतुलनाबाबत प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत. राष्ट्रपती ट्रम्प यांची सध्याची वाटचाल अशीच चालू राहिल्यास येणाऱ्या काही काळात ट्रम्प यांच्या मानसिक संतुलनाची तपासणी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर झाल्यास आश्चर्य वाटू नये.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# ३६५ दिवसही हवी गतिमानता!

समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळावा, त्याची कामे तातडीने पूर्णत्वास जावी, प्रशासनात गतिमानता यावी म्हणून ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्रात याला उत्तम प्रतिसाद मिळाला. नागपूर ग्रामीण पोलिसांनी तर १०० पैकी ८० गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळवला. पालघरने पहिला क्रमांक पटकावला. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन.

पण प्रशासनात गतिमानता यावी म्हणून केवळ १०० दिवस कशाला, माझ्या मते ३६५ दिवस उपक्रम सुरू ठेवायला हवा. केवळ खानापूर्ती म्हणून नव्हे, तर हा उपक्रम मनापासून प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वीकारायला हवा. शासकीय विभागांचा विचार करता, पोलिस खाते २४ तास ३६५ दिवस सुरू राहते. विशेष म्हणजे पोलिस कर्मचारी सकाळी आणि सायंकाळी रोल कॉलच्या वेळी राष्ट्रगीत म्हणतात. याचा अर्थ ते दररोज १०४ सेकंद राष्ट्रगीताला देतात. राष्ट्रगीत म्हणण्यासाठी ५२ सेकंद लागतात. आता एका वर्षाचा विचार केला तर ३७९६० सेकंद पोलिस आपल्या आयुष्यातील राष्ट्राला समर्पित करतात. इतर विभागांतील कर्मचारी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि १ मे महाराष्ट्र दिनी म्हणजे केवळ तीन वेळा राष्ट्रगीत म्हणतात. समजा एखाद्याने वैद्यकीय रजा घेतली तर मग त्याची त्यातूनही सुटका होते. अशा प्रकारे वागणारे हे सरकारी विभागातील बाबूंची कार्यपद्धती बदलविण्याची वेळ आलेली आहे. पोलिस जर दररोज राष्ट्रगीताने कामकाज सुरू करतात तर मग इतर विभागातही तशीच पद्धत यायला नको का? तेही शासनाचे कर्मचारीच आहेत ना? अग्निशमन विभागही चोवीस तास कार्यरत राहतो. पण इतर विभागांचे काय? ते तर मस्तपैकी शनिवार, रविवार सुटी उपभोगतात. सुटी घेण्यास कुणाचीही हरकत नाही. मग सामान्य माणसांच्या कार्याचे काय? पोलिस विभाग जसा चोवीस तास कार्यप्रवण राहतो अगदी त्यानुसार इतरही खात्यांची रचना आता करण्याची वेळ आलेली आहे. पोलिसांकडे केव्हाही गेले तर त्यांच्याकडून पीडितांना मदत मिळते. त्यांना दिलासा मिळून ते सुखावतात, तरीही बदनामी केवळ आणि केवळ पोलिस खात्याचीच केली जाते. इतर विभागांतील मंडळी पोलिसांएवढाच किंबहुना त्यापेक्षा जास्त पगार घेतात. शनिवार, रविवार आणि इतरही सणांच्या सुट्या उपभोगतात. पण कामाची वेळ आली की, तोडपाणी केल्याशिवाय फाईल पुढे सरकवतच नाही. तरीही त्यांना जनता मानसन्मान देते. हा मानसन्मान पाहायचा असेल तर भूखंड, सदनिका, शेतीच्या संदर्भातील खरेदी-विक्रीपत्र तयार करणाऱ्या कार्यालयात जा. तिथे नियमापलीकडे अधिकचे पैसे देऊनही धन्यवाद म्हटले जाते. असा भेदभाव का, यावरही चिंतन करायची वेळ आलेली आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. ते शनिवार आणि रविवारला बंद असतात. मग दोन दिवस एखादी व्यक्ती आजारी पडली तर त्याने घरीच मरावे का? यावर उपाय म्हणजे प्रत्येकाची आठवडी सुटी वेगवेगळी ठेवावी. जेणेकरून कामावर कुठेही परिणाम होणार नाही अन् तो विभाग सातत्याने कार्यप्रवण राहील. पोलिस खात्यात प्रत्येकाच्या सुट्या वेगवेगळ्या असतात. तिथे कुठेही कामात खंड पडत नाही. मग असाच प्रघात आता इतरही शासकीय विभागांच्या संदर्भात सुरू व्हायला हवा. बँकांमध्येही ही सुविधा यायला हवी. आज शाळा, महाविद्यालये आणि बँकांच्या सुट्या पाहून हेवा वाटतो अन् यांना पगार नेमका कशाचा देतात असाच प्रश्न सामान्यांना पडतो. 'काम नाही पगार नाही' हे तत्त्व फक्त खाजगीत वापरतात. मग सरकारी खात्यात हा नियम लावायला कुणी मनाई केली आहे का? यावर कुणी चिंतनरूपी कृती करणार काय? शंभर दिवसांचा उपक्रम सुरू असताना केवळ पोलिस खाते सक्रिय होते. इतर विभागांनी केवळ खानापूर्ती केली याचीही नोंद मुख्यमंत्र्यांनी घ्यायला हवी. रामराज्य आणायचे असेल तर सामान्यातला सामान्य माणूस तहसील कार्यालयात जाताना आनंदित व्हावा. पटवाऱ्याकडे किंवा कृषी खात्याच्या कार्यालयात जाताना त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटायला हवे. पशुवैद्यकीय दवाखान्यात जाताना त्याच्यात उत्साह दिसायला हवा. प्राथमिक आरोग्य केंद्रात, ग्रामीण रुग्णालयात, बँकेत आणि विशेषतः प्रादेशिक परिवहन खात्याच्या कार्यालयात गेल्यावर तो सुखावला पाहिजे. प्रत्यक्षात तसे घडत नाही. येथेच रामराज्याची संकल्पना धुळीस मिळते. क्षुल्लक काम असले तरी सामान्यांना अधिकाधिक त्रास देण्याची क्रूर पद्धत येथे अस्तित्वात आहे. ती व्यवस्था मोडण्याची ताकद कुणातही नाही. यावरच जो आळा घालणार, तोच माझ्या मते राजा ठरणार?

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# अश्लीलतेवर 'सुप्रीम' प्रहार

काही दिवसांपूर्वी माननीय सर्वोच्च न्यायालयाने विविध ओटीपी प्लॅटफॉर्म व समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अश्लील साहित्याबद्दल नाराजी व्यक्त करत सरकार व ओटीटी प्लॅटफॉर्म जसे की उल्लू, नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राईम, मुबी, एएलटी बालाजी व समाज माध्यमे जसे की एक्स कॉर्प, गूगल, मेटा इंक व ॲप्पल यांना करणे दाखवा नोटीस दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर दाखविण्यात येणाऱ्या अश्लील सामुग्रीला गंभीर व चिंताजनक मानलेले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची शाई वाळते न वाळते तोच एजाज खान याच्या उल्लू ॲपवरील 'हाऊस अरेस्ट' या कार्यक्रमाची एक व्हिडीओ क्लिप समाज माध्यमांवर चर्चेचा विषय झाली. या व्हिडीओमध्ये एजाज खान त्याच्या कार्यक्रमात काम करणाऱ्या अर्धनग्न महिला स्पर्धकांना किमान कपडे ठेवायला सांगत होता. त्याचप्रमाणे स्पर्धकांना म्हणजे महिला व पुरुष स्पर्धकांना योगासनांच्या माध्यमातून काम संदेश द्यायला सांगत होता. ज्यावेळेस लोकांनी ही व्हिडीओ क्लिप पाहिली त्यावेळेस प्रेक्षकांनी सुद्धा याच्यावर प्रचंड टीका केली. महिला आयोगाने सुद्धा त्याच्यावर टीका केली. तसेच राजकीय नेत्यांनी सुद्धा यावर प्रचंड टीका व नाराजी व्यक्त केली. त्यानंतर उल्लू ॲपवरून 'हाऊस अरेस्ट' कार्यक्रमाचे सर्व भाग काढून टाकण्यात आले. आजपासून तीस वर्षांपूर्वी अशा पद्धतीचे ओटीपी ॲप किंवा समाज माध्यम नव्हते. त्यावेळेस इंग्रजी सिनेमांमधून अशा पद्धतीची दृश्ये दाखविली जायची व काही ठरावीक सिनेमागृहांमध्ये ते प्रदर्शित व्हायचे. अशा चित्रपटगृहांत जाणाऱ्या प्रेक्षकांकडे लोक चांगल्या नजरेने पाहत नव्हते. हळूहळू व्हीसीआर आले व त्यावर अशा पद्धतीच्या सिनेमांचे शौकीन सिनेमे पाहू लागले. परंतु अशा पद्धतीचे सिनेमे व त्याच्या कॅसेट यावर सुद्धा सार्वजनिक बंदी होती. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अशा पद्धतीचे प्रदर्शन होत नव्हते. यामध्ये एकांतात किंवा चोरून लपून पाहणाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. त्यानंतर डीव्हीडी प्लेयर आले. पातळ चकत्या असलेल्या डीव्हीडी सर्वत्र चौकाचौकात विकायला ठेवल्या जाऊ लागल्या. यामध्ये अशा विषयांच्या डीव्हीडीची संख्या पण मोठी असायची. ज्यांना बघायचे आहे ते रस्त्यावरून अशा



डीव्हीडी विकत घेत होते व घरी जाऊन एकांतात बघत होते. व्हीसीआर व डीव्हीडी प्लेयर यांच्या काळात कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या खोलीवर आणून ते बघायला सुरुवात केली. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा खूप मोठा पैसा अशा पद्धतीचे सिनेमे निर्माण करणे, प्रदर्शित करणे व भारतातील तरुणांपर्यंत डीव्हीडीच्या माध्यमातून पोहोचविणे यामध्ये लागला होता असे त्यावेळी बोलले जात होते.

जी पायवाट होती तिची कुठे गाडीवाट झाली व तिचे नंतर महामार्गात रूपांतर झाले. म्हणजे जे पूर्वी लोक चोरून लपवून करत त्या मार्गावर देशातील तरुणाई चालू लागली व त्याचे लोण सर्व महाविद्यालयांत पसरत आज त्याचा महामार्ग झालेला आहे. आता याही गोष्टी जुन्या झालेल्या आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म कधी सुरू झाले हे लोकांना समजलेही नाही. समाज माध्यमांवर अश्लील सामुग्री हळूहळू पाठविता पाठविता लोकांना त्याची सवय लावली गेली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून एकदा जर तुम्ही अशा पद्धतीची सामुग्री पाहणे सुरू केले तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून त्यांना समजते आणि तुम्हाला तशाच पद्धतीची सामुग्री वारंवार पाठविली जाते आणि मग तुम्ही नकळत अशी सामुग्री पाहण्याच्या अधीन होऊन जाता. तुम्हाला त्याची सवय लागून जाते.

जे पूर्वी वयस्कर लोक पाहायचे ते त्यानंतर तरुण पिढी पाहायला लागली व काही वर्षांपूर्वी ज्या गोष्टी तरुण पिढी पाहायची आज त्या गोष्टी शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनी बघत आहेत. त्यामुळे आता या सर्व सामुग्रीचे उपभोक्ता शालेय विद्यार्थी, तरुण विद्यार्थी, वयस्कर व वृद्ध सुद्धा झालेले आहे. या सर्व गोष्टींचे अतिशय दूरगामी परिणाम आहेत. ही सर्व सामुग्री पहिल्यामुळे मनामध्ये विशिष्ट गोष्टींचे जागरण व चिंतन सुरू होते. सातत्याने तेच चिंतन असल्यामुळे त्या गोष्टींचा आग्रह वाढतो व त्यातूनच अपराध निर्माण होतात. आज आपण पाहतो की अशा पद्धतीच्या अपराध्यांच्या शृंखलेमध्ये अल्पवयीन विद्यार्थ्यांपासून ते वृद्ध लोकांपर्यंत सर्वांचाच समावेश आहे. अशा साहित्याचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक सर्वच प्रकारचे परिणाम आहेत. आज इतके वर्ष झाले या सर्व गोष्टी चालू आहे परंतु सामाजिक संकोचाने असो किंवा कशानेही परंतु या गोष्टी उघडपणे भाषणांमधून मांडायला कोणी तयार नाही. लेखांमधून फारसे लिखाण सुद्धा या विषयावर झालेले दिसत नाही. प्रत्येकाला वाटते की मी या विषयाला हात का घालावा परंतु या विषयाला हात घालणे हे सामाजिक कार्यच आहे. ज्यांची बुद्धी, ज्यांचे मन अशा पद्धतीच्या गोष्टींच्या आहारी गेलेले आहे ते विद्यार्थी अभ्यासामध्ये कोणते मोठे चमत्कार घडवून आणू शकतील? त्यांची बुद्धी कोणते नवीन शोध लावू शकेल? त्यांचे शरीर देशांच्या शत्रूशी कसे लढू शकेल? भारत हा ज्ञानामध्ये रत असलेल्या लोकांचा देश आहे. परंतु आजचे विद्यार्थी आणि तरुण जर याच गोष्टींमध्ये राहत असले तर ते स्वतःचे करीअर सुद्धा बनवू शकणार नाही आणि त्यांचे भविष्य सुद्धा अंधकारमय राहील. अशा विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांना सुद्धा फार त्रास सहन करावा लागेल. या सर्व गोष्टींचा सामाजिक मूल्यांवर सुद्धा खूप मोठा प्रभाव पडणार आहे आणि पडत आहे. समाजामध्ये देशातून, विदेशांतून शिरणाऱ्या अशा सर्वच गोष्टींचे राजकीय व सामाजिक नेतृत्वाकडून चिंतन व्हायला पाहिजे. विशेषतः समाजामध्ये संस्कार आणि सत्प्रवृत्तीचे जागरण करणाऱ्या संस्थांनी तर याच्यावर विचार आणि क्रिया करण्याची नितांत आवश्यकता आहे. आता इतका उशीर झाल्यावर जनहित याचिका दाखल झाली. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालयाने आपले मत मांडले व कारणे दाखवा नोटीस पाठविली. परंतु इतके दिवस हा जो धांगडधिंगा, हैदोस सुरू होता त्याच्यावर सर्वच लोक मौन पाळून होते. महिलांची सामाजिक सुरक्षा या विषयावर जे अनेक लोक बोलतात, लिहितात त्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण आहे याचा विचार आवश्यक आहे.

एखाद्या ठिकाणी चोर चोरी करताना दिसला तर त्याला पकडले पाहिजे. पकडू नसेल शकत तर पोलिसांना कळविले पाहिजे. तेही करू शकत नसेल तर चोर चोर म्हणून ओरडले पाहिजे. मोहल्ल्यातील लोकांना जागे केले पाहिजे. न्यायालय, सरकारी यंत्रणा, प्रशासन त्यांचे काम करीलच परंतु त्यांची वाट न पाहता समाजाने सुद्धा जे चुकीचे होत आहे त्यावर बोलले पाहिजे, लिहिले पाहिजे व समाज जागृतीचे काम सुरू ठेवले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती सुद्धा! माणसांचे स्वभाव वेगळे, आवडीनिवडी वेगळ्या, त्यामुळे आज आपण बघतो की प्रत्येक घरात काही ना काही कुरबुरी, भांडण असतात. प्रत्येकच व्यक्ती मीच बरोबर आणि समोरचा चूक असं गृहीतक मांडत असतो. समाजात, राजकारणात सगळीकडे विचारांच्या देवाणघेवाणीपेक्षा वादविवाद आणि भांडणच जास्त दिसतात. या सगळ्यात आपण खळखळून हसणं विसरूनच गेलो आहे. त्यामुळे स्वास्थ्य हरवून बसलो आहे. असं का होतंय? सगळ्यांची सहनशक्ती संपली का? की आपल्यातला अहंकार आणि आपल्या स्वभावातले दोष याला कारणीभूत आहेत? होय नक्कीच! वरील सर्व समस्यांचं मूळ हेच आहे. अहंमुळे कोणीच माघार घ्यायला तयार होत नाही. तर स्वभावदोषांमुळे मनुष्य सदसद्विवेक हरवून बसतो. आपण स्वतः स्वतःचे आत्मपरीक्षण केले तर लक्षात येईल की, राग, लोभ, द्वेष, ईर्ष्या, स्पर्धा यांनी आपण अगदी काठोकाठ भरलो आहोत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्याला किती राग येतो आणि त्याची कोणती कारणे आहेत. हे लिहून काढले तर सहजच त्याची तीव्रता लक्षात येईल. आज प्रत्येक व्यक्ती घरातल्या भांडणामुळे वैतागला आहे. त्यातून आत्महत्या, निराशा, आजारपण यांनी आपल्याला कवटाळले आहे. नवीन पिढीत तर घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. त्यामुळे मुलांवर संस्कार नाही. आई-वडिलांचे प्रेम नाही. त्यांचा वेळ मिळत नाही आणि आपसूकच त्यांच्यात सगळ्या दोषांचा शिरकाव होतो. यासाठी आपणच आपले दोष ओळखू या. अहं कमी करूया आणि आनंदाने जगूया! म्हणजे भारताचे आनंदाच्या यादीतले स्थान नक्कीच वर जाईल. घर आनंदी, तर समाज आनंदी आणि त्यामुळे देश आनंदी.

**माधवी पत्की**/नागपूर

### समृद्धी महामार्गावरील वाढते अपघात चिंताजनक

मागील तीन-चार महिन्यांत समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या घटली होती. मात्र एप्रिल महिन्यापासून अपघातांची संख्या वाढली. तसेच वाहनांनी पेट घेण्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या मार्गावर उन्हाळ्यात वाहन चालविताना चालकांनी खूप सावध राहावे. गाडीचे टायर लवकर तापतात म्हणून गाडी खूप भरधाव चालविणे टाळावे. रात्री वाहन चालविताना झोप येणे किंवा डुलकी लागून अपघात वाढले आहेत. याबाबत चालकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी. चालत्या वाहनाला आगी लागण्याचे प्रकारही खूप वाढले आहेत.

या मार्गावर आग विझविण्यासाठी ज्या अग्निशमन दल गाड्या आहेत त्यांनी सतर्क राहावे, शक्य असल्यास अग्निशमन दल गाड्या वाढवाव्यात. या मार्गावर अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी म्हणून रुग्णवाहिका व इतर वैद्यकीय साहाय्यही उपलब्ध असते, त्यांनी ही सावध राहून तात्काळ मदत करावी. समृद्धी महामार्गावर पोलिस यंत्रणा मोठ्या प्रमाणात सतर्क राहते. ते तत्काळ अपघातस्थळी धाव घेऊन मदत करतात. या सर्व बाबी व महामार्ग शेजारी असलेले ग्रामस्थ यांनी अपघातग्रस्त साहाय्यासाठी सतर्क रहावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाचक पत्रे

### खाजगी शिकवण्यांना नियम आवश्यक

आजकाल खाजगी शिकवण्यांचे फॅड खूप वाढले आहे. शाळेतून खरे म्हणजे १०० टक्के शिक्षण व्हायला पाहिजे, पण ते दुर्दैवाने होत नाही. ते झाले तर खाजगी शिकवण्यांचे धंदे चालणार नाहीत. गरीब कुटुंबांना दोन किंवा जास्त मुले असणाऱ्यांना शिकवणे खूपच जड जाते. शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक वगैरे या बाबतीत हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत आहेत, असे म्हणायला बराच वाव आहे.

बरं, शासन, जिल्हा परिषदा यांचे तर याकडे सपशेल दुर्लक्ष आहे. देश घडविणे व देशाची व्यापक विकासाच्या दिशेने वाटचाल होण्यासाठी शासन व इतर जबाबदार संस्थांनी याकरिता काही पावले उचलणे सध्या तातडीचे झाले आहे. शाळांतूनच शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे, जे शिक्षक शिकवणी वर्ग चालवू इच्छितात, त्यांची नोंद सरकार दरबारी व त्यांच्या शाळांत होणे आवश्यक आहे, शिकवणीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची फी किती असावी, याबाबत सरकार दरबारी नियंत्रण व नोंद असावी, शिकवणी वर्गात शिकवल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता किती आहे, यावर शासनाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे.

या व इतर आवश्यक बाबींचा विचार करूनच पाल्यांनी आपल्या मुलांना शिकवणी वर्गात घालावे. केवळ पैसे आहे म्हणून मुलांना शिकवणी वर्गात टाकणे, म्हणजे आपली जबाबदारी टाळणे होय.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### ग्रामपंचायत अधिकारी जिल्हा युनियन त्रैमासिक सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन जिल्हा सोलापूर यांची त्रैमासिक सभा शिवरत्न सभागृह सोलापूर येथे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा सरचिटणीस दयानंद पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष नारायण ढवळे, सहसचिव किसन माळी, सर्व जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, तालुका अध्यक्ष सचिव उपस्थित होते. यावेळी जिल्हा संघटनेने केलेल्या कामांच्या कार्य अहवालवर चर्चा करण्यात आली. तसेच राज्य संघटनेत घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती देण्यात आली. ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची जिल्हा युनियन त्रैमासिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.



### जय भारत शाळेत कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि. ४ मे**

सोलापूर येथील जय भारत प्राथमिक शाळेत कामगार व महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते धवजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम पुले, सदस्य मारूती माळगे, सचिव दिपक पुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, महेश काडे व सुभाष म्हेत्रे उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले. तर आभार कविता लेंगरे यांनी मानले.



### आधुनिक शिक्षण पद्धतीवर आधारित विवेकानंद स्कूलमध्ये कार्यशाळा

**सोलापूर, दि. ४ मे-**

आधुनिक शिक्षण पद्धतींना समर्पित एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत विवेकानंद पब्लिक स्कूल येथे दोन दिवसीय ''ऍक्टिव लर्निंग व प्रयोगाधिष्ठित शिक्षण''प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. संचालिका संगीता सारडा, प्राचार्या आयेशा इनामदार, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर मंगलूर व प्रशिक्षक सुरेश महालिंगपूर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन सोहळ्याने झाली. या दोन दिवसीय शिबिरात शिक्षकांना ऍक्टिव लर्निंग म्हणजे कृतीवर आधारित शिक्षण, प्रकल्प कार्य, गटचर्चा, खेळ, व प्रयोग या माध्यमातून शिकवण्याच्या विविध प्रभावी पद्धती शिकवण्यात आल्या. या शिबिरात प्राचार्या आयेशा इनामदार व सुरेश महालिंगपूर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी समकालीन शिक्षणपद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद, अनुभवाधिष्ठित शिकवण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर दिला. ''विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून शिकवले गेलेले ज्ञान हे अधिक खोलवर ठसते,'' असे ते म्हणाले. त्यांनी शिक्षकांना प्रेरणादायी विचार दिले आणि शिक्षण हे पुस्तकी न राहता जीवनाशी जोडले जावे, असे आवाहन केले.

### क्वालिटी वॉल्सकडून नवीन ब्रँड बाजारात

**सोलापूर, दि. ४ मे-**

आपल्या उत्पादनांना अधिक वैविध्यपूर्ण बनवण्याच्या दृष्टीकोनातून क्वालिटी वॉल्स या ख्यातनाम ब्रँडने घरच्या घरी आइस्क्रीमचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डेअरी फॅक्टरी हे स्लो चर्न्ड आइस्क्रीम्स बाजारात आणले आहेत. डेअरी फॅक्टरी ही खऱ्या दुधापासून बनवलेली उत्तम दर्जाची क्रीमी आइस्क्रीम्सची श्रेणी आहे. त्याचे रिच टेक्श्चर प्रत्येक चवीसोबत जिभेवर रेंगाळते. या आइस्क्रीम्सचे पार्टी पॅक्स आणि सुंदर टब्स चार लोकप्रिय प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत- व्हॅनिला, बटरस्कॉच, मँगो आणि चॉकलेट. त्यामुळे तुमच्या घरी तुम्हाला उत्तम दर्जाच्या आइस्क्रीमची जादू अनुभवता येईल. ते तुम्हाला जवळच्या स्टोअर्समध्ये आणि क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध होतील.एचयूएलच्या आईस्क्रीम व्यवसायाचे प्रमुख टोलॉय तानरीदागली म्हणाले,आज क्वालिटी वॉल ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संपूर्ण आणि वैविध्यपूर्ण आनंदाची श्रेणी देते. अगदी चविष्ट आइस्क्रीमपासून ते सुलभ मल्टी-फॉर्मेट फ्रोझन डेझर्ट आणि बरेच काही त्यात आहे.

# जिल्हा परिषद पतसंस्थेस राष्ट्रीय पुरस्कार

## गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते झाले वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ४ मे-**

इंटिग्रेटेड सोशल वेल्फेअर सोसायटी चिक बेळगावी व नॅशनल रूरल डेव्हलपमेंट फाउंडेशन बेळगावीतर्फे गोव्याचे मुखमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा परिषद सहकारी पतसंस्था क्रमांक १ ला उल्लेखनिय काम गिरीबद्दल पुरस्कार देण्यात आले.



संस्थेचे चेअरमन डॉ. एस.पी. माने यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी जिल्हा कमांडंट होमगार्ड डिपार्टमेंटचे अरविंद घट्टी, कोल्हापूर महानगरपालिकेचे राजु शिंगाडे पाहुणे म्हणून उपस्थित होते.

संस्थेतर्फे दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात व गोवा या राज्यातील विविध सामाजीक क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याबद्दल विविध व्यक्ती, कर्मचारी पतसंस्था, नागरी पत संस्था, सरपंच, इतर पत संस्था, शिक्षक, मुख्याधापक व इंजिनीअर या सर्व क्षेत्रातील लोकांचे गोवा येथे राष्ट्रीय पुरस्कार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आले. पुरस्कार पतसंस्थेचे जेष्ठ संचालक तथा माजी चेअरमन कै. विवेकानंद लिंगराज यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या योजना व वेळोवेळी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे मिळाला. त्यामुळे हा पुरस्कार त्यांना सर्मपीत करीत आहोत, अशा भावना चेअरमन यांनी व्यक्त केल्या.

त्यांचे समवेत व्हाइस चेअरमन सुरेश कुंभार, संस्थेचे मार्गदर्शक पंडीतराव भोसले, दयानंद परिचारक व सर्व संचालक विष्णू पाटील, शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेटटी, तजमुल मुतवल्ली, विजयकुमार घेरडे, विशाल घोगरे, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाणे, शिवाजी राठोड, किरण लालवोंद्रे, विकास शिंदे, चेतन वाघमारे, मृणालिनी शिंदे, श्वेता राऊत, श्रीशैल देशमुख, नितीन शिंदे आदी उपस्थित होते. त्यावेळी चेअरमन यांनी प्रमुख पाहुणे यांना २०२५ची दिनदर्शिका भेट देऊन क्युआर कोडमध्ये संविधानाची माहिती दिले.

सदर पुरस्कारामध्ये सन्मान चिन्ह, म्हैसूर फेटा, चंदनाचा कायम स्वरूपी हार व भारत सरकारचे केंद्रिय मंत्री यांच्याकडून अभिनंदन पत्र समाविष्ट होते.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या शिक्षक सेना शहराध्यक्षपदी प्रा. कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे**

माजी ऊर्जामंत्री नितीन राउत यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष जयप्रकाश भवसागर व कार्याध्यक्ष राजेश लाडे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या वतीने प्रा. विकास कांबळे यांची सोलापूर शिक्षक सेना शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

ही निवड ॲड. निलेश भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र महासचिव रमेश हसापुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली. यावेळी अनिल धोत्रे, सुभाष माने, कमल अग्रवाल, वैभव धोत्रे, अमित भंडारे, माधुरी कांबळे, निखिल भंडारे, सलमान मुल्ला उपस्थित होते.

## यादगिरी बोल्लू महाराज यांना अध्यात्मिक गौरव पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ४ मे-**

इंचगेरी संप्रदायच्या माध्यमातून अध्यात्मिक मार्गाने समाजातील अनेक तरुणांना व्यसनमुक्त करुन धर्मीक मार्गाने समाजातील अनेक कुटुंबाना आध्यात्मिक मार्गाने समृद्ध केल्याबद्दल यादगिरी बोल्लू महाराज यांना अध्यात्मिक गौरव पुरस्काराने सन्मानित केले.

तसेच समाजाला धर्म परिवर्तन करण्यापासून परावृत्त केल्यामुळे अनेक कुटुंब ख्रिश्चन होण्यापासून वाचले. गुरुवारी १ मे २०२५ रोजी विजापूर रोड येथील इंचगेरी मठातील सत्संग कार्यक्रमांमध्ये यादगिरी बोल्लू (महाराज) यांच्या ६२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून मठाधीश मातोश्री पुष्पलता महाराज पाटील यांच्या हस्ते हा आध्यात्मिक गौरव पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून स्वामी शिवानंदजी महाराज, वनमराठे सर, जमखंडी सर, सुभाष माळी, विश्व हिंदू परिषदेचे धर्म प्रसार प्रमुख जयदेव सुरवसे, सेवा विभाग सहप्रमुख राजेश यनगंटी, डॉ. माधुरी पारपल्लीवार, सिद्धन्ना कारीमुंगी, रवी बुरा, दत्तू पिसके, नरेश यादगिरी बोल्लू , महेश सोमा, नरसिंग दासरी, दयानंद शिंदे, राजेश वडीशेरला आणि अनेक भाविक मंडळींच्या उपस्थितीत हा सोहळा मोठया भक्तिभावाने संपन्न झाला. सत्संगांच्या शेवटी महप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## श्री वीतराग विज्ञान बाल युवा संस्कार शिबिरास सुरुवात





**सोलापूर, दि. ४ मे-**

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान सोलापूर व सर्वोदय विकास प्रभावना ट्रस्ट सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री वीतराग विज्ञान बाल-युवा संस्कार शिबिरास सुरुवात झाली.

हर्षवर्धन शहा वाडीकर व परिवार यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. डॉ. संतोष जोशी, डॉ. अरिंजय दोशी, विजयकुमार शहा व चैतन्य गांधी यांच्या हस्ते क्रमशः जिन संस्कार पाठमाला, बालबोध पाठमाला अभ्यासिका भाग एक-दोन-तीन या ग्रंथाचे शास्त्र विमोचन करण्यात आले. णमोकार स्वाध्याय मंडळचे सुकुमार चंकेश्वरा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अमेय दोशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. धार्मिक अध्ययन करण्यासाठी आलेले पंडित जितेंद्रजी राठी यांनी विद्यार्थ्यांना शिबिराचे महत्त्व पटवून देऊन मार्गदर्शन केले. सर्वच पण्डित विद्वानांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वपरिचय करून दिला व उद्घाटनकर्ता हर्षवर्धन शहा यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक पंडित प्रशांतजी मोहरे यांनी केले. मंगलाचरण दीपा शहा व महिला मंडळ यांनी केले. निशा गांधी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पंडित रवींद्र काळे यांनी केले.

## चारूलता पवार यांचा 'मास्तरांची सावली' पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. ४ मे-**

आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त घेण्यात आलेल्या ३३ व्या श्रम उद्योग परिषदेत पुणे येथील कवी नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीच्या वतीने सोलापूरच्या चारुलता पवार यांचा 'मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पतीची साहित्य विषयक कामात आणि आजारपणात सातत्याने सेवा करणाऱ्या पत्नीला दरवर्षी मास्तरांची सावली हा पुरस्कार दिला जातो यंदाच्या वर्षी सोलापूरच्या कवी माधव पवार यांच्या पत्नी चारुलता यांना सन्मानपूर्वक देण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार




यांच्या हस्ते हा पुरस्कार चारुलता पवार यांना सन्मानपूर्वक पुणे येथे देण्यात आला. यावेळी कवी माधव पवार यांचाही सन्मान करण्यात आला. प्रारंभी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते श्रम उद्योग परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी, पुणेचे सुदाम भोरे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबईचे आयुक्त रविराज इंगळे, प्रख्यात साहित्यिक व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक पुरुषोत्तम सदाफुले यांनी केले. प्रा. दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले. तर अरुण गराडे यांनी आभार मानले. चारुलता पवार यांना हा सन्मान मिळाल्याबद्दल हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर, साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, डॉ. शिवाजीराव देशमुख, ज्येष्ठ साहित्यिक आणि प्रकाशक राजेंद्र भोसले, उल्हास पाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## २५ वर्षापूर्वीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी जागविल्या कॉलेज जीवनाच्या आठवणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यू.आय.टी.), सोलापूर येथील १९९९-२००० या वर्षी अंतिम वर्षात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा डब्ल्यू. आय.टी.च्या प्रशस्त प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनातील सोनेरी क्षणांना उजाळा दिला.



या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त श्री. भूषण शहा होते. त्यांच्या समवेत व्यासपीठावर विश्वस्त श्री. वैभव गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, आणि माजी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. सचिन देशमुख उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. लुईस लोबो यांनी केले. त्प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेचा गौरव करत माजी विद्यार्थ्यांनी नव्या पिढ्यांसाठी प्रेरणास्थान होण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या खास शैलीत संस्थेतील विविध उपक्रमांची, हॅकेथॉन स्पर्धांची आणि नवकल्पनांची माहिती दिली. डब्ल्यू.आय.टी.कडे माजी विद्यार्थ्यांच्या रूपाने प्रतिभावान उद्योजक व उच्चाधिकारींचा मोठा ठेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आणि संचालन पाहून सर्व माजी विद्यार्थी भारावून गेले होते. सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व नोकरीसंदर्भात मार्गदर्शन देण्याची तयारी दर्शवली. शिवाय, श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानच्या माध्यमातून गुणवंत व होतकरू गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. या स्नेहमेळाव्यात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, संयुक्त अरब अमिरात इत्यादी विविध देशांत कार्यरत असलेल्या सिव्हिल, मेकॅनिकल, प्रॉडक्शन, इंडस्ट्रियल आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागांतील १५३ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र देशमुख यांनी केले. डॉ. सचिन देशमुख यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुनील कुलकर्णी, डॉ. नरेंद्र काटीकर, डॉ. राजेश अरगिद्दी, डॉ. अजित गुंडाळे, डॉ. विपुल कोंडेकर, प्रा. भूषण शहरकर, प्रा. महेश महंत तसेच माजी विद्यार्थी भरत जैन, दीपांक गुप्ता, अमित जैन, रश्मी खांडेकर, सचिन गोरे, प्रेमल करेलिया व अन्य प्राध्यापकांनी मेहनत घेतली.

# सेवा निवृत्तीनंतर राजकारणात पूर्ण वेळ द्या, आम्ही तुमच्या पाठीशी

## माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

नरसिंह आसादे यांचे काँग्रेस पक्षात कार्य उल्लेखनीय आहे. पक्ष बांधणीसाठी त्यांनी आता पूर्ण वेळ द्यावा, काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे चिटणीस चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य नरसिंह आसादे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त अंत्रोळीकर नगर येथील प्रगती लॉन येथे आयोजित सत्कार समारंभात सुशीलकुमार शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाश यलगुलवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रणिती शिंदे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुधीर खरटमल आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



याप्रसंगी सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी प्राचार्य नरसिंह असादे यांनी अडचणीच्या काळात आसादे नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहिल्याचे यावेळी नमूद केले. सध्या काँग्रेस पक्षाला आसादे सारख्याच व्यक्तीची गरज आहे, काँग्रेस पक्षाशी कायम एकनिष्ठ असून त्यांनी आता यापुढे पक्षासाठी पूर्ण वेळ द्यावा असे आवाहन केले.

प्रकाश यलगुलवार म्हणाले, आसादे यांचे कुटुंब काँग्रेस पक्षाशी कायम एकनिष्ठ राहिलेले असून त्यांनीही यापुढे पक्ष कार्यात स्वतः ला झोकून द्यावे, असे सुचवले तसेच माझ्या प्रत्येक कार्यात नरसिंह आसादे यांचे सहकार्य लाभत आले आहे. त्यांच्यातील नेतृत्व गुण व संघटन कौशल्य वाखाणण्याजोगे आहे त्याचा निश्चितच पक्षाला लाभ होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश सातालोलू यांनी केले. सूत्रसंचालन जगन्नाथ सज्जन केले. दिनेश म्हेत्रे यांनी आभार मानले. याप्रसंगी माजी महापौर संजय हेमगड्डी, मोची समाजाचे अध्यक्ष देवेंद्र भंडारे, काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, प्राचार्या सीमाताई यलगुलवार, मोची समाज माजी अध्यक्ष बसवराज म्हेत्रे, माजी नगरसेवक नरसिंग कोळी, मोची समाज युवक अध्यक्ष रतिकांत कमलापुरे, लष्कर मोची समाजाचे अध्यक्ष करेप्पा जंगम आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
(जलसंपदा विभाग)
**कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर**
यांचे कार्यालय गजानन महाराज मंदिर रोड, कडा ऑफिससमोर, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर
फोन नं. ०२४०-२४५२१०१ ई-मेल-ee_ghelid1@rediffmail.com

**ई-निविदा सुचना क्र.ब-१/ईई/१६(दुबार)/ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ |
| १. | १३२/३३ के.व्ही. उपकेंद्र पारेवाडी ते आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ रामवाडी, ता. करमाळा, जि. सोलापूर ३३ के.व्ही. वाहिनी पुरवठा उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरण करण्याचे काम. | सोलापूर | रु.४,६०,६९,८९०/- |

**निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक ०५/०५/२०२५ ते १३/०५/२०२५**
**निविदा उघडण्याचा - दिनांक १५/०५/२०२५.**

जाक्र.काअ/गोजविवउसिंवि/लेखा-३/४३६/२०२५.
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :-२४/०४/२०२५.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# राजस्थानचा एका धावेने पराभव

## रियान परागची तडाखेबंद फलंदाजी व्यर्थ ● आंद्रे रसेलच्या नाबाद ५७ धावा

**कोलकाता, ४ मे**

आयपीएल स्पर्धेत ईडन गार्डन्सवर रविवारी येथे झालेल्या रोमांचक सामन्यात राजस्थान रॉयल्सचा एका धावेने पराभव करून कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) ने प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या. प्रथम फलंदाजी करताना केकेआरने चार बाद २०६ धावा केल्या आणि नंतर राजस्थान रॉयल्सला आठ बाद २०५ धावांवर रोखले. राजस्थानकडून कर्णधार रियान परागने ४५ चेंडूत ९५ धावांची आक्रमक खेळी केली. केकेआरकडून वरुण चक्रवर्ती, हर्षित राणा आणि मोईन अली यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

आंद्रे रसेल (नाबाद ५७), अंगकृष रघुवंशी (४४) आणि रहमानुल्लाह गुरबाज (३५) यांच्या खेळी आणि त्यानंतर गोलंदाजांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सचा एका धावेने पराभव केला. २०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खराब झाली. त्यांनी आठ धावांत दोन गडी गमावले. वैभव सूर्यवंशी चार आणि कुणाल सिंग राठोड शून्यावर बाद झाले. यानंतर, कर्णधार रियान पराग फलंदाजीला आला आणि त्याने यशस्वी जयस्वालसोबत तिसऱ्या गड्यासाठी ५८ धावांची भागीदारी केली.


अर्धशतक झळकावल्यानंतर बॅट उंचावताना सामनावीर आंद्रे रसेल

सातव्या षटकात मोईन अलीने यशस्वीला बाद करून ही भागीदारी मोडली. यशस्वीने २१ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३४ धावा केल्या. पुढच्याच षटकात वरुण चक्रवर्तीने ध्रुव जुरेल (०) आणि वानिंदू हसरंगा (०) यांना बाद करून राजस्थानला अडचणीत आणले. संकटाच्या काळात, शिमरॉन हेटमायरने रियान परागसह डावाची जबाबदारी घेतली. दोन्ही फलंदाजांनी सहाव्या गड्यासाठी ९२ धावांची भागीदारी करून राजस्थानच्या आशा जिवंत ठेवल्या.

हर्षित राणाने १६ व्या षटकात शिमरॉन हेटमायर (२९) आणि १८ व्या षटकात रियान परागला बाद करून कोलकाताला सामन्यात परत आणले. रियान परागने ९५ धावांची तुफानी खेळी केली. यात आठ षटकार आणि सहा चौकार मारले. राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत आठ गडी गमावून फक्त २०५ धावांपर्यंत मजल मारली आणि सामना एका धावेने गमावला.

तत्पूर्वी, कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर संघाची सुरुवात खराब झाली आणि सुनील नारायण (११) बाद झाला. यानंतर, कर्णधार अजिंक्य रहाणे फलंदाजीला आला आणि रहमानुल्लाह गुरबाजसह डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. आठव्या षटकात महेश थीकशनाने अजिंक्य रहाणेला बाद करून कोलकात्याला त्यांचा दुसरा गडी बाद केला. रहाणेने ३० धावा केल्या. कोलकाताचा तिसरा बळी रहमानउल्लाह गुरबाज (३५) च्या रूपात गेला. १९ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर जोफ्रा आर्चरने अंगकृष रघुवंशीला ४४ धावांवर बाद केले. रिंकू सिंगने शेवटच्या सहा चेंडूत (नाबाद १९) धावा केल्या. आंद्रे रसेलने ३५ चेंडूत सहा षटकार आणि चार चौकारांसह नाबाद ५७ धावा केल्या. कोलकाताने निर्धारित २० षटकांत चार गडी गमावून २०६ धावा केल्या. (वृत्तसंस्था)

# तालिकेत स्थान मजबूत करणार दिल्ली कॅपिटल्स


### हैदराबादविरुद्ध विजयी मार्गावर परतण्याचा प्रयत्न

**हैदराबाद, ४ मे**

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स सोमवारी येथे तळाच्या स्थानावर असलेल्या सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्यांच्या घरच्या मैदानावरील खराब कामगिरीतून सावरत विजयी मार्गावर परतण्याचा प्रयत्न करेल.

दिल्ली कॅपिटल्सना त्यांच्या घरच्या मैदानावर अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या शेवटच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध १४ धावांनी पराभव पत्करावा लागला होता, परंतु मैदानावर प्रतिस्पर्ध्यांच्या चांगल्या कामगिरीमुळे संघाने प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. दिल्ली संघाला पॅट कमिन्सच्या संघाविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर विजय मिळवायचा आहे.

अक्षर पटेल दुखापतीमुळे त्रस्त आहे. ३० एप्रिल रोजी नाईट रायडर्सविरुद्ध क्षेत्ररक्षण करताना डाव्या हाताला दुखापत झाल्यानंतर तो मैदानाबाहेर गेला. तो दुखापतीतून बरा होऊन सनरायझर्सविरुद्ध खेळतो की नाही हे पाहणे बाकी आहे. मात्र, दुखापतीनंतरही अक्षरने २३ चेंडूत ४३ धावांची शानदार खेळी केली. जर तो दुखापतीतून पूर्णपणे बरा झाला नाही तर त्याला गोलंदाजीत अडचणी येऊ शकतात.



पॅट कमिन्स अक्षर पटेल

दिल्ली कॅपिटल्स संघ सध्या १० सामन्यांत १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. अक्षरने आतापर्यंत शानदार कामगिरी केली आहे आणि जर तो खेळला नाही किंवा सामन्यात त्याची भूमिका मर्यादित राहिली तर त्याचा संघाच्या कामगिरीवर परिणाम होईल. संघाला घरच्या मैदानावर नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या शेवटच्या दोन सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे.

दिल्लीने गेल्या पाचपैकी तीन सामन्यांमध्ये पराभव पत्करला आहे आणि लीगच्या या महत्त्वाच्या टप्प्यात पुढील पराभव टाळण्याचा त्यांचा संघ प्रयत्न करेल.

अभिषेक पोरेलनेही वरच्या फळीत आक्रमक फलंदाजी केली आहे आणि एका अर्धशतकासह २५० हून अधिक धावा केल्या आहेत परंतु चालू हंगामात चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात तो अपयशी ठरला आहे.

**आजचा सामना**

**सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स**
**स्थळ** : राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्कच्या नेतृत्वाखालील दिल्ली संघ दुष्मंथा चामीरा आणि मुकेश कुमार सारख्या अनुभवी गोलंदाजांसह मजबूत स्थितीत आहे. जर अक्षर पूर्णपणे तंदुरुस्त असेल, तर दिल्ली कॅपिटल्सकडे आयपीएल २०२५ मधील सर्वात शक्तिशाली आक्रमणांपैकी एक असेल.

नाईट रायडर्स विरुद्धच्या शेवटच्या सामन्यात स्टार्क आणि अक्षरने मिळून पाच गडी बाद केले होते. तथापि, गतविजेत्या आयपीएल संघाने अजूनही २०० पेक्षा जास्त धावा केल्या, जे खेळपट्टीच्या स्वरूपामुळे शक्य झाले असे गृहीत धरता येते. दुसरीकडे, सनरायझर्स संघाला मिळालेल्या अनुभवाचा फायदा घेता आला नाही. कमिन्सच्या नेतृत्वाखालील आणि शमी, ट्रॅव्हिस हेड, इशान किशन, हेनरिक क्लासेन आणि जयदेव उनाडकट यांच्या उपस्थितीमुळे संघ संघर्ष करत आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### मोठे फटके मारून दबाव कमी करता आला असता

**बंगळुरू** : शनिवारी आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध झालेल्या पराभवासाठी



चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीने स्वतःला जबाबदार धरले आहे. धोनीने म्हटले की त्याने आणखी काही मोठे शॉट्स खेळून दबाव कमी करायला हवा होता. शनिवारी चिन्नास्वामी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात आरसीबीने दिलेल्या २१४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईला २० षटकांत पाच गडी गमावून केवळ २११ धावा करता आल्या. सीएसकेचा हा ११ सामन्यांतील नववा पराभव होता. संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. बंगळुरूचा हा ११ सामन्यांतील आठवा विजय होता. आरसीबी १६ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. धोनी जेव्हा फलंदाजीसाठी आला तेव्हा सीएसकेला २१ चेंडूत ४२ धावांची आवश्यकता होती. त्यानंतर धोनीसह आधीच खेळपट्टीवर स्थिरावलेला रवींद्र जडेजा होता. तथापि, १७ व्या षटकात आठ धावा, १८ व्या षटकात सहा धावा आणि १९ व्या षटकात १४ धावा आल्या. शेवटच्या षटकात सीएसकेला जिंकण्यासाठी १५ धावांची आवश्यकता होती, पण षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर धोनी पायचित झाला. त्याने एका षटकाराच्या मदतीने आठ चेंडूत १२ धावा केल्या.

### खलील अहमदला चेंडू देण्याचा धोनीचा निर्णय योग्य

**बंगळुरू** : चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्ध १९ व्या षटकात ३३ धावा देऊन फॉर्ममध्ये असलेल्या वेगवान गोलंदाज खलील अहमदचे समर्थन केले, परंतु इंडियन प्रीमियर लीगमध्ये ते पुढे इतर पर्यायांचा शोध घेतील असे सांगितले. चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीने अंशुल कंबोजच्या चांगल्या कामगिरीचा एक षटक शिल्लक असताना अहमदला गोलंदाजी करण्यास सांगितले परंतु रोमारियो शेफर्डच्या आक्रमकतेसमोर तो कमी पडल्याने त्याचा निर्णय त्याच्यावरच उलटला. खलीलने या हंगामात आमच्यासाठी खरोखर चांगली कामगिरी केली आहे, त्यामुळे धोनीने त्याच्या जागी इतर कोणत्याही गोलंदाजाला घेण्याचे कोणतेही कारण नाही, असे फ्लेमिंगने शनिवारी रात्री सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले. कंबोज त्याच्या भूमिकेत सातत्याने सुधारणा करत आहेत. तो डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी करण्यास सक्षम आहे. तो भविष्यासाठी एक पर्याय असू शकतो, पण खलीलच्या जागी त्याला गोलंदाजी करण्यासाठी का बोलावले गेले असावे असे कोणतेही कारण नव्हते.

### आर्यना सबालेंकाने पटकावले २० वे विजेतेपद

**माद्रिद** : जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या आर्यना सबालेंकाने माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेत जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या कोको गॉफचा सरळ सेटमध्ये पराभव करून तिचे तिसरे आणि कारकीर्दीतील २० वे विजेतेपद जिंकले. काजा मॅजिका क्ले कोर्टवर सबालेंकाने पहिल्या सेटमध्ये जोरदार मात केली आणि अमेरिकेची खेळाडू कोको गॉफवर ६-३, ७-६ (३) असा विजय मिळवला. २०२१ आणि २०२३ मध्ये सबालेंकाने माद्रिदमध्ये विजेतेपद जिंकले. अशा प्रकारे तिने पेट्रा क्विटोवाच्या स्पर्धेतील विक्रमाशी बरोबरी केली. ब्रिस्बेन आणि मियामीनंतर सबालेंकाचे हे वर्षातील तिसरे विजेतेपद आहे. जर गॉफने हा सामना जिंकला असता तर ती जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचली असती पण सबालेंकाशी तिचा सामना होऊ शकला नाही.

### इंग्लंड दौऱ्यात कुलदीप यादव महत्त्वाची भूमिका बजावेल

**नवी दिल्ली** : कुलदीप यादव हा एक सामना जिंकणारा खेळाडू आहे आणि तो घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असा विश्वास माजी भारतीय निवड समिती सदस्य आणि प्रशिक्षकांनी व्यक्त केला आहे. फलंदाजी करणाऱ्या अष्टपैलू खेळाडूंपेक्षा फिरकी गोलंदाजाला प्राधान्य दिले पाहिजे. कुलदीप यादवच्या उत्तम फलंदाजी कौशल्यामुळे पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी रवींद्र जडेजा हा पहिली पसंती असेल असे त्याला वाटते, परंतु कुलदीपचा संघात समावेश केल्याने भारताचा फिरकी विभाग आणखी मजबूत होईल.आयपीएल प्लेऑफमध्ये पोहोचणाऱ्या संघांची स्थिती स्पष्ट झाल्यानंतर राष्ट्रीय निवड समिती इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय आणि अ संघांची घोषणा करू शकते. प्लेऑफमध्ये पोहोचू न शकलेल्या इतर सहा संघांमधील रेड-बॉल स्पेशालिस्ट खेळाडू इंग्लंडला लवकर रवाना होतील, जसे पूर्वी झाले आहे. यामुळे त्यांना तेथील परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत होईल.

# शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेता आदित्य गिराम याचा सत्कार

**सोलापूर, दि. ४ मे-**

महाराष्ट्र शासनाकडून राज्यस्तरावरील मानाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल जलतरणपटू आदित्य गिराम याचा वीरशैव व्हिजन तर्फे सत्कार करण्यात आला.उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते व वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, सोमेश्वर याबाजी यांच्या हा सत्कार करण्यात आला. यावेळी आनंद दुलंगे, नागेश बडदाळ, राजेश नीला, अविनाश हत्तरकी, मनोज पाटील, गौरीशंकर अतनुरे, आनंद नसली, सोमनाथ चौधरी, अमित कलशेट्टी, सिद्धेश्वर कोरे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक राजशेखर बुरकुले यांनी केले. राहुल बिराजदार यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.



**यापुढेही उज्वल यश संपादनाचा प्रयत्न**

सत्काराला उत्तर देताना आदित्य गिराम म्हणाला की माझे प्रशिक्षक श्रीकांत शेटे व माझे वडील अनिल गिराम यांच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने मला हे यश मिळाले आहे. यापुढील काळात आणखीन असेच उज्वल यश संपादन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

**अवघ्या २५ व्या वर्षी पुरस्कार मिळविणे कौतुकास्पद**

आदित्यच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देताना आ. प्रवीण स्वामी म्हणाले, वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी शिवछत्रपती पुरस्कार मिळवणे हे कौतुकास्पद तर आहेच त्याचबरोबर दुर्मिळही आहे.

# साऊथ सोलापूर आपटे ग्रुपची कलबुर्गीवर मात

### ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : स्वप्नील हंचाटे सामनावीर

**सोलापूर, दि. ४ मे-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन अ गटाच्या क्रिकेट स्पर्धेत साऊथ सोलापूर आपटे ग्रुप अ संघाने कलबुर्गीच्या केसीसी संघावर ७६ धावांनी मात केली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात रविवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या साऊथ सोलापूरने सर्व बाद १७८ धावा केल्या. विजयी १७९ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या कलबुर्गीचा डाव साऊथ सोलापूरने ९२ धावांत रोखला. तीन बळी टिपणारा स्वप्नील हंचाटे सामनावीर ठरला. हा पुरस्कार त्यास पंच मंजुनाथ बिराजदार व नितीन गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.



**संक्षिप्त धावफलक**

**साऊथ सोलापूर आपटे ग्रुप (अ):** ३५ षटकांत सर्व बाद १६८ (आमिर खान ३५, श्रेयस दुधगी, निरंजन कदम व ओंकार भांबुरे प्रत्येकी १९ धावा, अजय राठोड ३ बळी, अभिषेक उळ्ळी, रोहित राठोड व ओंकार मडीवाळ प्रत्येकी २ बळी, प्रशांत होसमणी १ बळी) वि.वि. **के.सी.सी. कलबुर्गी :** २७.४ षटकांत सर्व बाद ९२ (ओंकार मडीवाळ २१, प्रशांत होसमाणी १५, प्रदीप नाबाद १४, स्वप्नील हंचाटे ३ बळी, रोहित जोशी व अतुल चौधरी प्रत्येकी २ बळी, ओंकार भांबुरे व निरंजन कदम प्रत्येकी १ बळी.)

# दि ओन्ली अण्णा चषक क्रिकेट स्पर्धेत वीर मराठा संघ विजेता



### वैरागचा आदर्श क्रिकेट क्लब उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

वीर मराठा संघाने वैरागच्या आदर्श क्रिकेट क्लबला हरवून दि ओन्ली अण्णा चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. येथील ईसा इलेव्हन संघाने तृतीय स्थान मिळविले. ईच्छा भगवंताची परिवार आणि नागेश अण्णा गायकवाड युथ फाऊंडेशनच्या वतीने या डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा विजापूर रोडवरील नेहरूनगर येथील शासकीय क्रीडांगणावर पार पडली. यात १८ संघांनी सहभाग नोंदविला होता.

आमदार देवेंद्र कोठे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, माजी नगरसेवक मनोज शेजवाल, गुरुशांत दुत्तरगावकर, किरण चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष उमेश जाधव आदींच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले. विजेत्या वीर मराठा संघास ८१ हजार १११ रुपये वैरागच्या उपविजेत्या आदर्श क्लबला ४१ हजार १११ रुपये आणि तृतीय ईसा इलेव्हनला २१ हजार १११ रुपये रोख आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी स्वागत केले. या स्पर्धेचे समालोचन शंकर पवार, डान्सिंग अंपायर म्हणून सोन्या बापू भोसले यांनी उपस्थिती लावली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नागेश अण्णा गायकवाड युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष अमोल जगताप, चेतन गायकवाड, दर्शन दुबे, प्रेम गायकवाड, कार्तिक जाधव, किरण शिंदे, दर्पण दुबे, सनी पोळ, नवीन चिंता, दिनेश आवटे, ऋषी येवले, सौरभ पातळे, सोनू पटेल, सोनू जाधव, पियुष गायकवाड, अजिंक्य जाधव, उत्कर्ष गायकवाड,आदर्श जाधव, पियुष गायकवाड यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



# बास्केटबॉलचे प्रशिक्षण शिबिर सुरु

### भारतीय महिला प्रशिक्षका अर्निका गुजर यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनच्या वतीने तंत्रशुद्ध प्रशिक्षण शिबिरास सुरवात झाली. आठ मे पर्यंत हे शिबिर होम मैदान व सेलिब्रेशन स्पोर्ट्स अकॅडमी सिंधू विहार विजापूर रोड सोलापूर येथे सुरु आहे. तरी या शिबिरासाठी भारतीय महिला प्रशिक्षिका अर्निका गुजर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. या शिबिराचे उद्घाटन सांगोला विद्यामंदिरचे संस्थापक अध्यक्ष प्रभूचंद्र नवले, सिंहगड इन्स्टिट्यूट सहसचिव संजयजी नवले, सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सदस्य व शिबिर प्रमुख रंजीता चाकोते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे प्रदेश सचिव इरफान शेख, उद्योगपती अतुल कोकाटे, शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के. डी पाटील, सचिव साकिब शेख आदी उपस्थित होते.

# एशियन एरोबिक्स ॲन्ड हीपहॉप चॅम्पियनशिप; सोलापूरच्या सहा खेळाडूंची निवड




### दुबई येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार

**सोलापूर, दि. ४ मे-**

नुकत्याच गोवा येथे फिसाफ इंडिया फेडरेशन कप एरोबिक्स ॲंड हिपहॉप नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेतून सुवर्णपदक विजेते स्ट्रीम लाईन अकॅडमीचे वृंदा बोध्दूल, स्वरा गनेर, जुई जोशी, त्रिगुणा द्यावनपल्ली, अनुष्का चव्हाण व हीर गाला या सहा खेळाडूंची निवड झाली. पुढील महिन्यात दुबई येथे होणाऱ्या इंटरनॅशनल फेडरेशन कप २०२५ स्पर्धेत ते भाग घेतील. गोवा येथील राष्ट्रीय स्पर्धेत भारतातील १८ राज्यातील ३७० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यामध्ये भरघोस मेडल्सची कमाई करत महाराष्ट्राचा संघ प्रथम क्रमांकावर विजयी झाला. दिल्ली द्वितीय तर तृतीय स्थानावर तमिळनाडूने आपले नाव नोंदविले. यात येथील स्ट्रीमलाईन अकॅडमीच्या डॉ. मोहिनी मोरे-ताकते यांच्या मार्गदर्शनाखाली ११ खेळाडूंनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. या संघात वृंदा बोध्दूल, स्वरा गनेर, शौर्य साळुंखे, पर्युल दोषी, त्रिगुणा द्यावनपल्ली, जुई जोशी, जान्हवी ढोले, ध्रुव वाघमारे, वीरांश भंडारी, अनुष्का चव्हाण व हीर गाला यांचा सहभाग होता.

**राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी**

**सुवर्ण** : १७ वर्षाखालील गट : वृंदा बोध्दूल, स्वरा गनेर. ११ वर्षाखालील गट : जुई जोशी व त्रिगुणा. ७ वर्षाखालील वयोगटात हिर गाला व अनुष्का चव्हाण.



# हाय-परफॉर्मन्स क्रिकेट अकादमीच्या चौघांची राज्य स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ४ मे-**

बार्शीतील हाय-परफॉर्मन्स क्रिकेट अकॅडमीच्या चौघांची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या राज्य निमंत्रित क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली.

इद्धांत जैन, संदेश गाडे, प्रसाद मुके यांची १६ वर्षांखालील सोलापूर जिल्हा क्रिकेट संघात निवड झाली असून हे तिघे संभाजीनगर येथे सामन्यांसाठी रवाना होणार आहेत. सुमित घळके याची निवड धाराशिव जिल्ह्याच्या अंडर-१६ संघात झाली असून तोही रायगड येथे रवाना होत आहे. त्यांना प्रशिक्षक आनंद शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# माढा मतदार संघाच्या विकास कामासाठी किती निधी आणला हे स्पष्ट करावे

## रणजितसिंह शिंदे यांचा आ. अभिजीत पाटिल यांना सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ मे -**

माढा तालुक्याचे माजी आमदार बबनराव शिंदे यांनी गेल्या तीस वर्षात मोठ्या प्रमाणात तालुक्याचा विकास केला आहे. माजी आमदार बबनराव शिंदे यांनी तालुक्याचा विकास करत असताना कुठल्याही प्रकारचे फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी जनतेच्या भल्यासाठी तालुक्याच्या विकास कामाला प्राधान्य दिले. परंतु सध्याचे आमदार अभिजीत पाटील हे माजी आमदार बबनराव शिंदे यांनी मंजूर केलेल्या कामाचे उद्घाटन करून फुकटचा श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहे. माजी आमदार बबनराव शिंदे यांनी अरण उपळाई (खुर्द) या उपकेंद्रासह मतदारसंघातील ३४ उपकेंद्रापैकी २२ उपकेंद्राच्या क्षमता वाढीसाठी मार्च २०२३ मध्ये शासनाकडून मंजुरी मिळवली असून ती कामे सध्या पूर्ण होत आहेत. आम्ही शेतकरी व जनतेच्या भल्यासाठी मंजूर केलेल्या विकास कामाचे उद्घाटन आम्ही केले म्हणून यात वावगं काय ? असा सवाल जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी आमदार अभिजीत पाटील यांना केला आहे. तसेच माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी आत्तापर्यंत माढा मतदारसंघाच्या विकास कामासाठी किती निधी मंजूर करून आणलाय व यंदाच्या अर्थसंकल्पात मतदारसंघासाठी किती निधी मंजूर झालाय हेही त्यांनी जनतेला स्पष्टपणे सांगावं असं आव्हान ही रणजितसिंह शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना केले आहे.



पुढे पत्रकारांशी बोलताना रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले माढा विधानसभा मतदारसंघातील महावितरणच्या ३४ उपकेंद्रापैकी अरण, उपळाई खुर्द, सुर्ली, परिते, सोलनकरवाडी, मिटकलवाडी, मानेगाव, पडसाळी, टेंभुर्णी एम आय डी सी, भेंड, आढेगाव, बेंबळे आदी २२ उपकेंद्राच्या क्षमतावृद्धीचे कामास तत्कालीन आमदार बबनराव शिंदे यांनी मार्च २०२३ मध्ये शासनाकडून मंजुरी मिळवली आहे या शिवाय मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजने अंतर्गत आर डी एस एस मधून घोटी, लऊळ उजनी (मा), अंजनगाव खेलोबा, जाधववाडी बैरागवाडी, बावी, केवड, चिलाईवडी, नेमतवाडी, अजनसोंड, कान्हापुरी, जांबूड, महाळूंग येथे महावितरणच्या नवीन उपकेंद्रांना मार्च २०२४ मध्ये मंजुरी मिळवली आहे तर मुख्यमंत्री सडक योजने अंतर्गत अंजनगाव उमाटे ते पापनस या चौदा कि मी अंतरासाठी ३२ कोटी रुपये, टेंभुर्णी ते नगोर्ली ७ कोटी रुपये, परिते ते आहेरगाव १० कोटी रुपये, २५/४ ते लवंग ६कोटी रूपये, शेवते ते पेहे ९कोटी २६ लाख, व्हळे ते पोकनदी ४कोटी रुपये, देशमुख वस्ती ते कान्हापुरी ३कोटी ५० लाख रुपये टेंभुर्णी ते सुर्ली २कोटी पन्नास लाख रुपये अशी सिमेंट रस्त्यांच्या कामासाठी ७७ कोटी रुपयांचा निधी मार्च २०२४ मध्ये मंजूर करून घेतला असल्याचे शिंदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला रणजितसिंह शिंदे यांच्यासोबत जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजीराजे कांबळे उपस्थित होते

### दुसऱ्यांनी मंजूर करून आणलेल्या कामाचे उद्घाटन करणाऱ्या आमदार पाटील यांची जनतेला कीव

माढा मतदार संघातील विकास कामावरुन श्रेय वाद गेल्या काही दिवसांपासून उफाळून आला आहे. उपळाई खुर्द येथील महावितरणच्या उपकेंद्राच्या क्षमतावृद्धीचे उद्घाटन प्रथम माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांनी केले त्यानंतर दुसऱ्या दिवशी आमदार अभिजित पाटील यांनी याचे उद्घाटन केले यावेळी बोलताना आमदार पाटील यांनी रणजितसिंह शिंदे यांच्या बुद्धीची कीव करावी वाटते अशा शब्दांत त्यांच्यावर टीका केली होती त्या टीकेला पलटवार करताना रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले की दुसऱ्यांनी मंजूर करून आणलेल्या कामाचे फुकटचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या बुद्धीची कीव जनता करू लागली आहे.

### राजकीय हस्तक्षेपामुळे पाण्याचे नियोजन कोलमडले

सीना माढा उपसा जलसिंचन योजनेच्या यंदाच्या पाणी वितरणातील अक्षम्य राजकीय हस्तक्षेपामुळे सुमारे तेरा गावांना या योजनेचे पाणी मिळू शकलेले नाही अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली हे आमदार अभिजीत पाटील यांचे म्हणणे धादांत खोटे असुन आपलं अपयश झाकण्यासाठी अधिकाऱ्यांना दोष दिला जात असल्याचा आरोप देखील रणजितसिंह शिंदे यांनी केला.

## महत्वाचे...

### लग्नाचे आमिष दाखवून पळून नेऊन केला अत्याचार

**सोलापूर, दि. ४ मे-**

लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन अत्याचार केल्याप्रकरणी तरुणावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की, संशयित आरोपी रितेश अनपट याने फिर्यादीच्या मुलीस लग्नाचे आमिष दाखवून २८ एप्रिल रोजी रात्री नऊच्या सुमारास बार्शी रोडवरील एका लॉज मध्ये नेऊन मनाविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध केले होते. याप्रकरणी तरूणावर पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.



### मंद्रूपमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणूक

**मंद्रूप, दि.४ मे-**

मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. शिव-बसव चौक येथून सायंकाळी मिरवणुकीला प्रारंभ होऊन हुतात्मा स्तंभ येथे ती समाप्त झाली. कार्यक्रमाचे आयोजन श्री शिव-बसव मध्यवर्ती जन्मोत्सव तरुण मंडळ आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने करण्यात आले. मिरवणुकीत युवकांची मोठी उपस्थिती होती. मिरवणुकीच्या प्रारंभी मळसिद्ध मुगळे, पोलीस हवालदार बजरंग जाधव, देगावचे विश्वनाथ कराळे आणि मंडळाचे अध्यक्ष अप्पू नंदुरे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांचा आरती सोहळा पार पडला. गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीस बंदोबस्त आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मिरवणूक शिस्तबद्धपणे पार पडली. यावेळी उपाध्यक्ष सोमनिंग मुगळे, आकाश आडोळे, खजिनदार मल्लू लोभे, सचिव शिवानंद कामगोंडे, कार्याध्यक्ष अभिषेक पोतदार, मिथुन मुगळे, दयानंद ख्याडे, शिवानंद लोभे, शिवराज कालदे, सागर घाले, जगदीश हेळकर, निलेश जोडमोटे, माळू घाले, सिद्धू नंदुरे, शिवराज मुगळे, प्रवीण ख्याडे, नींगू ख्याडे, रवी नंदुरे, नागेश ख्याडे आदी उपस्थित होते.



### शिवशंकर राठोड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ४ मे-**

पंचायत समिती उत्तर सोलापूर शिक्षण विभाग यांच्यातर्फे दिला जाणारा तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार बाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिकानगर विज्ञान विषय शिक्षक शिवशंकर राठोड यांना प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी माध्यमिकचे उपशिक्षण अधिकारी स्वाती हवेली, उत्तर सोलापूरचे गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, विस्तार अधिकारी बापूराव जमादार, हरीश राऊत, सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य नवले ,बाळे केंद्राचे केंद्रप्रमुख सिद्धाराम माशाळे, ईश्वर राठोड आदि उपस्थित होते.



### दहिगाव ग्रामपंचायत चौकशीला एसआयटी नेमा; खिलारे यांची मागणी

**नातेपुते, दि.४ मे-**

दहिगाव (ता. माळशिरस) मधील ग्रामपंचायत कामाच्या बिलाची प्रत्यक्ष पाहणी करून एसआयटी चौकशी नेमण्याची मागणी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे तालुकाध्यक्ष बाबुराव खिलारे व दहिगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन खिलारे यांनी ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दहिगाव ग्रामपंचायतने बोगस बिले काढली आहेत याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित सर्व विभागाकडे सदर कामाची चौकशी करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे. तरीसुध्दा चौकशी झाली नाही. त्यामुळे एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी निवेदनातून केली आहे. यावेळी किसन खिलारे, गणेश धणाने उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### संजय पांडगळे



**श्रीपूर, दि. ४ मे-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील रहिवाशी संजय मारुती पांडगळे यांचे कर्नाटकात अपघाती निधन झाले. ते अंकली गावातील शिवशक्ती साखर कारखान्यात बॉयलरची चिमणी रंगवणे साठी गेले होते. काम करताना शिडीवरून खाली उतरताना पाय घसरल्याने ते पडलेने त्यांचा मत्यू झाला. या घटनेने श्रीपूर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा एक मुलगी, आई असा परिवार आहे.

### मल्लिनाथ कोरीशेट्टी



**सोलापूर, दि. ४ मे-**

कल्याण नगर भाग दोन मधील रहिवाशी मल्लिनाथ मुर्गेप्पा कोरीशेट्टी (वय ६० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई व पाच नातवंडे असा परिवार आहे. जि.प. कंपाऊड एसबीआय ट्रेझरी शाखेसमोर के. मल्लिनाथ बायडिंग वर्क्सचे ते मालक होते. परमानंद कोरीशेट्टी यांचे ते वडील होत.

# वरकुटे येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचा महेश इंगळे यांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ४ मे -**

करमाळा तालुक्यातील वरकुटे या गावी निर्मिती करण्यात आलेल्या नुतन श्री स्वामी समर्थ मंदीराचे शुभारंभ येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. समर्थक चॅरिटेबल ट्रस्ट वरकुटे मार्फत ट्रस्टचे अध्यक्ष योगेश देशमुख यांच्या मातोश्री सुलभा बबन देशमुख यांच्या इच्छेनुसार त्यांच्या स्वखर्चाने या श्री स्वामी समर्थ मंदीराची उभारणी करण्यात आल्याची माहिती महेश इंगळे यांनी दिली. या मंगल क्षण प्रसंगी महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनानुसार पहाटे पासूनच प्राणप्रतिष्ठापना महाअभिषेक, यज्ञकुंड होम, आरती, महानैवेद्य इत्यादी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १२ वाजता महेश इंगळे यांच्या हस्ते फित कापून मंदीराचे शुभारंभ करून मंदीर भाविकांकरीता दर्शनार्थ खुले करण्यात आले. यावेळी महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे



मनोभावे दर्शन घेतले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष योगेश देशमुख व त्यांच्या मातोश्री सुलभा देशमुख व कुटूंबियांच्या प्रमुख उपस्थितीत महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची महाआरती व नैवेद्य आरती संपन्न झाली. या नंतर संस्थेच्या वतीने उपस्थित भाविकांना भोजन महाप्रसाद वाटप करण्यात आले. महाआरती नंतर महेश इंगळे तसेच श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे विश्वस्त तथा करमाळा पंचायत समितीचे मा.सभापती संपतराव उर्फ भारत शिंदे व सर्व प्रमुख पाहुण्यांचा समर्थक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष योगेश देशमुख, सुलभा बबन देशमुख, मंदिर उभारणी करण्यास परिश्रम घेतलेले स्वप्निल पाटील, किरण पाटील, बबनरावजी देशमुख, योगेश देशमुख, सोनाली देशमुख, स्वप्निल पाटील किरण पाटील, हरिचंद्र राजगुरू, संतोष शिरसागर कीर्ती क्षीरसागर, राजेंद्र सोहनी, स्वाती सोहनी, वरकुटे गावचे सरपंच दादासाहेब भांडवलकर, कीर्तनकार संतोषजी अभंगराव पंढरपूरकर, अनिल लांडगे, शिल्पा लांडगे, अक्कलकोट महेश इंगळे मित्र परिवारचे बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, प्रा.शिवशरण अचलेर, सुनिल पवार, चंद्रकांत सोनटक्के, श्रीशैल गवंडी, स्वामीनाथ मुसळे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

# शेतकरी संघटनेच्या नेत्याची ९ लाखांची फसवणूक

## हळदीस परदेशात खूप पैसे मिळत असल्याची केली बतावणी; तिघांविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.४ मे**

एका शेतकरी संघटनेच्या नेत्याला काळया हळदीची परदेशात खूप महाग विक्री होत असल्याने त्यात गुंतवणूक केल्यास करोडो रुपयांमध्ये फायदा मिळेल असे आश्वासन देवून वेळोवळी ९ लाख रुपये घेवून विश्वास बसावा म्हणून करारपत्र तयार करून व्यवहार पूर्ण न करता आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी व्दारकेश उर्फ दादा सुर्यवंशी (रा.माने गल्ली, मंगळवेढा), गुरुशरण चौहान (रा.अंधेरी मुंबई), मुकेश अग्रवाल उर्फ करण परसावत या तिघांविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला असून या घटनेमुळे मंगळवेढा तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार यातील फिर्यादी शेतकरी संघटनेचे नेते सुरेश जगन्नाथ पवार (वय ७१,रा. सिध्दापूर) हे शेतकरी संघटनेचे काम करीत असल्यामुळे नेते येताळा भगत, सिध्देश्वर भगत, दिलीपकुमार धनवे यांना ते मागील २५ वर्षापासून ओळखत आहेत. दि.१९ फेब्रुवारी २०२२ रोजी यातील फिर्यादी पुणे येथे असताना दिलीपकुमार धनवे यांचा पहाटे ४ वा. फिर्यादीस फोन आला व तुम्ही कोठे आहात असे विचारून आपणास मुंबईला जायचे आहे असे सांगून गाडीत बसल्यावर काय काम आहे ते सांगतो. सकाळी ९ वा. दिलीपकुमार धनवे व येताळा भगत हे डेक्कन पुणे येथे भेटले. त्यांनी आरोपी व्दारकेश उर्फ दादा सुर्यवंशी यांच्याकडे काळी हळद आहे सदर हळदीला मार्केटमध्ये खूप रेट आहे. मुंबई येथील अंधेरीमध्ये गुरुशरण चौहान हा हळदीचा व्यापारी व एजंट असून तेथे आपणास जावयाचे आहे तेथे गेल्यावर आरोपींनी फिर्यादीस काळी हळद परदेशात पाच हजार कोटी रुपयांना विक्री होत असल्याचे सांगितले. त्यासाठी टेस्टमध्ये बसल्यास प्रति किलो ३०० कोटी रुपये दर भेटेल. टेस्ट करण्यासाठी १ कोटी ३० लाखाचे कोरियन कंपनीचे किट विकत घ्यावे लागते. या हळदीमध्ये जास्ती प्रमाणात रेडीएशन असतात. त्यामुळे माणसाची हाडे व रक्त जळते. त्याचा परिणाम शरीरावर होतो. ही टेस्ट करण्यासाठी कंपनीचा चेकर आणावा लागतो. यावेळी फिर्यादीने आमचेकडे एवढे पैसे नाहीत असे सांगितले असता आमचेकडे तुम्ही ५१ लाख रुपये जमा करा,बाकीचे आम्ही भरतो असे आरोपीने सांगितले. दि.२१ फ ब्रुवारी २०२२ रोजी येताळा भगत व दादा सुर्यवंशी यांचे करारपत्र झाले. दि.२० मार्च २०२२ रोजी दिलीपकुमार धनवे व फिर्यादी व्दारकेश उर्फ दादा सुर्यवंशी यांच्या वडदेगाव येथील शेतामध्ये गेलो. तेथे आरोपीने हळदीच्या काही टेस्ट करून दाखवून विश्वास संपादन केला.

किट घेण्यासाठी ठरलेल्या रकम बाबत बोलणी करण्यासाठी सिध्देश्वर भगत, दिलीपकुमार धनवे, मंगळवेढा पंचायत समितीचे कृषी अधिकारी विनायक तवटे, दादा सुर्यवंशी असे आम्ही एस.एम.कंन्स्ट्रक्शन बाणेर रोड, पुणे येथील ऑफिसमध्ये गेलो. किट खरेदी करण्यासाठी आणलेले फिर्यादीकडील ७ लाख ५० हजार रुपये, विनायक तवटे यांचेकडील २० लाख रुपये, येताळा भगत यांचेकडील १० लाख ५० हजार रुपये असे एकूण ३८ लाख रुपये दादा सुर्यवंशी यांचेकडे दिले. वरील आरोपींनी दि.१९ फेब्रुवारी २०२२ ते ४ सप्टेबर २०२२ दरम्यान काळया हळदीस परदेशात खूप किंमत असल्याचे सांगून ९ लाख रुपये घेवून आर्थिक फसवणूक केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहे

# गोगाव येथे विविध पुरस्कारांचे वितरण

## डॉ. आंबेडकर जयंती समितीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ४ मे -**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त मौजे गोगांव येथे शिव बसव आंबेडकर संयुक्त जयंती विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. पंचक्रोशीत विविध विभागात काम करणाऱ्या गुणीजनांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आले

यावेळी अध्यक्षस्थानी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप होते यावेळी नंदकुमार सुरवसे, उपसरपंच तिपवा गायकवाड, प्रभारी सरपंच श्रुती भांगे , प्रदीप जगताप, सूर्यकांत जिरगे, स्वातंत्र्य सैनिक महादेव गायकवाड, मौला नदाफ, नामदेव सोनकांबळे आदी उपस्थित होते. यावेळी सूरज सोनके, महादेव सोनकवडे, भूषण साठे , शाम बाबर, ज्ञानेश्वरी सोनकांबळे, मानवी गायकवाड यांनी भाषण केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्ष किरण गायकवाड, शांतकुमार बनसोडे, परमेश्वर गायकवाड, सुरेश सोनकांबळे, लखन गायकवाड, नितीन गायकवाड, संजय गायकवाड, नामदेव बनसोडे, विनोद बनसोडे, स्वामिनाथ गायकवाड, प्रवीण गायकवाड, सुधाकर बनसोडे, विशाल बनसोडे, आदिनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले आभार अजित गायकवाड यांनी मानले. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक व सभा मंटप भूमिपूजन उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप यांच्या हस्ते झाले.



### ❋शिव बसव समाज भूषण पुरस्कार❋

नंदकुमार सुरवसे (युवा उद्योजक), प्रदीप जगताप (उत्कृष्ठ सरपंच), कल्पा वाडे (माजी सैनिक) , कल्याणराव बिराजदार (कृषी सल्लागार), एस बी पाटील (उत्कृष्ठ अभियंता), कलपा पाटील (सधन शेतकरी), संजय सुरवसे (उत्कृष्ठ शिक्षक), भास्कर जगताप (जेष्ठ समाजसेवक), मौला नदाफ (जेष्ठ समाजसेवक), शरणप्पा कलशेट्टी (जेष्ठ समाजसेवक), सूर्यकांत जीरगे (जेष्ठ समाजसेवक), एकनाथ जगताप (ज्येष्ठ समाजसेवक), शरणबसपा मुळजे ( उत्कृष्ठ समाज सेवक)

### डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार

रत्नाकर गायकवाड (जेष्ठ आंबेडकर चळवळीतील नेता), महादेव गायकवाड ( वातंत्र्य सैनिक), चंद्रकला गायकवाड (पोलीस पाटील), फकिरप्पा बनसोडे (उत्कृष्ठ पोलीस अधिकारी), शरणबसपा सोनकांबळे (उत्कृष्ठ महापारेषण अधिकारी), अँड. आनंद बनसोडे ( त्कृष्ठ वकील), अण्णाप्पा सोनकांबळे (उत्कृष्ट शिक्षक), कल्याणी बनसोडे (अधिकारी), डॉ. सूर्यकांत गायकवाड (उत्कृष्ठ प्राध्यापक).

### मूकनायक युवा समाजभूषण पुरस्कार

लखन गायकवाड (युवा समाजसेवक), सुभाष गायकवाड (युवा समाजसेवक), आकाश गायकवाड (युवा समाजसेवक), बलभीम बनसोडे (युवा समाजसेवक), सुरेश सोनकांबळे (युवा समाजसेवक) ,महादेव सोनकवडे (उत्कृष्ठ निवेदक), श्रुती भांगे (युवा सरपंच) तीपवा गायकवाड (युवा उपसरपंच), शाम बाबर (युवा समाजसेवक), सूरज सोनके (युवा समाज सेवक), चंद्रकांत बनसोडे (युवा समाजसेवक), तेजाबाई गुरव (अंगणवाडी सेविका), भाग्यश्री सोनकवडे (अंगणवाडी सेविका), मधुमती गायकवाड (आशा सेविका), सिद्धेश्वर होटकर (इंडियन आर्मी, महार रेजिमेंट).

### महात्मा फुले उद्योजक पुरस्कार

दयानंद बनसोडे (युवा उद्योजक), गौतम बनसोडे (युवा उद्योजक), शिवशरण सोनकांबळे (युवा उद्योजक), बसवराज गायकवाड (युवा उद्योजक), दयानंद बनसोडे (युवा उद्योजक)

### भीम योद्धा ज्येष्ठ समाजसेवक पुरस्कार

नामदेव सोनकांबळे ,कल्पा गायकवाड, कल्पा बनसोडे, चीतानंद सोनकांबळे, नागू बनसोडे, विजयकुमार गायकवाड, अवलपा बनसोडे, लक्ष्मण गायकवाड, लाडपा गायकवाड, यशवंत गायकवाड, मारुती सोनकवडे आदी.

## 'दामाजी'चे २,८०० प्रमाणे ऊसबील जमा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा,दि.४ मे-**

येथील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या २०२४-२५ हंगामातील शेवटच्या महिन्यात ऊस पुरवठा केलेल्या शेतक-यांना प्रति मे.टन २ हजार ८०० रूपयांप्रमाणे ऊसबील संबंधीत शेतकरी यांचे मागणीनुसार त्या त्या बँका तसेच पतसंस्था यांचेकडे वर्ग केले असलेची माहिती चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली. पुढे बोलताना ते म्हणाले, या हंगामामध्ये कारखान्याने २ लाख ९७ हजार ६८६ मे.टन ऊसाचे गाळप करुन ३ लाख ५ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. साखर उतारा सव्वादहा टक्के मिळालेला आहे. संचालक मंडळाने हंगामअखेर गळीतास आलेल्या संपुर्ण ऊसाचे बिल प्रति मे.टन रु. २ हजार ८०० प्रमाणे दिले आहे. तसेच तोडणी वाहतुक ठेकेदारांची बीले व कर्मचाऱ्यांचे वेतन यापुर्वी वेळेवर अदा केलेली आहेत. दामाजी कारखान्यावर ऊस उत्पादक सभासद शेतक-यांचा विश्वास असलेने कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांचे संपुर्ण ऊसाचे गाळप करुनच कारखान्याचा हंगाम बंद केला. पुढील सन २०२५-२६ हंगामाकरिता कार्यक्षेत्रातील ८ हजार ४०० हेक्टर ऊसाची नोंद दामाजी कारखान्याकडे झाली असुन ५ ते ६ लाख मे.टन गाळप करणेचा संचालक मंडळाचा मानस असलेचे त्यांनी सांगीतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत



# मनपा शिक्षकांच्या बदल्या करु नका

## मनपा शिक्षक संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

महानगरपालिका शाळेतील १० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांच्या बदल्या करण्याची हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यासाठी १० वर्षे एकाच शाळेत सेवा झालेल्या शिक्षकाची माहिती प्रशासनाकडून मागवण्यात आले आहे. मनपा शिक्षकांच्या बदल्या करु नये, यासाठी मनपा मागासवर्गीय शिक्षक संघटना व उर्दू शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपायुक्त किरण मोरे यांना निवेदन देण्यात आले.


मनपा शिक्षकांच्या बदल्या केल्याने शाळेवर कोणतेही दुष्यपरिणाम होतात. विद्यार्थी पटसंख्या कशी घटते. शाळेतील ८० टक्के शिक्षकांच्या बदल्या झाल्याने शाळेच्या सुरवातीला शालेय काम काज करण्यात कसे अडवची येतात या विषयासंबंधी उपायुक्तांशी चर्चा करण्यात आली. उपायुक्तांनी सर्व विषय आयुक्तासमोर मांडणार असून सर्व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेवून प्रशासनाची भूमिका जाहीर करणार असल्याचे उपायुक्तांनी सांगितले. यावेळी मनपा मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष नागेश गोसावी, उपाध्यक्ष अझर पंजेवाले, कोषाध्यक्ष संदीप घोळवे, उदू फेडरेशनचे अध्यक्ष फजल अहमद शेख, उपाध्यक्ष इम्रान पठाण, मागासवर्गीय संघटनेचे महिला प्रमुख स्वाती शिंदे, आसमा शेख, अर्चना मनअंकलगी, आरती शिवशरण, सुवर्णा माने, प्रसन्न निकले, किरण शेळगे, विजय टेकाळे, राहुल पाटील, धीरज कुचेकर, रणधीर तांबिले, कृष्णपरमेश्वर सुतार, विशाल मनाळे उपस्थित होते.




# अभिनय जितका प्रामाणिकपणे कराल, तितका तो उत्तम होईल : आमिर खान

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ मे -**

एआय तंत्रज्ञानामुळे चित्रपटसृष्टीत मोठा बदल घडत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अभिनेत्याशिवाय दृश्य चित्रित करणे शक्य झाले आहे. चित्रपटसृष्टीत काम करताना तुमचे काम तुम्ही जितके प्रामाणिकपणे कराल, तितके ते उत्तम होईल , असे मत प्रसिद्ध अभिनेते आमिर खान यांनी रविवारी व्यक्त केले. वेव्हज २०२५ मध्ये 'अभिनयाची कला' या विषयावर त्यांनी अतिशय सहजसोप्या पद्धतीने उपयुक्त सल्ले देत उपस्थितांची मने जिंकली.



आमिर खान पुढे म्हणाले की, मी प्रशिक्षित अभिनेता नाही. माझी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये जाण्याची माझी इच्छा होती, पण जमले नाही. मी माझ्या वाटचालीत लहान-लहान गोष्टी शिकलो, ज्या माझ्यासाठी उपयोगी ठरल्या. ज्यांनी गेल्या अनेक वर्षांत साकारलेल्या अनेक अविस्मरणीय भूमिकांची भारतीय सिनेमाला भेट दिली आहे. आणि त्या भूमिकेच्या अंतरंगात ते कशा प्रकारे सामावून जातात? त्यावर या सिनेक्षेत्राला वाहून घेतलेल्या अभिनेत्याचे उत्तर आहे, ''मी स्क्रिप्टसोबत खूप वेळ घालवतो. मी पटकथा पुन्हा पुन्हा वाचतो. जर पटकथा चांगली असेल, तर तुम्हाला त्या पात्राची समज येईल, त्याचे भौतिक स्वरुप, वृत्ती इत्यादी सर्व काही त्यातूनच येईल''. याव्यतिरिक्त, दिग्दर्शकाशी पात्राबद्दल आणि कथेबद्दल चर्चा केल्याने देखील कल्पना येते. माझी स्मरणशक्ती कमी आहे. त्यामुळे मी हाताने संवाद लिहितो. सर्वात आधी मी अवघड दृश्ये करायला घेतो. संवादांचे पाठांतर झालेच पाहिजे.

पहिल्या दिवशी मी केवळ त्यावर काम करतो, तीन ते चार महिने मी दररोज तेच करत राहतो आणि मग त्यामध्ये शिरतो. संवाद हे तुमच्यामध्ये सामावले पाहिजेत. ते तुमचे स्वतःचे वाटले पाहिजेत. ज्यावेळी ते लिहिले गेले तेव्हा ते पटकथाकाराचे होते. पण नंतर ते तुमचे झाले आहेत. ज्यावेळी तुम्ही एक ओळ पुन्हा पुन्हा उच्चारता, तेव्हा तुम्हाला जाणीव होते की हे तुम्ही अनेक प्रकारे करू शकता.

कलाकारांसाठी सर्वात कठीण काम कोणते असते? त्यावर आमिर खान म्हणाले, कलाकाराला दररोज पुन्हा पुन्हा त्याच उत्कटतेने भावनिक अभिनय सादर करावा लागणे. नवोदित कलाकारांसाठी ते म्हणाले ''तुमचे काम तुम्ही जितके प्रामाणिकपणे कराल, तितके ते उत्तम होईल''.

''मी शॉट्स देण्यापूर्वी त्या दृश्याची कल्पना करतो आणि त्या दृश्यांचा सराव करत असताना मी कधीच आरशात पाहत नाही.''

आतापर्यंतच्या सर्व चित्रपटांपैकी आमिर खान यांचा आवडता चित्रपट कोणता? अनेकांनी अंदाज लावलाच असेल, की तो चित्रपट 'तारे जमीन पर' असावा. तर होय, कारण या चित्रपटाने अनेक पालकांना त्यांच्या मुलांशी संयमाने वागायला, त्यांना प्रसंगी आधार द्यायला आणि त्यांच्या लहान मुलांशी सहानुभूतीपूर्वक वागायला शिकवले!

अभिनय क्षेत्रात सुरुवात करणाऱ्या नवोदितांसाठी या ज्येष्ठ अभिनेत्याकडे आणखी कोणत्या टिप्स आहेत?

''भावना या पटकथेतूनच समोर येतात. तुमचा पटकथेवर विश्वास असावा लागतो. कधीकधी चित्रपटांमध्ये अशी काही दृश्ये असतात, जी अविश्वसनीय वाटतात. पण अभिनेता तुम्हाला त्यावर विश्वास ठेवायला भाग पाडतो. त्यामुळे अभिनेत्याला प्रेक्षकांना पडद्यावर दाखवली जाणारी गोष्ट पटवून सांगावी लागते''.चांगली पटकथा म्हणजे काय असते? यावर त्यांनी सांगितले, की ''चांगल्या पटकथेला उत्तम संकल्पनेचा आधार असावा लागतो. कथेच्या पहिल्या दहा टक्के भागात कथानकाचे ध्येय निश्चित झाले पाहिजे. नाहीतर प्रेक्षकांचा हिरमोड होईल''.यावेळी केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांच्या हस्ते आमिर खान यांचा सत्कार करण्यात आला.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे ११ मे रोजी वधू-वर पालक परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे रविवार ११ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत श्री हिंगुलांबिका सांस्कृतिक भवन गणेश पेठ येथे सायंकाळी सात वाजता वधू-वर पालक परिचय मेळावा संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर भावसार क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे असणार आहेत. तसेच श्री हिंगुलांबिका देवी देवालय ट्रस्टी अध्यक्ष किशोर कटारे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. वालचंद कॉलेजचे प्रा. भिमाशंकर बिराजदार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे. मेळाव्याला मुंबई, पुणे, बेंगलोर, कलबुर्गी, लातुर, उस्मानाबाद, तुळजापूर, अक्कलकोट, पंढरपूर, विजयपूर येथून भावसार समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यात हिंगलाज माता पतसंस्था व भावसार नागरी सहकारी पतसंस्था व संचालक मंडळाचे सहकार्य लाभत आहे, असे भावसार समाज ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, सचिव अरुण आकुडे, खजिनदार रविंद्र खमितकर, कार्याध्यक्ष शशिकांत रंगदळ यांनी कळविले आहे. मेळाव्यात संस्थेच्या वतीने उपस्थित समाज उपवधूंना आकर्षक भेट वस्तू देण्यात येणार आहे. तसेच उपस्थितांमधून लकी ड्रॉ द्वारे पैठणी देण्यात येणार आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### भांडण मिटवण्यासाठी गेल्यावर चाकूने मारहाण

**सोलापूर, दि. ४ मे-**



भांडण मिटवण्यासाठी गेल्यानंतर लाथा बुक्क्यांनी मारहाण करत चाकूने मारून जखमी केल्याची घटना २ मे रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास रमाबाई आंबेडकर नगर येथे घडली.याप्रकरणी नालंदा दिलीप सोनवणे (वय-३२,रा.अक्षत पाम्स डोणगाव रोड) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सुभ्रजीत लक्ष्मण कांबळे (रा.रमाबाई आंबेडकर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व तिचे पती दिलीप सोनवणे,मुलगी प्रिया कांबळे असे मिळून जावई सुभ्रजीत कांबळे यांच्या घरी सकाळी झालेल्या भांडण मिटवण्यासाठी आले होते. त्यावेळी संशयित आरोपी याने फिर्यादी यांच्या अंगावर चटणीचे पाणी टाकून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली.त्यानंतर घरात जाऊन घरातील चाकू घेऊन फिर्यादी यांचे पती यांच्या हाताच्या पोटरीवर व कपाळावर मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहायक फौजदार ओव्हळ हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण

**सोलापूर, दि. ४ मे-**



किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता सुमारास मड्डी वस्ती येथे घडली.याप्रकरणी अंजना भगवान भांगे (रा.निराळे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून राज्यश्री आनंद मोडेकर व राज गोसावी (रा.मड्डी वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी यांची नात व नातू यांचा शाळेत पेपर असल्याने ते शाळेतील पेपर देऊन घरी परत आले.त्यावेळी फिर्यादी यांना सांगितले की,फिर्यादी यांची मुलगी राजश्री हिने तुम्ही आमच्या सोबत राहायचे नाही, तुम्ही तुमच्या आजी आजोबाकडे राहायचे असे म्हणून आई व तिच्या सोबत असणारा राज गोसावी याने शिवीगाळ करून हाताने मारहाण करून आजीच्या घरी आणून सोडण्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहे.

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. ४ मे-**



हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बी.एस.६४३९ ही जुना आरटीओ ऑफिस जवळील अभिजीत मेडिकल जवळेल असलेल्या विद्युत डीपीला लागून पार केलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २० मे रोजी घडली याप्रकरणी विठ्ठल धानप्पा सोनकांबळे (वय-६१,रा.बुधवार पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सरतापे हे करीत आहेत.

### भारत विद्यालयात कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि. ४ मे,**

मजरेवाडी येथील भारत उर्दू व मराठी विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शाहीन अतार होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक उपाध्यक्ष वसीम पठाण होते. प्रारंभी मुख्याध्यापक एस. के. सरसंबे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणयांच्या हस्ते धवजारोहण करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील तमन्ना मकानदार या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले. भारत मराठी विद्यालयाचे सहशिक्षक एस.एम. ढाकणे, वसीम पठाण, शाहीन अतार उपस्थित होते. सूत्रसंचालन एन. झेड. सययद यांनी तर एस.ए. सय्यद यांनी मानले.




# न्यायहक्काच्या रक्षणासाठी नव्या क्रांतीची गरज

## डॉ. भीमराव आंबेडकर; बौध्द साहित्य संमेलनात विविध सहा ठरावांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

आपल्या हक्कांसाठी आपल्यालाच संघर्ष करावा लागतो. दुसरा कोणीतरी आपल्याला न्याय मिळवून देईल, या भ्रमात राहू नका हा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे. डॉ. बाबासाहेबांनी क्रांती करूनच आम्हाला हक्क मिळवून दिले आहेत. मात्र, आता आपले हक्क धोक्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेबांना विरोध करणाऱ्या विचारांच्या शक्तीपासून आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासह संविधान वाचविण्यासाठी नव्या क्रांतीची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने आता सज्ज रहावे, असे आवाहन भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर यांनी केले.

येथील बौध्द साहित्य मंडळ यांच्यातर्फे हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित एक दिवसीय बौध्द साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात डॉ. आंबेडकर बोलत होते. याप्रसंगी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, रिपाइं(ए) चे प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री राजाभाऊ सरवदे, माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, भीमशक्ती संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सुबोध वाघमोडे, बसपाचे प्रदेश महासचिव ॲड. संजीव सदाफुले, कामगार नेते जनार्दन शिंदे, माजी गटनेते आनंद चंदनशिवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या देशाच्या जडण-घडणीत बौध्दांचे, जैनांचे आणि मुस्लीम समाजाचे योगदान मोठे आहे. मात्र काही न केलेली मंडळी मात्र आमचे हक्क आणि योगदान नाकारत आहेत. गेल्या काही वर्षांपासून विशेषतः २०१४ पासून इतरांचा इतिहास दाबण्याचा प्रयत्न होत असल्याने अल्पसंख्याक समाज घटक भयभीत झाल्याची खंत डॉ.आंबेडकर यांनी व्यक्त केली.

केवळ मंदिर आणि मशिदीचे राजकारण सुरू आहे. कालपरवाच्या संघटना आज सत्तेच्या केंद्रस्थानी आहेत. सरकारी नोकऱ्या नाहीत. दुसरीकडे शिक्षणाचे खाजगीकरण सुरू आहे. यातून आपले अस्तित्वच संपणार आहे. आपल्या पुढील पिढीसाठी, त्यांच्या न्याय हक्काच्या दुसऱ्या लढ्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन डॉ. आंबेडकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. युवराज भोसले यांनी केले.

### सहा ठरावांना दिली मंजुरी

यावेळी विविध ठरावांचे वाचन कोषाध्यक्ष किरण बनसोडे यांनी केले. यामध्ये बिहार राज्यातील बुध्दगया येथील महाबोधी बुध्दविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर शालेय स्तरावर इयत्ता पाचवीपासून पाली अभ्यासक्रम सुरु करावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, येथे पाली भाषेतून पीएच. डी. सुरु करावी. सर्व महाविद्यालयांमध्ये बी.ए. अभ्यासक्रमात पाली विषय सुरु करण्यात यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात एम. ए. मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विषय सुरू करावा. सर्व बुध्दविहारात ग्रंथालयास मान्यता देऊन अनुदान सुरू करावे. जातींचे वर्गीकरण करताना, आरक्षण ठरवताना महार आणि नव बौद्ध समाजाची एकत्र लोकसंख्या मोजून लोकसंखेच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे आधी ठरावांना मंजुरी देण्यात आली. हात उंचावून सर्वांनी त्याला प्रतिसाद दिला.

### सोलापूरच्या जयंतीचा सर्वांना अभिमान

सोलापूरमध्ये साजरी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळ्याचा संपूर्ण देशातील आंबेडकरी जनतेला अभिमान आहे. सोलापूरची जयंती पाहून, बौध्दांचे संघटन पाहून समाधान आणि अभिमान वाटत असल्याचे डॉ. भीमराव आंबेडकर यांनी म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

# वैश्विक शांततेसाठी बुद्ध विचारांशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही

## बौद्ध साहित्य संमेलनातील परिसंवादात झाले विचार मंथन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. ४ मे-**

बौद्ध हा वैश्विक धर्म असून जगाला एका विश्व धर्माची गरज आहे आणि ही जागा फक्त आणि फक्त अडीच हजार वर्षांपूर्वीचा इतिहास असलेला बौद्ध धम्मच घेऊ शकतो. वैश्विक शांततेसाठी बुद्ध विचारांशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही, असा सूर सोलापुरातील बौद्ध संमेलनातील परिसंवादात उमटला.

हुतात्मा स्मृती मंदिर येथे बौद्ध साहित्य मंडळाच्या वतीने शनिवारी एक दिवसीय बौद्ध साहित्य संमेलनात बौद्ध धम्माची आधुनिक काळात गरज या विषयावर आयोजित परिसंवादात प्रा. डॉ. मोहिते बोलत होते. याप्रसंगी संमेलनाचे अध्यक्ष योगीराज वाघमारे व स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांची प्रमुख उपस्थित होती.

प्रा.डॉ. मोहिते म्हणाले, जगामध्ये पुन्हा एकदा बौद्ध धम्मा पसरवायचा असेल तर पाली भाषेकडे यावे लागेल. तक्षशिला, नालंदाच नाही तर अशा प्रकारची तीस विद्यापीठे त्या काळात अस्तित्वात होती असे उत्खननातून सिद्ध झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सुद्धा सिद्धार्थ आणि मिलिंद महाविद्यालयाच्या रूपाने अशा शिक्षण संस्था पुढे आणायच्या होत्या, असेही ते म्हणाले.

प्रा.प्रकाश शिंदे म्हणाले, स्वैराचारी जीवनाला स्वतः घातलेले बंधन म्हणजे धम्म असून तो आपल्या वर्तनाने व आचरणातून दिसला पाहिजे. नीतिमान,विनयशील व नम्र आहे तो बौद्ध. तसेच त्या काळी लोक गरीब होते आणि चळवळी श्रीमंत होत्या.

परंतु आज चळवळी गरीब आणि लोक श्रीमंत झाल्याचा विरोधाभास दिसून येत असल्याचे ते म्हणाले. प्रा. डॉ. संघप्रकाश दुड्डे म्हणाले,वैश्विक शांततेसाठी बुद्धा शिवाय या जगामध्ये दुसरा कोणताही पर्याय नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे , असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर अवघडे यांनी केले तर आभार निर्मला मौळे यांनी मानले.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याची तुळशी माळ अर्पण



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि, ४ मे -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस श्रीमती अलका अंकुश घाडगे (रा. आनंदनगर टाकळी रोड, पंढरपूर) यांनी श्रींच्या चरणी सुमारे ५ लक्ष किमतीची सोन्याची तुळशी माळ अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते. या सोन्याच्या तुळशी माळेला ४३ पाने व ८८ व्हर्टिकल मणी आहेत. त्याचे अंदाजे वजन ६०.७८ ग्रॅम असून, ५ लक्ष १४ हजार इतकी किंमत होत आहे. देणगीदार हे पंढरपूर येथील रहिवासी असून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे भक्त आहेत. सोने चांदी देणगी स्वीकारण्यासाठी स्वतंत्र विभाग आहे. त्यासाठी अनुभवी व तज्ञ सराफाची नियुक्ती करण्यात आली आहे. सोने-चांदी देणगी देणाऱ्या भाविकांना संगणकीय प्रणाली द्वारे पावती देण्यात येते. इच्छुक भाविकांनी मंदिर समितीच्या कार्यालयात संपर्क करावा, असे आवाहन श्रोत्री यांनी केले.



### सोलापुरात नीट परीक्षेसाठी मुलींचीच गर्दी...

**सोलापूर : नीट परीक्षेसाठी शहरातील १५ केंद्रातून ६६०२ पैकी ६४५३ विद्यार्थी परीक्षेस बसले. १४९ विद्यार्थी गैरहजर होते. सिद्धेश्वर वुमन्स पॉलीटेक्निक कॉलेज केंद्रावर मुलींचीच गर्दी होती. ते टिपलेले छायाचित्र.** (छायाचित्र : केवल तिवारी)

# पद्मश्री मजुमदार अन इचगावकर-गंधे यांची स्वरसेवा विठूराया चरणी समर्पित

## पंढरपूरात संगीत महोत्सव; नादब्रह्म कला व आरती साऊंडचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ मे-**

येथील दिवंगत मृदंगाचार्य तात्यासाहेब मंगळवेढेकर आणि शंकराप्पा मंगळवेढेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजीत संगीत महोत्सवात आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम बासरीवादक पद्मश्री पंडित रोणूजी मजुमदार यांचे बासरीवादन आणि रश्मी इचंगावकर यांचे शास्त्रीय गायन संपन्न झाले. यानिमित्ताने दोघांची ही स्वरसेवा विठूरायाच्या चरणी समर्पित झाली.




अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी करकंबचे नादब्रह्म कला फाऊंडेशन, येथील आरती साऊंड सिस्टीम, मनमाडकर परिवार तसेच पं.शौनक अभिषेकी यांच्या मार्गदर्शनाखाली या संगीत महोत्सवाचे आयोजन केले होते. सुरुवातीला माजी आमदार प्रशांत परिचारक, ह.भ.प.शंकर महाराज बडवे, मिलिंद परिचारक, मोहन मंगळवेढेकर, ह.भ.प.निरंजन महाराज मनमाडकर, डॉ प्रसाद कुलकर्णी, भगवान मनमाडकर, ज्ञानेश्वर दुधाणे, शुभांगी मनमाडकर आणि कलाकार रश्मी इचंगावकर - गंधे यांच्या हस्ते प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन झाले. आयोजक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर पंढरपूरची लाडकी लेक रश्मी इचंगावकर-गंधे यांचे गायन झाले. राग केदार गात त्यांनी रसिक श्रोत्यांना अतिशय सुंदर शास्त्रीय संगीताची मेजवानी देत शेवटी ठुमरी आणि उड जाएगा हंस अकेला अप्रतिम रचना गायली. यावेळी त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला अभाजित बारटक्के, हार्मोनियम श्रीरंग जाखी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ वैभव केंगार यांनी केली. द्वितीय सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीचे ख्यातनाम बासरीवादक पंडित रोणूजी मजुमदार यांचे बासरीवादन झाले. त्यांना नुकताच पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल समस्त पंढरपूरकर कलारसीक, कलासाधकांच्या वतीने प्रशांत परिचारक यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर बासरीवादनाला सुरुवात झाली. सुरूवातीला राग यमन कल्याण यामध्ये आलाप जोड झाला अप्रतिम सादर करत त्यांनी पंढरीच्या विठूराया चरणी आपली वादन सेवा रुजू केली. त्यानंतर त्यांनी अतिशय सुंदर रुपक तालातील बंदीश आणि द्रुत तीन तालातील गत वाजवली. माझे माहेर पंढरी तसेच आनंदी मजुमदार यांनी पायोजी मैने राम रतन धन पायो अभंग सादर केला. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला व्ही. नरहरी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, बासरी अथर्व भुमकर, तानपुरा उदय भुमकर तर टाळ आनंदी मजुमदार यांनी करीत कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली. कार्यक्रमास पंढरपूर आणि पंढरपूर पंचक्रोशीतील कलासाधक आणि कलारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संकेत कुलकर्णी यांनी केले. आरती मनमाडकर यांनी आभार मानले. यावेळी श्री. सुपेकर आणि धनंजय मनमाडकर यांनी ध्वनी व्यवस्था सुंदर संभाळली होती.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०६

**मग देवा म्हणे देख देख । हे गोत्र गुरु अशेख ।**
**तंव कृष्णा मनीं नावेक । विस्मो जाहला ।।**

अनेक वेळा विनंती व प्रयत्न करुनही कौरवांनी पांडवांना न्याय दिला नाही. युध्द होऊ नये म्हणून पाठविलेला शांतीचा प्रस्तावही कौरवांनी फेटाळला. नको तेवढी अपमानास्पद, लज्जास्पद व अन्यायकारक वागणूक कौरवांनी पांडवाला दिली. म्हणून न्यायासाठी व अन्याय संपविण्यासाठी महाभारतीय युध्दाची घोषणा करण्यात आली. प्रत्यक्ष रणभूमीवर युध्दासाठी दोन्ही बाजू तुल्यबळ होऊन उभ्या आहेत. या प्रसंगी अर्जुनाला कौतुक म्हणून वाटले की आपण कोणाशी लढणार आहोत, कोण आपल्याशी लढणार आहे ते सहज पाहून तरी घ्यावे. म्हणून त्याने श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागी नेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे श्रीकृष्णांनी दोन्ही सैन्याच्या मध्ये रथ उभा केला. तेव्हा अर्जुनाने समोर शत्रुपक्षाकडे पाहिले असता त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.समोर लढणारे किंवा आपण ज्यांच्याशी लढणार आहोत ते दुसरे-तिसरे कोणी नसून आपले बंधू, पिता,



पुत्र, गुरुजन, मामा, काका, आदि आप्तजन आहेत हे त्याच्या लक्षात आले. आपण कोणाशी लढायला आलो हे पाहून अर्जुन आश्चर्यचकित झाला. समोरचे सर्व आप्तजन योध्दे पाहिल्यानंतर त्याने श्रीकृष्णाला म्हटले, कृष्णा पाहा, पाहा हे सर्व तर आमचे गोत्रज, गुरुच आहेत. युध्दासाठी आलेल्या अर्जुनाच्या तोंडून असे वाक्य ऐकताच श्रीकृष्णाला आश्चर्याचा धक्काच बसला. कृष्णाला वाटले की युध्द कोणाशी करावे लागणार आहे याची युध्दभूमीवर येण्याअगोदरच अर्जुनाला पुर्ण कल्पना होती. तरी पण ऐन युध्दाच्या वेळी मला शत्रुपक्ष आप्तजन दिसु लागले आहेत असे अर्जुन म्हणाला.

अनेकांच्या जीवनातही बऱ्याचवेळा असे घडत असते. स्वार्थ, लोभ, मोह, गर्व हे सर्व माणसाचे स्वत:चेच असतात. पण यांच्यामुळे माणूस माणुसकीपासून दूर जातो. म्हणून यांना आपल्यातून काढुन टाकणे आवश्यक असते. जेव्हा यांना काढण्याची वेळ येते तेव्हा मात्र माणूस विचार करतो की, माझे सर्व बरोबर आहे. मी माझा मोह, लोभ, स्वार्थ का सोडावा. अर्थात, माणसाची द्विधा अवस्था होते. माणूस आपल्या अंतर्गत शत्रूंशी लढू शकत नाही. त्यामुळे तो आपोआप पराजित होत असतो. खरे म्हणजे वाईट ते वाईटच असते. पण हे सर्व आपले असल्याने वाईट सुध्दा माणसाला चांगले वाटू लागते व त्याचा विपरीत परिणाम कालांतराने का होईना भोगण्याची वेळ माणसावर येते. अर्जुनाला या मोहातून बाहेर काढण्यासाठी श्रीकृष्ण परमात्मा मिळाले. आपणाला काम, कोध्र, मोह, मत्सर, द्वेष, अभिमान या संकटातून बाहेर काढण्यासाठी माऊलींची श्री. ज्ञानेश्वरी मिळाली असल्याने आपण तिचा लाभ घेऊ या. हा लाभ म्हणजे जीवनातील आनंद असेल. ज्ञानेश्वरीच्या ज्ञानामृत अनुभूतीमुळे जीवनातील आनंदलहरी वाढतील.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. ५ मे २०२५**
**विक्रम संवत् २०८१**
**शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसू**
**मास - वैशाख**
**शु. अष्टमी (०७.३५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - आश्लेषा (१४.००)**
**योग - वृध्दि (२४.१८)**
**करण - बालव (२०.०१)**

**दिनविशेष - चांगला दिवस, शंकर महाराज पु. ति. पुणे**
**दुर्गाष्टमी**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्यात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :**जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# एसटीची आवडेल तेथे प्रवास योजना सुरु

## अठराशे ते पाच हजारांत घ्या सहलीचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

प्रवाशांचे सेवेसाठी हे ब्रीदवाक्य खरे ठरवत, राज्यातील प्रवाशांना एसटी महामंडळाने नवी योजना आणली आहे. एसटीची आवडेल तेथे प्रवास योजना असे त्याचे नाव असून उन्हाळ्यात गोव्यासह महाबळेश्वर, कोकणात कुठेही फिरण्यासाठी एसटीची आवडेल तिथे प्रवास ही महाराष्ट्र योजना लाभदायी आहे. एसटीच्या बारा मीटर ई-बससाठी सात दिवसांकरिता ५००३ रुपयांत आंतरराज्य प्रवास करता येणार आहे. तर चार दिवसांसाठी २८६१ रुपये मोजावे लागणार आहेत. साधी व शिवशाहीची सेवा यापेक्षा कमी रक्कमेत उपलब्ध आहे.

दरम्यान, उन्हाळ्याच्या सुटीत चार सहलीचे आयोजन करण्यासाठी आवडेल उपयुक्त आहे. कोणत्याही बस स्थानकावर चार किंवा सात दिवसांचे पास उपलब्ध असतात. या पासवर चार किंवा सात दिवस आवडेल तिथे प्रवास करता येतो. बसच्या वेळापत्रकाची योग्य माहिती असेल तर या पासवर पासच्या किमतीपेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रवास करता येणे शक्य आहे.

### योजना लाभदायक

कोणत्याही बस स्थानकावर चार व सात दिवसांचे पास उपलब्ध असतात. पास काढण्यासाठी एक फोटो आवश्यक असतो. चार दिवसांच्या साध्या पासच्या पैशाचा मोबदला अगदी एका दिवसांत मिळू शकतो. इतकी ही लाभदायी योजना आहे. त्यासाठी प्रवाशांनी या योजनेचा लाभ घ्यावा. **- अमोल गोंजारी,** विभाग नियंत्रक सोलापूर एस टी विभाग

### पासच्या वापरासाठी 'हे'लक्षात ठेवा

- प्रवासाची ठिकाणे निश्चित करा
- पास काढण्यापूर्वी ठिकाणसाठीच्या बसच्या वेळा माहिती करून घ्या
- बस सुटण्याच्या योग्यवेळी बस स्थानकावर हजर रहा
- दिवसा प्रेक्षणीय स्थळांच्या भेटी व जवळचे प्रवास करा
- लांबपल्ल्याचा प्रवास शक्यतो रात्री करा

### १ फेब्रुवारीपासून असे आहेत सुधारित योजनेचे दर

| गाडीचा प्रकार | चार दिवस प्रौढ / मुले | सात दिवस प्रौढ / मुले |
|---|---|---|
| साधी/ जलद / रातराणी | १८१४ / ९१० | ३१७१ / १५८८ |
| शिवशाही (आंतरराज्यसह) | २५३३ / १२६९ | ४४२९ / २२१७ |
| १२ मीटर ई-बससह सर्व | २८६१ / १४३३ | ५००३ / २५०४ |



# नूर ट्रस्टतर्फे डॉ. सदफआरा सगरी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर विद्यापीठची विद्यार्थिनी सदफ आरा शफी चोबदार सगरी यांनी महाराष्ट्र की खातून अफसानानिगारों की अदबी खिदमत या विषयावर शोधनिबंध सादर करून पीएचडी ची उच्च पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठचे डीन डॉ. वसंत कोरे यांच्या अध्यक्षतेखाली वायवा संपन्न झाला मार्गदर्शक डॉ. फरजाना शेख, परिक्षक म्हणून अंबेजोगाई येथील प्राचार्या डॉ अकिला सय्यद उपस्थित होत्या. सदफ आरा यांच्या या यशाबदल नूर ट्रस्ट व उर्दू मराठी साहित्य परिषदतर्फे नजीर मुन्शी यांच्या हस्ते शाल बुके देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी प्रा. खाजाभाई काक्रमकर, अय्यूब नल्लामंदू, अ.मजीद सगरी, शोएब सगरी , महमूद नवाज, मजहर अल्लोळी, डॉ. शफी चोबदार उपस्थित होते.

# पठाण परिवाराकडून लक्ष्मी मंदिर परिसराचे सुशोभीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

इंगळे वस्ती निलम नगर येथील आशा मराठी विद्यालय आणि श्री धर्मण्णा सादूल प्रशालेच्या क्रिडागंण समोरील जागेत पुरातन काळापासून लक्ष्मी मंदिर आहे. याला अवकळा आली होती. शिक्षण समूहाचे संस्थापक हारुण पठाण परिवाराच्या वतीने या मंदिर परिसराचे सुशोभीकरण स्व: खर्चाने करण्यात येणार आहे.

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भूमीपुजन सौ व श्री विष्णू इंगळे, सौ व श्री जगदीश मुसळे, सौ व श्री भिमा कोरे, सौ व श्री चिदानंद निंबाळ या दाम्पत्यांच्या हस्ते देवीस खणा नारळाची ओटी भरली आणि भूमिपूजन करण्यात आले. तसेच थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त उपस्थितांकडून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी आशा मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तस्लिमबानो पठाण, श्री धर्मण्णा सादूल प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ आफरिन सय्यद आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पठाण परिवाराच्या वतीने या पुर्वी ही मातंगी मंदिरा साठी जागा उपलब्ध करून देऊन मंदिराच जिर्णोध्दार केले होते. निलम नगर परिसरातील शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यात नेहमीच सहकार्याची भूमिका असते.

पठाण परिवाराकडून हिंदू मंदिर परिसराचे सुशोभीकरण हे बंधुभाव जपणार कार्य आहे. यामुळे धार्मिक एकोपा वाढीस लागेल. श्रध्दास्थान सुशोभीकरण केल्याने एक आत्मिक समाधान मिळेल असे मत हारुण पठाण यांनी व्यक्त केले.

# आयडल्स संस्थेतर्फे महात्मा बसवेश्वर महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. ४ मे-**

जगद्ज्योती श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयडल्स संस्थेचे संस्थापक कुणाल बाबरे यांच्या उपस्थितीत बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे उत्सव अध्यक्ष श्रीशैल हिरेमठ, सुमित शिवशरण, आनंद बनसोडे, धीरज बंदपट्टे,कपिल बाबरे,रोहन गायकवाड,सूमो शिवशरण, नागेश



कोप्पा, बंटी गायकवाड, अनिल बाबरे, अनिल विटकर उपस्थित होते.

# शुभराय मठात डॉ. रोहित तापडिया यांचा सत्संग


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

अक्षय्य तृतीया निमित्ताने शुभराय मठात डॉ. रोहित तापडिया यांचा मीच माझा मित्र आणि मीच माझा शत्रू या विषयावर सत्संग झाला. डॉ. रोहित तापडिया यांनी आपल्या वाणीतून भक्त गणांना मंत्रमुग्ध केले.

श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या जीवन चरित्रावरून मीच माझा मित्र आणि मीच माझा शत्रू याचे वर्णन केले. आज साडेतीन मुहूर्तांपैकी- अक्षय तृतीया दिवशी केलेला सत्संग महत्वाचा असुन ते चिरंतन राहते. या पृथ्वीतलावर देव माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी अवतरले हे त्यांनी सत्संगातून विषद केले. आपले मन आपले शत्रू व मित्रही असतात. चांगले व वाईट विचारातून आपल्या मनाद्वारे बुद्धीचा वापर करवा. माणसाला विवेक योग्य अयोग्य गोष्टींचे मार्गदर्शन करित असतो. मीच माझा मित्र आणि मीच माझा शत्रू याच्या पलीकडे जाऊन भगवंतात मिसळणे यालाच सत्संग म्हणतात. जगामध्ये सर्व गोष्टीत रसहीनता असावी पण भागवंतात रस असावा. याचे विश्लेषण त्यांनी उदाहरणे देऊन केले. माणूस म्हणून कसे जगायचे हे भगवंताच्या जिवनचरित्रातून समजते. कर्माच्या बंधनातून भगवंतही मुक्त होऊ शकत नाहीत मग आपण तर मानव. त्यासाठीच आपण कोणतेही कार्य करित असताना आपल्याकडे येणारा माणूस हा भगवंत आहे असे आपण समजावे.

मनाला वारंवार समजाऊन सांगण्याची गरज आहे. येण्याऱ्या परिस्थितीला मनाची तयारी करुन घेणे खुप महत्वाचे असते. यावरूनच मित्र व शत्रूत्वाची कल्पना येते. सरतेशेवटी डॉ. रोहित तापडिया यांनी आपल्या सत्संगातुन एक अमुल्य संदेश दिला.

जिवन जगण्याची कला मुलांना आई-बाबांनी शिकवावी. सत्संग ऐकल्याने अनेक प्रश्नाच्या समस्या सुटतात. कार्यक्रमाची सुरवात श्लोकाने झाली. श्री शुभराय महाराज मठाधिपती श्रीमती शुभांगीताई बुवा यांनी वक्त्यांचा परिचय करुन दीला. कार्यक्रमाचे नियोजन श्री शुभराय महाराज मठातील सर्वांनी केले. श्री शुभराय महाराजांची आरती झाली. भक्तगणांना प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.



# जी. एम. संस्थेतर्फे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीच्या निमित्ताने महात्मा बसवेश्वर चौक येथील महात्मा बसवेश्वर यांच्या अश्वारूढ पुतळ्यास जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जी.एम संस्थेचे उत्सव अध्यक्ष अजहर शेख व सामाजिक कार्यकर्ते जी.एम संस्थेचे सल्लागार राजाभाऊ हौशेट्टी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन दीपप्रज्वलित करून समता नायक महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना जी.एम संस्थेचे विश्वस्त शशिकांत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सामाजिक कार्यकर्ते जीएम संस्थेचे मार्गदर्शक राजाभाऊ हौशेट्टी, जीएम संस्थेचे उत्सव अध्यक्ष अजहर शेख, जीएम संस्थेचे विश्वस्त शशिकांत गायकवाड, दत्ता शिंदे, आप्पासाहेब गायकवाड, नरेंद्र शिंदे, कुंदन वाघमारे, नरेश कदम, अजय कोळेकर, मॅडी दुपारगुडे, यशपाल कांबळे, निहाल क्षीरसागर, नंदकुमार चंदनशिवे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होते.

# खादीमुल हुज्ज़ाज हज कमिटीचे शफीक रचभरे यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

यावर्षी हजला जाणाऱ्या पहिला भाविकांचा विमान रवाना झाला. त्यावेळी त्या भाविकांचे हज कमेटी ऑफ इंडियातर्फे उत्तम स्वागत करून त्यांना मुंबईवरून मदीना येथे रवाना करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा खादीमुल हुज्जाज हज कमिटीचे सदस्य शफीक रचभरे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जाईंट सेक्रेटरी सी. पी. बख्शी, हज कमेटी ऑफ इंडियाचे प्रशासन अधिकारी शानवास, उपप्रशासन अधिकारी डॉ. सदाकत अली, नियाज़ अहमद साहब, सऊदी एयरलाइंस के अधिकारी तसेच मुंबई एयरपोर्ट अथॉरिटीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हा खादीमुल हुज्जाज हज कमेटीच्या सदस्यांनी आपल्या जिल्ह्यात हजला जाणाऱ्या भाविकांसाठी विविध शिबिरे आयोजन करून त्यांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्यांना खादीमुल हुज्जाज हज कमिटीच्या पदधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# संपर्क कार्यालयातून जनतेचे प्रश्न सोडवा

**मंत्री प्रताप सरनाईक; शहरअध्यक्ष सचिन चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

शिवसेना पक्ष जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठविणारा पक्ष आहे. संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून जनतेच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. शिवसेनाप्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्याप्रमाणे जनतेच्या विकासासाठी नेहमी कार्यरत असतात.त्याप्रमाणे सचिन चव्हाण यांनी जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावे . आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने पक्षसंघटना बळकटीकरणावर भर देऊन कार्यकर्त्यांची फळी तयार करा, असे आवाहन परीवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. शिवसेना शहर प्रमुख सचिन चव्हाण यांच्या कंबर तलाव ब्रीजजवळ बॉटर फ्रंट फेज २ येथील संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते.

यावेळी सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे , महिला संपर्क प्रमुख अनिता माळगे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहर समन्वयक दिलीप कोल्हे, युवती सेना प्रमुख प्रियंका परांडे, अमर पाटील, सोनाई फाऊंडेशनचे युवराज राठोड, युवराज चहाण, किरण चव्हाण , जितेश चव्हाण यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



### जनतेचे प्रश्न सोडविणार

संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवणार आहे. जनतेला शासकीय कार्यालयांमधील समस्या व अडचणी असल्यास संपर्क कार्यालयात संपर्क साधावे. जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यालय सदैव खुला राहणार आहे.या कार्यालयाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची मजबूत फळी तयार करून शिवसेना पक्ष तळागाळात पोहोचविणार असल्याचे शहरप्रमुख सचिन चव्हाण यानी सांगितले.



# मृदंग तपस्या हा कार्यक्रम महाराष्ट्रात एकमेव

**इंगळे महाराज; श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सोलापूर जुनी लक्ष्मी चाळ श्री महादेव मंदिर जुनी लक्ष्मी चाळ येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदायिक मृदंग वादन शिक्षण संस्था यांच्याकडून १ ते १५ में मृदंग तपस्या या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे

दिनांक ४ में रोजी अखिल भाविक वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष ह भ प सुधाकर महाराज इंगळे यांच्या हस्ते अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय परीक्षेला मृदंग वादन या विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी हभप ज्योतीराम महाराज चांगभले यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने मृदंग तपस्या हा कार्यक्रम महाराष्ट्रातील एकमेव कार्यक्रम आहे.

या कार्यक्रमांमध्ये कीर्तन भजन भारुड वारकरी दिंडी व शास्त्रीय वादन यांना मृदंग साथ करण्याचे शिक्षण दिले जाते या संस्थेमुळे अनेक विद्यार्थी मृदंग वादनास तयार झाले आहे तयार होत आहेत त्यामुळे निश्चितपणे ही मुले उद्याचे उत्कृष्ट मृदंग वादक आहेत असे हभप इंगळे महाराज यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

हभप पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी उत्कृष्ट मृदंग वादक या साध्या पर्यंत पोहोचण्यासाठी मृदंग तपस्या हे साधन महत्त्वाचे आहे तेव्हा मृदंग वादकांनी रोज रियाज करावा असे मनोगत व्यक्त केले यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळ राष्ट्रीय सचिव हभप बळीराम महाराज जांभळे, तबला विशारद श्री संभाजी घुले, हभप अरुण काका भोसले, हभप गणेश महाराज वारे, सुनील चांगभले, किरण शेटे, ज्ञानेश्वर जाधव, गणेश चांगभले, अजिंक्य वैद्य उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नमामी चंद्रभागेच्या कृती आराखड्यास अखेर मान्यता

**योजना २०२८ पर्यंत पूर्ण होणार**

**आमदार समाधान आवताडे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ मे-**

नमामी चंद्रभागा योजनेच्या कृती आराखड्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली असून योजनेची संपूर्ण कार्यवाही २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार आवताडे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्नावेळी बोलताना नमामी चंद्रभागा योजनेची अंमलबजावणी कागदावरच असल्याचे निदर्शनास आणून देत याबाबत शासनाने एक कृती आराखडा



जाहीर करावा अशी मागणी केली होती. अनेक वर्षांपासून चंद्रभागेच्या पात्रात असलेली प्रचंड घाण, दुर्गंधी तसेच शेवाळे आणि कचऱ्याचे ढीग यामुळे येथे आलेले भाविक प्रचंड नाराजी व्यक्त करताना दिसून येत होते. त्यामुळे आमदार आवताडे यांनी मागील आषाढी यात्रा कालावधीत चंद्रभागा नदी पत्रास अचानक भेट दिली असता त्या ठिकाणी दिसून आलेल्या बकाल अवस्थेबद्दल मोठी नाराजीही व्यक्त केली होती. तर विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशात देखील चंद्रभागा नदी प्रदूषणाची वारंवार निर्माण होणारी गंभीर परिस्थिती लक्षात घेत नमामि चंद्रभागा योजनेच्या कार्यवाहीस गती देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शासनाने ३० एप्रिल रोजी नमामि चंद्रभागा



योजनेच्या कृती आराखड्याची अंमल बजावणी करण्यास मान्यता देण्याचे आदेश काढले आहेत.

या कृती आराखड्याची कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावरील कार्यकारी समितीने कृती आराखड्याच्या प्रभावी अंलबजावणीची कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. नमामि चंद्रभागा योजनेची संपूर्ण कार्यवाही २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. याबरोबरच जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ व त्यामध्ये वेळोवळी केलेल्या सुधारणांनुसार तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील तरतूदींनुसार प्रदूषण नियमांचे पालन न करणाऱ्या तसेच प्रदूषणास कारणीभूत ठरणारे उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा व्यक्ती यांच्यावर कायद्यातील विहीत तरतूदींनुसार आवश्यक कारवाई करणे बाबतची दक्षता संबंधित यंत्रणेने घ्यावी लागणार आहे.

चंद्रभागा प्रदूषणासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेने प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानीचा खर्च भरपाई बंधनकारक करण्यात आली आहे. नगर विकास विभागाने १२ आगस्ट २०१६ व ०४ आक्टोंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरण व नमामि चंद्रभागा अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी घेतलेल्या निर्णयानुसार करावयाच्या उपाययोजना याबाबत संबंधित विभागांनी आवश्यक दक्षता घ्यावी. संबंधित शासकीय कार्यालये, मंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी स्थानिक नागरीक, पर्यावरण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, स्थानिक मंडळे, शाळा व महाविद्यालये यांना सदर आराखड्याच्या प्रभावी अंमल बजावणीच्या अनुषंगाने सहभागी करून घ्यावे अशाही मार्गदर्शक सूचना शासनाने दिल्या आहेत.

## पंढरपुरात महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ मे-**

लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर यांच्या वतीने श्री गणपती मंदिर गणेश नगर येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रथमता महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन पंढरपूरचे युवानेते प्रणव परिचारक, लक्ष्मी टाकळी गावचे सरपंच संजय साठे, माजी नगरसेवक निलराज डोंबे, माजी नगरसेवक निलेश आंब्रे, माजी नगरसेवक सचिन कुलकर्णी, माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर, माजी नगरसेवक श्रीनिवास बोरगावकर, जिल्हाध्यक्ष वीरशैव आघाडी ॲड राजेश भादुले, अमित डोंबे, श्याम गोगाव, सिद्धेश्वर कोरे यांच्या हस्ते मूर्तीची पूजा करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविकात रामेश्वर कोरे यांनी जगतज्योती महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर यांच्यावतीने गेल्या दोन वर्षांपासून साजरी करत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच महात्मा बसवेश्वर यांचे विचार १२ व्या शतकातील अध्यात्मिक, वैचारिक, सामाजिक, परिवर्तन घडवून आणणारे एक महान युगपुरुष असे महात्मा बसवेश्वर संबोधले जातात. खऱ्या अर्थाने बाराव्या शतकात क्रांती करणारे अनिष्ट प्रथा रूढी परंपरा, वाद जातीयता, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना विरोध करून सामाजिक व्यवस्था उभे करण्याचे कार्य महात्मा बसवेश्वर यांनी केले असे विचार आपल्या त्यांनी सांगितले.

व्याख्यानानंतर प्रसाद वाटप कार्यक्रम लिंगायत समाज टाकळी रोड पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आले. महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यासाठी सिद्धेश्वर कोरे, नागेश कुंभार, धनंजय म्हमाने, राहुल म्हमाने, डॉक्टर मिलिंद नकाते, प्रशांत शेटे, प्रशांत यावगल नागेश गुळवे, चंद्रकांत बिरगीकर, श्रीशैल कारभारी , योगेश आंधळकर, सिद्धेश्वर बिराजदार, बसवराज मरळे, सुभाष हात्तरगी, भीमाशंकर सारवाडकर, संजय पाटील, आण्णाराया कोरे आदींसह बहुसंख्य लिंगायत समाज बंधू आणि भगिनी उपस्थित होते.

## केडगावला राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

**१४ व १५ जूनला होणार संमेलन**

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ४ मे-**

राज्यस्तरीय चौथे भीमथडी मराठी साहित्य संमेलन शनिवार दि. १४ व रविवार दि.१५ जून रोजी केडगाव, चौफुला (ता.दौंड, जि. पुणे) येथे होत आहे. या साहित्य संमेलनात उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण सोहळा, ग्रंथदिंडी, परिसंवाद, प्रकट मुलाखत, कथाकथन, नाट्यप्रयोग, सांस्कृतिक, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती संमेलनाचे मुख्य प्रवर्तक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.



अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी संमेलनाचे आयोजन करण्यात येते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुळीक, सचिव दिपक पवार, प्रतिष्ठानचे सदस्य कैलास शेलार, राजाभाऊ जगताप, रामचंद्र नातू, महाराष्ट्र राज्य तमाशा थिएटर मालक संघटनेचे अध्यक्ष डॉ.अशोकराव जाधव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक कांबळे, झोपडपट्टी सुरक्षा दल पुणे जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय डाडर, रानकवी जगदीश वनशिव, भाऊसाहेब फडके, नितिन भागवत, आनंदा बारवकर, सुशांत जगताप, अरविंद जगताप आदी उपस्थित होते. दोन दिवस चालणा-या या साहित्य संमेलनात मुक्कामी राहण्याची व जेवणाची सोय करण्यात येणार आहे. साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी कवी, लेखक, कलावंत, साहित्यिक यांनी ९८८१०९८४८१ ,८८०५५११०६०, ९८५०२०६९७७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन भीमथड़ी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे व सचिव दीपक पवार यांनी केले आहे.



## सांगोल्यात परशुराम जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ मे-**

सांगोल्यातील सावरकर युवामंच, परशुराम युवामंच, ब्राम्हण सभा यांच्यावतीने दत्त मंदिरात श्री परशुराम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन व श्री परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, ॲड. सारंग वांगीकर, डॉ.शालिनी कुलकर्णी, प्रा. भगवंत कुलकर्णी , हभप सुभाष लऊळकर, नागेश जोशी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी श्री परशुराम यांचे जीवन व कार्य या विषयावर मनोगत व्यक्त केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पो.नि.विनोद घुगे यांच्या हस्ते शालेय भेटवस्तुचे वाटप करण्यात आले तसेच दत्तभक्त नंदकुमार लऊळकर यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी श्री परशुराम यांचे विषयी पो.नि.विनोद घुगे, डॉ. शालिनी कुलकर्णी, हभप सुभाष लऊळकर, प्रा.भगवंत कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.मानस कमलापुरकर, सूत्रसंचालन हभप श्रीपाद वांगीकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुमार कुलकर्णी, सचिन बेले, कौस्तुभ भोसेकर, श्रीनिवास देशपांडे, संजय हसबनिस, श्रीकांत हसबनिस, निलेश ताकभाते, रवी कुलकर्णी, मंगेश कुलकर्णी, तेजस कुलकर्णी, ज्ञानेश्वर कुलकर्णी, चंद्रशेखर कुलकर्णी, ॲड.विशाल बेले, ज्ञानेश लऊळकर यांनी परिश्रम घेतले.

## हन्नूर येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त भीमगीतांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ मे-**

हन्नूर येथे न्यू भीम क्रांती तरूण मंडळ लुंबिणी बुध्दविहार यांच्या संयुक्त विद्यमाने भिम भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भीमगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या आगोदर गावांतील उपसरपंच सागर कल्याणशेट्टी व सोसायटी चेअरमन विश्वनाथ भरमशेट्टी, सोपान निक्ते, शब्बीर जमादार, निरंजन हेगडे, संतोष बाळशंकर, चंद्रमणी बाळशंकर, गौतम बाळशंकर, मिलींद बाळशंकर, परशुराम बाळशंकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



यावेळी सर्व मान्यवरांचा सत्कार मंडळाच्यावतीने करण्यात आला. या वेळी बुद्धवंदना घेण्यात आली. गोविंद बाळशंकर सोपान निक्ते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी न्यू भिम क्रांती तरूण मंडळातर्फे आ. सचिन कल्याणशेट्टी यांना निवेदन देण्यात आले. निवेदन मध्ये दोन एकर जागा व त्या मध्ये चांगल्या प्रकारे बुध्दविहार बांधून देण्या संबंधित निवेदन त्यांचे भाऊ तसेच उपसरपंच सागर कल्याणशेट्टी यांना यांच्या उपस्थितीत देण्यात आले. लिंबुणी बुद्ध विहार पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मिरवणुकीस सुरवात झाली. गावात मिरवणूक आल्यानंतर उपसरपंच सागर कल्याणशेट्टी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच थोड्याच वेळाने माजी गृहराजमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी पं.स.सदस्य सिध्दार्थ गायकवाड, सोसायटी चेअरमन विश्वनाथ भरमशेट्टी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन गौतम बाळशंकर यांनी केले तर आभार संस्थापक अध्यक्ष संतोष बाळशंकर यांनी मानले.





## अनिल राठोड यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ४ मे-**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महावितरणतर्फे दिला जाणारा उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कार यावेळी होटगी शाखेतील वरिष्ठ तंत्रज्ञान अनिल धोंडू राठोड यांना देण्यात आला. २०२४-२५ वर्षामध्ये केलेले उत्कृष्ट कामामुळे होटगी (ता. द.सोलापूर) शाखेचे शाखाधिकारी राजशेखर गुरव व उपकार्यकारी अभियंता सचिन दवंडे यांनी अनिल राठोड यांची या पुरस्कारासाठी शिफारस केले होते. वितरण सोहळा कार्यक्रम बारामती येथे महावितरणच्या परिमंडळ कार्यालयामध्ये मुख्य अभियंता पेठकर यांच्या हस्ते राठोड यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कार देण्यात आला. यावेळी दीपक गायकवाड विनायक फावडे, लकाबशेट्टी, राऊत उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय वयातच झाली पाहिजे

**शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचे प्रतिपादन**

**प्रज्ञाशोध परीक्षेचा पारितोषिक वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ मे-**

आजच्या आधुनिक युगामध्ये प्रत्येक क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे, कोणत्याही स्पर्धेत टिकण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते व स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारीही असावी लागते म्हणूनच स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय जीवनापासूनच करायला हवी आहे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी व्यक्त केले.

येथील विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने आयोजित विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्रसाद मिरकले म्हणाले की, स्पर्धा परीक्षांचे महत्त्व कितीही असले तरीही स्पर्धा प्रथम स्वतः



बरोबरच आपल्याला करावी लागते. दक्षिण भारतातील अनेक राज्ये अशा स्पर्धा परीक्षांमध्ये शालेय जीवनापासून तयारी करून घेतात, त्यामुळे येथील युवक व विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होताना दिसून येतात. आपण स्पर्धेत यशस्वी व्हावे असे वाटणे साहजिक आहे परंतु त्यासाठी कष्टाची तयारी हवी. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रवींद्र ओहोळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ.सचिन लादे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अरिहंत पब्लिक स्कूलचे संस्थापक सचिव उज्वल दोशी व विठाई संस्थेचे मार्गदर्शन डॉ.आनंद भिंगे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. शेवटी आभार महानंदा डोंबाळे यांनी मानले तर सूत्रसंचालन सोमनाथ गायकवाड यांनी केले. याप्रसंगी अरिहंत पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका लोखंडे, विद्या विकास मंडळ प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापक महादेव कांबळे, ज्ञानेश्वर मोरे, नितीन करंडे, राहुल आर्वे, संजय कुलकर्णी, सुनील जगताप, शहाजी देशमुख, सिद्धार्थ ढवळे, डॉ. क्षितिजा कदम-पाटील, प्रा.गोविंद भोसले, तुकाराम खंदाडे, एकनाथ सुतार, डॉ. अतुल आराध्ये, आनंद नगरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालक शशिकांत घाडगे, राम मोरे, अनिल घाडगे, ॲड. कीर्ती मोरे, कविता गायकवाड, उदयसिंह वाघमारे, अर्चना वाघमारे, महानंदा डोंबाळे, प्रसाद कोत्तूर, संजय टोणपे, अंजली लादे, माया कुलकर्णी, मोनिका जाधव यांनी परिश्रम घेतले.


## महत्वाचे...

### हंजगी येथील श्री बमलिंगेश्वर यात्रेस प्रारंभ

**अक्कलकोट, दि. ४ मे -**

तालुक्यातील हंजगी येथील सातशे वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले हेमाडपंथी श्री बमलिंगेश्वर मंदिरात ३० एप्रिल ते ६ मे २५ पर्यंत श्री बमलिंगेश्वर मंदिरात श्री सिध्दारामेश्वर महापुराण कार्यक्रमास प्रारंभ झाला असून ८ मे पर्यंत दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे. मंगळवार दि ६ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता श्री लिंगास रुद्राभिषेक आणि सायंकाळी ६ वाजता यण्णीभजन, महापूजा व नंदीध्वज यांचे आगमन होणार आहे. रात्री ठीक ९ वाजता ऐतिहासिक कन्नड बैलाट 'चक्रकोटी अभिमन्यू' हे प्रयोग सादर होणार आहे.बुधवार ७ मे रोजी पहाटे ४ वाजता महाआरती कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर श्री भक्तांचा दंडवत कार्यक्रमाला प्रारंभ होणार आहे. तसेच दिवसभर गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.तर रात्री ८ वाजता पालखी नंदीध्वजासह संपूर्ण गावातून मिरवणूक निघणार आहे.रात्री साडे नऊ वा. मंदिरा समोर शोभेचे दारुकाम होणार आहे. गुरुवार, दि.८ मे रोजी संपूर्ण दिवसभर गीत गायनाचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ५ वाजता कुस्ती कार्यक्रम होणार आहे. रात्री १० वाजता बमलिंगेश्वर नाट्य संघातर्फे 'बडवा बदुकले बेकू' या कन्नड नाटकाचे प्रयोग सादर होणार आहे. तरी सर्व श्री बमलिंगेश्वर भक्तगणांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्याव असे आवाहन यात्रा पंचकमिटीतर्फे करण्यात आले आहे.





### शेटफळच्या वैभव पोळ यांना अकलूज येथे खासदार उद्योजक पुरस्कार प्रदान

**करमाळा, दि. ४ मे-**

शेटफळ तालुका करमाळा येथील उद्योजक वैभव पोळ यांचा अकलूज येथे खासदार उद्योजक पुरस्कार देऊन गौरव करण्यात करण्यात आला. अकलूज येथे नवउद्योजक मार्गदर्शन व कार्यशाळा या कार्यक्रमात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाला आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. उत्तमरावराव जानकर उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर टेक्नोलॉजी विजयसिंह मोहिते-पाटील नरसिंग कॉलेज, रोटरी क्लब सराटी डिलाईट, लघुउद्योग महामंडळ राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ सूक्ष्म लघु व मध्यम मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास केंद्र योजनेअंतर्गत अकलूज येथे नवउद्योजक मार्गदर्शन व कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित शासनाच्या विविध योजना यांची माहिती देण्यात आली व मान्यवरांच्या मार्गदर्शनाचे कार्यक्रम झाले. यावेळी जिल्ह्यातील निवडक नमो उद्योजकांचा खासदार उद्योजकता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

### महाडीकवस्ती मळोलीचे शिक्षक अविनाश कुदळे जिल्ह्यात अव्वल

**पिलीव, दि. ४ एप्रिल-**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर व लीडरशिप फॉर इक्विटी यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्हयामध्ये अमेझॉन फ्युचर इंजिनिअर प्रकल्प अंतर्गत जिल्हयातील शिक्षकांसाठी ऑनलाईन ब्लेंडेड कोर्स घेण्यात आले होते. यात जिल्यातील ९०० हून अधिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम शिवरत्न सभागृह जिल्हा परिषद सोलपूर या ठिकाणी पार पडला. या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महाडीक वस्ती (मळोली) येथील तंत्रस्नेही, आदर्श शिक्षक अविनाश मधुकर कुदळे यांनी यश संपादन केले. जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राथमिक शिक्षणधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार, माळशिरस तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी तसेच सर्व तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यात अविनाश कुदळे यांनी अव्वल स्थान मिळवल्याबद्दल पंचायत समितीचे मा. सदस्य रणजितसिंह जाधव, मळोली सोसायटीचे चेअरमन सत्यजित जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी प्रदीप करडे, शिक्षण प्रेमी अशोक जाधव, ग्रामपंचायत सदस्य विजय जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल महाडीक, उपशिक्षिका उषा सावंत, पत्नी स्वरूप कुदळे, माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेचे डायरेक्टर सचिन गाटे अभिनंदन केले.



### वटवृक्ष मंडळातर्फे बसव जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ४ मे-**

श्री वटवृक्ष मंडळ बासलेगाव रोड, भगवा कट्टा येथे विश्वगुरु, लिंगायत धर्म संस्थापक समता नायक महात्मा बसवेश्वर महाराज जयंती साजरी करण्यात आली. मंडळाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते बसवेश्वर महाराज मूर्तीचे पूजन करण्यात आले. वेदमूर्ती गुडय्या स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी नगरसेवक नागराज कुंभार, बसवराज अगरखेड, मल्लिकार्जुन पाटील, दिगंबर साळुंके, सचिन डिगे, अनिल शिंदे, बसवराज व शशिकांत कुंभार, सगंय्या स्वामी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार चंद्रकांत दसले यांनी केले..

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शिवाजी पॉलिटेक्निकच्या पाच विद्यार्थ्यांची कमिन्स कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ मे-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन या विभागातील गौरी येलपले, प्रज्वल मोळक, अमन पठाण, संकेत इंगवले, आर्यन डुबल या विद्यार्थ्यांची पुणे येथील कमिन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड



झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांनी दिली. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त मंडळ, डॉ. आर.ए.देशमुख, सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंटचे ऑफिसर प्रा.पी. सी.चव्हाण, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा.आनंद गायकवाड, प्रा.ऋषिकेश गयाळी यांचे मार्गदर्शन लाभले.



### महत्वाचे...



### संत तुकडोजी महाराजांचे कार्य आचरणात आणावे : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ४ मे -**

संत तुकडोजी महाराजांनी समाजातील रूढी परंपरा दांभिकतेवर प्रहार केला. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले. त्यांचे कार्य आचरणात आणले पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. येथील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील मराठी मंडळातर्फे आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले संत तुकडोजी महाराजांची काव्यरचना मान्यता प्राप्त आहेत. त्यांनी ग्रामगीता या आपल्या ग्रंथातून समाजाला संदेश देणारी रसभरीत काव्य रचना केली आहे. त्यामुळे समाजाला नव संजीवनी मिळाली आहे. त्यांनी राजा राव, रंक , श्रीमंत, गरीब तसेच अध्यात्मिक संत सर्वांनाच आपल्या काव्यातून सुनावले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी मंडळाचे प्रमुख प्रा भीम सोनकांबळे यांनी केले. आभार प्रा डॉ बाळासाहेब पाटील त्यांनी मानले.

### अवैध धंदे बंदसाठी पिलीव ते वेळापुर पदयात्रा; आमदार जानकर यांना निवेदन

**पिलीव दि ४ एप्रिल -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या परीसरातील दारु, जुगार, मटका, गुटखा या प्रकारचे अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. यामुळे अनेकांचे संसार अक्षरशः देशाधडीला लागले आहेत. पिलीव परीसरातील सर्व अवैध धंदे बंद करावेत यासाठी कुमार लोखंडे यांनी पोलीस स्टेशन समोरच दारु विकणार असल्याचा इशारा दिला होता. यांनतर त्यांनी याबाबत माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांना पिलीव ते वेळापुर अशी पदयात्रा करत निवेदन दिले. गुरुवारी सकाळी १० वाजता कुमार लोखंडे व त्यांचे सहकारी दादा खुर्द, दिलीप लोखंडे, धनाजी लोखंडे, पिंटु लोखंडे, विजय लोखंडे, महादेव लोखंडे, विकास लोखंडे, विशाल लोखंडे, अजय खुर्द हे या पदयात्रेत सहभागी झाले होते. सकाळी दहा वाजता पिलीव हुन निघालेली पदयात्रा संध्याकाळी पाच वाजता पोहचली. यावेळी कुमार लोखंडे यांनी आमदार जानकर यांना रितसर निवेदन दिले. यावर आमदार जानकर यांनी श्री.लोखंडे यांनी हे जे अनोखे आंदोलन केले आहे. आपण यासाठी लोखंडे यांच्या मागणीला पाठींबा देत असुन माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरातील सर्व अवैध धंदे ताबडतोब बंद करावेत याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर व माळशिरसचे पोलीस निरीक्षक राहुल मडावी यांना बोललो असुन ताबडतोब सर्व अवैध धंदे बंद करावेत असा आदेश त्यांना दिला असल्याचे सांगितले.



### पिलीव येथे जातीनिहाय जणगणना निर्णयाचे स्वागत

**पिलीव, दि. ४ मे-**

देशातील नरेंद्र मोदी सरकारने नुकताच जातिनिहाय जणगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत पिलीव येथे पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. १९३१ नंतर अशा प्रकारचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. समाजातील उपेक्षित वर्गाला प्रवाहात आणण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. यामुळे देशात कोणत्या जातीचे निश्चित किती लोक राहतात याची निश्चित आकडेवारी माहीत होणार आहे. संपूर्ण राज्यातील तसेच देशातील त्या जातीची निश्चित आकडेवारी या जातनिहाय जनगणनेमुळे होणार आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, भाजपा माळशिरस मंडलाधिकारी नितीन मोहीते, महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलचे अध्यक्ष प्रमोद भैस, अतुल नष्टे, माळशिरस तालुका भाजपा उपाध्यक्ष तुषार लवटे, महादेव जरग, अरुणसिंग जामदार,डाकटर निलेश कांबळे, बाजीराव जाधव, संकेत देशमुख, राहूल भैस, प्रवीण वाघमारे, हनुमंत सुळे, योगेश देशमुख निलेश पिसे, दत्तात्रय जनवर, संतोष करडे, प्रदीप चोबे, संदीप भैस,दिपक जाधव, अजित भैस, अशोक जाधव, मयुर भैस, दादा सातपुते, दिगंबर भैस, संदीप जाधव उपस्थित होते.

### हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने शास्त्रीय गायन स्पर्धा १५ जूनला

**सोलापूर, दि. ४ मे-**

हिराचंद नेमचंद वाचनालयाचे माझी अध्यक्ष प्राध्यापक श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त राज्यस्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १८ ते ४० या वयोगटातील स्पर्धकांनी आपल्या ख्याल गायनाचे पंधरा मिनिटाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून व त्याबरोबर स्वतःची माहिती ई-मेल किंवा टेलिग्राम या माध्यमातून ३० मे पर्यंत वाचनालयाकडे पाठवावी तपशीलवार माहितीसाठी ९४०४८०९१५७ या क्रमांकाच्या टेलिग्रामवर तसेच हपुरलहपरश्रूरहे.लो या ई-मेल वर संपर्क साधावा. या स्पर्धेतील निवडक स्पर्धकांची अंतिम स्पर्धा १५ जून रोजी वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होईल. अशी माहिती वाचनालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

# पंढरपुरातील १९९६च्या बाधितांनाही मदत मिळावी

## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना नागरिकांच्या शिष्टमंडळाचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ मे-**

पंढरपूर येथे १९८२ आणि १९९६ मध्ये रस्ता रुंदीकरण करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी १९८२ मध्ये बाधित झालेल्यांना शासकीय मदत मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नुकतेच सांगितले. त्याच धर्तीवर १९९६ मध्ये देखील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यांना मदत देण्याच्या मागणीचे निवेदन तत्कालीन बाधित नागरिकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (ता.२) जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना दिले.

या बाबत माहिती देताना शिष्टमंडळाचे प्रमुख उमेश टोमके यांनी सांगितले की, पंढरपूर शहरात यापूर्वी दोन वेळा रस्ता रुंदीकरण झालेले आहे. सुरुवातीला १९८२ मध्ये विठ्ठल मंदिर परिसरात रस्ता रुंदीकरण करण्यात आले. त्यावेळी



अनेक नागरिकांची दुकाने, घरे पाडण्यात आली. त्यावेळी जे बाधित झाले त्या बाधितांना शासकीय मदत मिळाली नाही. त्यांचे पुर्नवसन योग्य प्रकारे झालेले नाही अशा तक्रारी कॉरिडोरच्या बैठकीवेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना अनेक नागरिकांनी केल्या होत्या. त

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी या नागरिकांसाठी स्वतंत्र समिती गठित करुन त्यांना देखील शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिलेले आहे. दरम्यान त्या नंतर पुन्हा १९९६ मध्ये शहरातील प्रदक्षिणा मार्ग व अन्य काही भागातील रस्ता रुंदीकरण करण्यात आले. त्यावेळी देखील अनेक नागरिकांची घरे, दुकाने रस्ता रुंदीकरणात बाधित झाली. त्यावेळी त्यांना शासकीय मदत तर दूरच, त्यांचे योग्य प्रकारे पुर्नवसनही करण्यात आले नाही. उलट प्रत्येक बाधितांना स्वखर्चाने आपली मालमत्ता पाडून रस्ता रुंदीकरणास मदत करावी लागली. यावेळी फ्रंटेज चार्जेस १९९६ प्रमाणे आणि भरपाई मात्र १९६७ प्रमाणे जाहीर केली केली. यामुळे त्यावेळी नागरिकांचे मोठे नुकसान झाले. त्यावेळी शासनाने देखील या बाबत पुन्हा कधीही पाठपुरावा केला नाही. त्यामुळे १९९६ मध्ये बाधित झालेल्यांना कोणतीही शासकीय मदत मिळाली नाही. सन १९८२ मधील बाधितांना जिल्हाधिकारी शासनाकडून येत्या काळात मदत मिळवून देत आहेत त्या प्रमाणे १९९६ मधील बाधितांना देखील न्याय मिळावा याबाबतचे एक निवेदन बाधित झालेल्या नागरिकांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना नुकतेच दिले. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी देखील १९८२ मधील बाधित झालेल्या नागरिकांप्रमाणे आपणाला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिल्याची माहिती उमेश टोमके यांनी दिली.

या निवेदनावर उमेश टोमके, विनायक सादिगले, अँड.सुहास माळवे, शिवराज माळवे, ओदुंबर आदापुरे, दत्तात्रय खजुरे, अल्लाउद्दीन सुमराणी, महादेव आसबे आदी बाधित झालेल्या नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी शासनाकडून यापूर्वीच्या रस्ता रुंदीकरणातील बाधितांना आता काय न्याय देतात, काय मदत मिळवून देतात याकडे रस्ता रुंदीकरणातील बाधित मंडळींचे लक्ष लागलेले आहे.

### सर्वांना समान न्याय मिळावा

दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास या मुलमंत्राप्रमाणे सर्वांना समान न्याय मिळावा अशी देखील मागणी या मंडळींनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनामध्ये नमूद केली आहे.

# विकासाला निधी कमी पडू देणार नाही

### माजी खासदार नाईक निंबाळकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि.४ मे-**

माढ्याचा खासदार असताना मळशिरस व माढ्याच्या विकासा साठी निधी देण्याचा प्रयत्न केला. आज जरी सत्तेत नसलो तरी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून निधीची कमतरता पडणार नाही असे प्रतिपादन माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी श्रीपूर येथे केले.

येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्यावतीने हुशार होतकरू विद्यार्थीनीसाठी सायकल तसेच महिलांना शिलाई मशिन वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रथम डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे,



नगरसेवक राहूलअप्पा रेडे - पाटील, आरपीआयचे विकास धाईंजे, मिलिंद सरतापे, नंदकुमार केंगार, स्मारक समितीचे अध्यक्ष संदीप घाडगे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बापूराव पोळके, बी. टी. शिवशरण, तुकाराम बाबर, भारत आठवले, राजरत्न नाईकनवरे, गौतम आठवले, राजू सुरवसे, महाळुंगचे रावसाहेब सावंत - पाटील, प्रकाश नवगिरे, विकमसिंह लाटे, मौला पठाण आदी उपस्थित होते. याप्रसंगी स्मारक समितीचे संदीप घाडगे यांनी आम्ही डीजे व अन्य खर्चास फाटा देत यावेळी मुलींना सायकली व महिलांना शिलाई मशीन देत असल्याचे सांगत श्रीपूर मध्ये डॉ. आंबेडकर स्मारकाच्या विस्तारासाठी निधी मिळावा अशी मागणी नाईक-निंबाळकर यांच्या कडे केली. रणजितसिंह शिंदे यांनी आ. बबनदादा शिंदे व खा.नाईक निंबाळकर यांच्या काळात झालेल्या विकास कामांची माहिती देवून आज सत्तेत नसलो तरी या परिसराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले. या प्रसंगी नंदकुमार केंगार, मोला पठाण यांनीही आपले विचार मांडले. यानंतर सायकल व शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दत्ता नाईकनवरे यांनी केले. यानंतर बहारदार भिमगीतांचा जलसा झाला.

### यमाई देवी मंदिरासाठी निधी उपलब्ध करु

महाळुंग येथिल यमाई देवी मंदिराचे जिर्णोद्धाराचे गेल्या ४० वर्षापासून काम रखडले होते. केंद्रीय पातळीवरून त्यास मंजूरी आणून खासदार असताना ९ कोटी उपलब्ध करून दिले सध्या ते काम बंद आहे. परंतू राज्य व केंद्रात सरकार आपले असल्याने निधी उपलब्ध करून जिर्णोधाराचे काम सुरु होईल असे माजी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी यावेळी सांगितले.



### दामाजी कारखाना स्थळी १५१ वृक्षांचे रोपण

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.४ मे -**

येथील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना व अरिहंत कॉम्प्युटर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी दि.४ मे रोजी १५१ झाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये अशोक, जांभळ, पेरु, कन्हेरी, बदाम यासह अन्य रोपांचा समावेश आहे.

यावेळी अरिहंत कॉम्प्युटरचे १३८ विद्यार्थी, प्राचार्य सचिन पवार, रुक्मिणी सुडके, कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक रमेश जायभाय, असिस्टंट इंजिनिअर गजानन चौगुले, मुख्य शेती अधिकारी कृष्णात ठावरे, अकौंटंट रमेश गणेशकर, अधिक्षक दगडु फटे, स्टोअरकिपर उत्तम भुसे, लेबर ऑफिसर आप्पासाो शिनगारे, सुरक्षा अधिकारी लक्ष्मण बेदरे, परचेस ऑफीसर संदिप इंगोले, सुपरवायझर प्रकाश पाटील आदी उपस्थित होते. श्री.चौगुले यांनी विद्यार्थ्यांना मशिनरीची माहीती दिली. कार्यकारी संचालक रमेश जायभाय यांनी वृक्ष लागवडीचा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल अरिहंत कॉम्प्युटरचे शिक्षक व वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन आभार मानले. चेअरमन शिवानंद पाटील, व्हा. चेअरमन तानाजी खरात व संचालक मंडळाने येणाऱ्या जुन महिन्यात कारखाना मालकीच्या जमिनीत ५ हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार वृक्षलागवडीसाठी प्रयत्न सुरू असल्याचे श्री. जायभाय यांनी यावेळी सांगितले.



## सांगोला महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक माणदेशचे प्रकाशन

**सांगोला, दि. ४ मे-**

सांगोला महाविद्यालयात महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक माणदेशचे प्रकाशन संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, म. सि. झिरपे, सहसचिव साहेबराव ढेकळे, संस्था सदस्य सुरेश फुले, प्र. प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, संतोष कांबळे, संपादक डॉ. अमोल पवार उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक करत नियतकालिकातून व्यक्त होणाऱ्या विचारविश्वाचे महत्व अधोरेखित केले. माणदेश नियतकालिकेसाठी सहसंपादक म्हणून डॉ.बबन गायकवाड, डॉ. मालोजी जगताप, डॉ. रेणुकाचार्य खानापुरे, डॉ.जमीर तांबोळी, प्रा.नरेंद्र पाटील, प्रा.विशाल कुलकर्णी, प्रा.प्रज्ञा काटे, प्रा.प्राप्ती लामगुंडे, प्रा. तेजश्री मिसाळ यांनी परिश्रम घेतले.

## धर्मवीर जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी अंकुश चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ४ मे-**

येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समितीच्या अध्यक्षपदी अंकुश चौगुले, उपाध्यक्षपदी सिद्धाराम माळी, अनिल माने, तर सचिवपदी आकाश सूर्यवंशी, समर्थ चव्हाण यांची एकमताने निवड करण्यात आली.

समितीचे आधारस्तंभ अमोलराजे भोसले व मिलन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली व ट्रस्टी संस्थापक अध्यक्ष अतिश पवार यांच्या नेतृत्वाखाली उत्सव समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत सन २०२५ च्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाली. ती पुढीलप्रमाणे - उत्सव सहसचिव दिपक



चौगुले, ओंकार जाधव, राम लोणारी, योगेश पवार(हसापूर), खजिनदार लक्ष्मण शिंदे, राजाराम पवार, कार्याध्यक्ष गणेश पाटील, प्रसाद मोरे, अभिषेक धुमाळ, अजय शिंदे, उपकार्याध्यक्ष सचिन बिराजदार, अमित कोळी, बसवराज भोळे, दिनेश पाटील, स्टेज प्रमुख प्रशांत बंदिछोडे, सिध्दु लव्हारे, शिवशरण हळ्ळीमनी, समर्थ कलशेट्टी, समर्थ घोडके, पुजाप्रमुख शरणु किणीकर, शशांक सुरवसे, गौरव लोकापुरे, सुजल नरोणे, प्रसिद्धी प्रमुख दत्ता मोरे, समर्थ नडगिरे, ओंकार दुरुगकर यांची एकमताने निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर मिलन कल्याणशेट्टी व अतिश पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या उत्सवात अक्कलकोट तालूक्यातील तमाम शिवभक्तानी सामील होण्याचे आवाहन अतिश पवार यांनी केले. छत्रपती संभाजी महाराज यांची प्राणप्रतिष्ठापना बुधवार दि. १४ मे रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार असून गुरुवार दि. २२ मे रोजी दुपारी ४ वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## सदाशिवनगर येथे १११ जणांचे रक्तदान

### आमदार रणजितसिंह व खासदार धैर्यशील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.४ मे-**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत सदाशिवनगर, पुरदांवडे, येळीव, जाधववाडी, तामशिदवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने येथील शिवामृत भवनात झालेल्या शिबिरात १११ जणांनी रक्तदान केले.

शिबीराचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-



पाटील व आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सहकार महर्षी काकासाहेब व राजमाता अक्कासाहेब यांच्या प्रतिमा पूजनाने झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, डॉ संतोष खडतरे डॉ.विजयसिंह भगत, डॉ. ज्ञानदेव ढोबळे, डॉ. अजित गांधी उपस्थित होते. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशिल मोहिते -पाटील यांनी आपला वाढदिवस हार तुरे फेटे व डिजिटल पोस्टर न लावता रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून करावा असे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत सदाशिवनगर, पुरदांवडे, जाधववाडी, येळीव व तामशिदवाडी येथील ग्राम स्थांनी रक्तदान शिबीर घेतले. यावेळी श्री शंकर सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक, अधिकारी ,कर्मचारी, विविध संस्थांचे पदाधिकारी व विविध गावचे आजी माजी सरपंच व सदस्य तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी सदस्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील ब्लड सेंटर अकलुज यांनी रक्त संकलन केले.